# आत्मज्ञान आणि विज्ञान

ग्रं. सं. ठाणें
निबंध
१५०६

विनोबा

REFBK-0014148

परंधाम प्रकाशन, पवनार

# आत्मज्ञान आणि विज्ञान

विनोबा

REFBK-0014148

परंधाम प्रकाशन, पवनार

98984

प्रकाशक :
भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम प्रकाशन,
पो. पवनार (वर्धा)

आवृत्ति १ ली २०००
सर्व हक्क प्रकाशकाधीन
किंमत : १.२५

मुद्रक :
भाऊ पानसे
परंधाम मुद्रणालय,
पो. पवनार (वर्धा)

# प्रकाशकीय

आजचें हें युग विज्ञान-युग मानलें जातें. ह्या युगांत आत्मज्ञानाचें स्थान कोणतें राहील, वास्तविक आत्मज्ञान म्हणजे तरी काय, आणि जें 'वास्तविक विज्ञान' आहे तें 'लोकभाषेंतील विज्ञाना'हून आत्मज्ञानाच्या किती जवळ आहे, त्याचें स्वरूप कोणतें यासंबंधीं विनोबांनीं आपल्या अनेक भाषणांतून सुलभ रीतीनें जनतेसमोर विचार मांडले आहेत, आणि आज हि मांडत असतात. अशा प्रवचनांचा एक संग्रह 'आत्मज्ञान आणि विज्ञान' या नांवानें अ० भा० सर्व सेवा संघानें हिंदींत प्रकाशित केला आहे. आजवर ह्या पुस्तकाच्या हिंदींत दोन आवृत्त्या निघाल्या आहेत.

हें मराठी पुस्तक म्हणजे त्या पुस्तकाचा केवळ अनुवाद नाहीं. ह्यांत अलीकडील भाषणांची भर आहे, जुन्या भाषणांचा समावेश आहे. शिवाय मांडणींत पुष्कळसा बदल आहे, 'अंतरंगांत शिरण्यापूर्वीं' हें प्रास्ताविक जोडून सामग्र्यानें सर्व विषय एका च वेळीं डोळ्यासमोर रहावा असा यत्न आहे. चोखंदळ वाचकांनीं समोर असलेल्या ह्या पुस्तकाचा वैज्ञानिक-वृत्तीनें आस्वाद घ्यावा ही च विनंति.

—प्रकाशक

## अनुक्रमणिका


अंतरंगांत शिरण्यापूर्वी १
१ मानव-पक्ष्याचे दोन पंख : आत्मज्ञान आणि विज्ञान ६
२ अध्यात्मज्ञान अजून पूर्णतेला पोंचलेलें नाहीं १०
३ विज्ञान-युगांत सत्याग्रह १६
४ विज्ञानाला आत्मज्ञानाचा अंकुश पाहिजे २०
५ आत्मज्ञानाचें ध्येय : सामाजिक समाधि २४
६ सामाजिक समाधि २७
७ विज्ञान-युगांतील तीन कर्तव्यें ३०
८ विज्ञान-युग आणि अध्यात्माची दिशा ३६
९ आम्हांला 'विश्वमानव' घडवायचा आहे ४३
१० जगाला रूप देणाऱ्या तीन शक्ति ४५
११ अहिंसात्मक सहयोगी योजनेचा अर्थ ५४
१२ विज्ञानाला अहिंसेची बैठक हवी ५६
१३ पृथ्वी पादाक्रांत करण्याची उमेद ६०
१४ मनोमालिन्य कसें घालवता येईल ? ६४
१५ विज्ञानाची मागणी ६७
१६ मनःक्षोभ नित्य टाळा ७
१७ आंदोलनाचीं विविध दर्शनें ७
१८ विश्वाची अद्भुततम जादू : विश्वास ७
१९ विश्वासानें च व्यक्ति आणि समाज टिकेल ८
२० वैज्ञानिक भौतिकवाद आणि धार्मिक श्रद्धा ८
२१ विचाराच्या आधारानें च धर्म टिकेल ९
२२ मानवधर्माची स्थापना होईल कशी ? ९
२३ विज्ञानाचा एकमेव अधिकारी भारत च १०
२४ साधनेचा क्रम १०
२५ ब्रह्मविद्येच्या विकासानें च आम्ही टिकू ११
२६ राजकारण + विज्ञान = सर्वनाश १२
अध्यात्म + विज्ञान = सर्वोदय
२७ सर्वोदयाचें सांख्य म्हणजे तत्त्वज्ञान १३
२८ गुण-दर्शन, गुण-ग्रहण आणि गुण-विकास १३
२९ विस्कळित रत्नें १३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६७६३ वि: निबंध
क्रमांक १५०६ नों दि: २५।८।६४

# अंतरंगांत शिरण्यापूर्वी

विज्ञान-युगांत माणसाच्या हातांत महान् सर्जन-शक्ति [आ]ली आहे. म्हणजे मनुष्य हा स्रष्टा बनला आहे. वेदान्त [म्ह]णतो मनुष्य हा द्रष्टा आहे. म्हणजे तो समस्त सृष्टीहून [अ]लग राहून तिचें दर्शन आणि संशोधन करूं शकतो. ही [त्य]ाची श्रेष्ठ भूमिका आहे. मनुष्य हा जसा सृष्टीचा द्रष्टा [हो]ता आणि आहे तसा तो आज स्रष्टा म्हणजे नवीन सृष्टि निर्माण करणारा बनला आहे. मनुष्य असा स्रष्टा, लहानसा [ब्र]ह्मदेव बनला आहे. तो आतां परमाणु-अस्त्रांच्या द्वारें [म]नुष्य-समाजाच्या नाशाची तयारी करूं शकतो, शिवतांडव हि करूं शकतो.

—विनोबा

[स]ृष्टींत पदार्थ आहेत, आणि पदार्थांतलें शेवटचें परिमाण अणु [मानले ग]ेले होते. अणु अविभाज्य आहे असे वाटत होतें. पण होतां होतां [अणूचें] हि विभाजन साधलें, आणि अणु ज्या निरनिराळ्या (Charges) [चार्जेस्]चा बनला आहे ते चार्जेस वेगळे करून, त्यांचें प्रमाण बदलून [निराळ्]या प्रकारचा अणु बनवता येतो असें सिद्ध झालें. लोखंडाचें [सोनें ब]नवता येईल, हें लक्षांत आलें. मूळ धातू नव्यानें बनवतां येऊं [लागलें] म्हणजे सृष्टीमागील एक रहस्य हस्तगत झालें.

अणूचें विभाजन होतांना प्रचंड शक्ति प्रगट होते असें ध्यानांत [आलें.] या प्रगट होणाऱ्या शक्तिसंबंधानें प्रख्यात शास्त्रज्ञ आईन्स्टाईन [यानें ए]क गणित मांडलें. त्या गणिताच्या आधारावर शक्तीचा विस्फोट [करणें फ]ार च सुलभ झालें. हें गणित च आजच्या अणुबॉंब व हायड्रोजन-[बॉंबचे] जनक ठरलें. सृष्टींतील संहार-शक्ति पण माणसाच्या हातांत [आली].

मराठी ग्रंथ संग्रहालय
२६०९८१

वातावरणांत असंख्य गूढ, रहस्यमय गोष्टी पसरलेल्या आहेत. त्यांचा शोध घेणें मनुष्य-स्वभाव आहे. त्यानें आकाशांत भरारी मारली, समुद्राचा तळ गाठला, पृथ्वीच्या पोटांत शिरून तिचीं गुपितें जाणून घेतलीं. अनंत आकाशांत असंख्य तारे लुकलुकत असतांना बघण्यांत इतके दिवस त्यानें आनंद मानला पण आतां त्यांना स्पर्श करण्याची इच्छा त्याला झाली आहे. त्या सुंदर चांदण्या दीड दोन महिन्यांच्या छोटचा मुलाला देखील आकर्षित करतात तर शास्त्रज्ञाच्या मनाला चळवळ करायला न लावत्या तर च नवल. चंद्र, मंगळ, शुक्र यांच्याशीं दोस्ती होणें आतां फारसें अवघड राहिलें नाहीं. आतां च एक अमेरिकन यान चंद्राच्या अगदीं जवळून म्हणजे साडेचारशे मैलांवरून गेल्याचें वृत्त आहे. लोक बोलतात या प्रयोगांच्या नादीं लागून माणूस चंद्राचे तुकडे पाडील. अंतरिक्षाला छेदून ग्रहांजवळ पोंचण्याची दुर्दम्य आशा बाळगून हर घडी नवीन प्रयत्न होत आहेत. अंतराळांत छोटेसे प्रतिचंद्र फिरत ठेवण्याचा पराक्रम तर आतां जुना च झाला म्हणायचा.

अशा तऱ्हेनें विज्ञान झपाटचानें प्रगति करीत आहे. गेल्या हजार वर्षांत झाली नव्हती एवढी प्रगति गेल्या शंभर वर्षांत झाली आहे आणि गेल्या शंभर वर्षांत झाली नव्हती एवढी प्रगति गेल्या दहा वर्षांत झाली आहे. विज्ञानाच्या गतिमुळें माणसाच्या हालचालींची गति हि वाढली आहे. आज ताशीं सहा-सातशे मैल वेगानें विमानें उडत आहेत. पृथ्वीकडून दुसऱ्या ग्रहांकडे झेप घेणारीं यानें तर पृथ्वीच्या वेगापेक्षां जास्त वेगानें उड्डाण करीत आहेत. या गतीनें काळाचा जणु संकोच केला आहे. पूर्वींच्या जमान्यांतलीं पन्नास वर्षें आज केवळ पांच वर्षांच्या लायकीचीं झालीं आहेत. म्हणजे पूर्वीं एक गोष्ट करायला पन्नास वर्षें लागलीं असतीं ती च गोष्ट आज पांच वर्षांत होऊं शकेल

विज्ञानाची ही अद्भुत प्रगति ज्या चैतन्य-शक्तीचें द्योतक आहे त्या चैतन्य-शक्तीबद्दल, ज्ञान-शक्तीबद्दल, मानवी बुद्धीबद्दल कौतुक वाटल्या-वाचून कसें राहील? नुसतें कौतुक नव्हे, डोळे आश्चर्यानें विस्फारित होतात, क्षणभर मति कुंठित होऊन जाते. पण क्षणभर च. दुसऱ्या च क्षणीं

असें वाटतें, शेंवटीं ही प्रगति आम्हांला कोठें नेणार आहे ? वायुवेगानें त्रिभुवनांत संचार करून येऊं. यानें समाधान होणार आहे काय ? जी शक्ति उत्पत्ति करूं शकते ती च संहार करायला हि सिद्ध झाली आहे. कोणत्या वेळीं काय होईल याचा नेम च नाहीं. या प्रगतीनें मोहित होऊन माणूस सैरावैरा धांवायला लागेल. त्याची आपल्या जीवनाशीं फारकत होईल. हें होऊं न देण्यासाठीं विज्ञानांत मानवी मूल्यांचें स्थान अढळ राहिलें पाहिजे. अहिंसा, सत्य, प्रेम, करुणा, दया या वस्तूंचें दर्शन प्रगत विज्ञानांत होणार नसेल तर जीवनांतून आनंद पार नष्ट होईल. आणि जीवनांतून आनंद नष्ट करणारें विज्ञान हि टिकाऊ ठरणार नाहीं.

विज्ञानाचा टिकाव रहायचा असेल तर त्याला आत्मज्ञानाचा हात धरून च चाललें पाहिजे. आत्मज्ञानाला साक्षी ठेवून त्यानें आपली प्रगति केली पाहिजे ही गोष्ट मान्य करणें अनिवार्य आहे. आणि हें मान्य केल्यानंतर पुढें अनेक गोष्टी ओघानें च प्राप्त होतात. पहिली कोणती गोष्ट होणार असेल अर आत्मज्ञान आणि विज्ञान या दोघांच्या कात्रींत मनाचे पार तुकडे तुकडे होऊन जातील. या दोघांचा माणसाला आदेश आहे : तुला आमचेबरोबर यायचें असेल तर या मनाची उपेक्षा केली पाहिजे. मनाचे वर उठले पाहिजे. या मनाचे नादीं लागशील तर तुझा हि नाश टळत नाहीं. मनाचा नाश म्हणजे विवेकाची जागृति. आणि विवेक जिथें जागृत होईल तिथें चित्तक्षोभाला वाव नाहीं.

या च अनुसंधानांत आम्हांला आमचा संकुचित स्वार्थ सोडावा लागेल. 'मी' 'माझें' यांना विज्ञान ओळखत नाहीं. आत्मज्ञानाचे तर हे कट्टर शत्रु च. 'माझें घर' यावरून 'माझें राष्ट्र' यावर येऊन विश्रांति घ्यायला आतां फुरसत च नाहीं. एकदम 'माझें विश्व' यावर येऊन धडकलें पाहिजे. राष्ट्रवादाला तिलांजलि देऊन विश्वराष्ट्र बनवण्याचा काळ येऊन ठेपला आहे. विज्ञान-युगांत ग्रामराज्य आणि विश्वराष्ट्र या दोन च गोष्टी असतील.

व्यवहारांत माणसाच्या सेवेला विज्ञान हजर होतें तें मुख्यतः यंत्राच्या स्वरूपांत. परंतु विज्ञान आणि यंत्र या दोन भिन्न वस्तू आहेत.

विज्ञान स्वत: तटस्थ आहे. सत्याप्रत मार्गदर्शन करणें हें त्याचें काम. आणि यंत्र बनवतांना त्या मागें विचार येतो, हेतु येतो, भावना येतात. हे विचार, हेतु, भावना देश काल परिस्थिति यांना अनुकूल असतील तर च योग्य सेवा होऊं शकेल. देशांतील आर्थिक, भौगोलिक परिस्थिति, लोकसंख्या यांच्यावर यंत्राचें स्वरूप अवलंबून राहिलें पाहिजे. विज्ञानानें किती हि प्रगति केली तरी मनुष्याचें मनुष्यत्व नष्ट कण्याची ताकद त्याच्यांत येणार नाहीं. आजच्या या अणु-युगांत देखील जात्यांतून च पीठ पडतें हें विसरून चालणार नाहीं. तेव्हां विज्ञानाच्या प्रगतींत देखील त्यांतील क्रम ठरवण्याचें दायित्व शेवटीं माणसावर च येतें.

विज्ञानाच्या प्रगतीबरोबर त्याची व्यापकता वाढत जाईल. प्रत्येक व्यक्तीशीं त्याचा संबंध येणार. तेव्हां सामान्य माणसाला हि सामान्य विज्ञानाची माहिती असणें जरूर आहे. वैज्ञानिक-युगांतली समाज-रचना अतिशय विकेन्द्रित बनणें आवश्यक आहे.

आध्यात्मिक साधनेंत विषयभोगांतून सुटका कशी व्हावी ही एक मोठी समस्या च ठरते. पण इथें विज्ञान मदतीला येतें. **"अस्वाद साधाया मुख्य हें विज्ञान, जाऊं त्या शरण विन्या म्हणे"** आम्ही आवडीनें जे पदार्थ खातों त्याचें पोटांत गेल्यानंतर काय होतें हें विज्ञान तुम्हांला सांगतें. ज्या पदार्थांवर आमचें प्रेम आहे ते च पदार्थ आमच्या नाशाला कारणीभूत होत आहेत असें समजल्यावर ते खाण्याचा मोह आपोआप च नष्ट होणार. यांतून च प्रेय ऐवजीं श्रेय खावें ही बुद्धि निर्माण होणार. आणि हा च अस्वाद.

सर्व सूक्ष्म, स्थूल रोगांवर विज्ञान औषध सांगेल पण त्याबरोबर च माणसाला आपल्या शरीराचें इतकें ज्ञान अवगत झालेलें असेल कीं औषधाचें प्रयोजन त्याला कमींत कमी पडावें. देहेंद्रियांच्या सूक्ष्म ज्ञानामुळें त्याला ही गोष्ट हि कळून चुकेल कीं निसर्ग, वनस्पति, शेती, माती यांच्याशीं निकट संपर्क ठेवणें अनिवार्य आहे. साहजिक च हवा आणि पाणी ज्याप्रमाणें सर्वांच्या मालकीचीं आहेत त्याप्रमाणें जमीन हि सर्वांच्या मालकीची [illegible] सिद्धान्त त्याला आपोआप च उमजेल.

एकूण--एकीकडे आत्मज्ञान आणि दुसरीकडे विज्ञान. एकीकडे मानवता, दुसरीकडे अणुशक्ति. विनोबा म्हणतात, अणूच्या संहारशक्तीची मला चिंता नाहीं.ईश्वराला च संहार करण्याची इच्छा असेल तर विनोबाच्या हातांत देखील तलवार, बंदूक येईल. पण आज ती परिस्थिति नाहीं. मुख्य वस्तु ही आहे कीं माणसाच्या हातीं जी सर्जन-शक्ति आली आहे--स्रष्टाशक्ति आली आहे--त्याचा उपयोग द्रष्टा बनून केला पाहिजे.

आमचे प्रधानमंत्री नुकते च लंकेंत गेले असतां म्हणाले होते--

> "मला हें जाणवतें कीं विज्ञानांत अनेक गुण आहेत, त्यापासून आम्हांला खूप फायदा होणार आहे. परंतु विज्ञानानें माणसाच्या आणि समाजाच्या नैतिक व आध्यात्मिक गरजा भागत नाहींत. विज्ञानापेक्षां दुसऱ्या कोणत्यातरी गोष्टीची आम्हांला अधिक गरज भासत आहे. विनोबाजी म्हणतात, राजनीति आणि धर्म यांचा काळ आतां राहिला नाहीं. आतां आध्यात्मिकता आणि विज्ञान यांची आवश्यकता आहे."

त्यानंतर बंगलोरच्या 'विश्वनीडम्' मधें त्यांनीं अशाच प्रकारचे उद्गार काढले होते. अध्यात्मवाद्यांना आव्हान दिलें होतें--

> "विनोबाजींचें आध्यात्मिकता अणि विज्ञान या बाबतचें म्हणणें मला बरेच विचार करायला लावत आहे. या दोहोंचा मेळ असला पाहिजे. ठीक आहे. जर तुम्हांला वाटत असेल कीं विज्ञानावर अध्यात्माचा वरचष्मा असला पाहिजे तर तुमच्या (साधकांच्या) जीवनांत हि विज्ञानाचें स्थान असलें पाहिजे. विज्ञानाचा परिणाम तुमच्या जीवनावर होऊं दिला पाहिजे. तुम्ही तुमच्या प्रयोगानें विनोबांचें म्हणणें सिद्ध करून दाखविलें पाहिजें."

आत्मज्ञान आणि विज्ञान यांचे एकमेकांशीं काय संबंध राहतील याविषयीं आणखी स्पष्टता विनोबांच्या प्रत्यक्ष भाषणांतून च अधिक होईल. वाचक ते वाचण्यासाठीं उत्सुक झाले असतील. पुस्तक समोर च आहे.

जय जगत्

## मानव-पक्ष्याचे दोन पंख : आत्मज्ञान आणि विज्ञान. : १ :

तुम्ही सर्व जण माझें बोलणें ऐकण्याच्या उत्सुकतेनें एवढ्या मोठ्या संख्येनें इथें एकत्र झालां आहांत. मीं कांहीं गोष्टी तुम्हांला ऐकवाव्यात असें तुम्हांला वाटतें आणि माझी हि तशी इच्छा आहे. पण तुम्ही ऐकणारे कोण आणि मी बोलणारा कोण ही देखील एक विचार करण्या-सारखी गोष्ट आहे. तुम्ही कानांनीं ऐकाल आणि मी तोंडानें बोलेन. कारण कानांनीं ऐकलें जातें आणि तोंडानें बोललें जातें. पण खुद्द कान ऐकत नाहीं, ऐकणारा आंत कोणी वेगळा च आहे. तसें च बोलणारा पण जिभेहून वेगळा आहे. तो च बोलण्यासाठीं जिभेचा उपयोग करून घेत असतो. जर कान नसते तर जो ऐकणारा आहे तो ऐकूं शकला नसता. त्या च प्रमाणें ऐकणारा कोणी नसता तर फक्त कान ऐकूं शकले नसते. बोलणारा नसता तर जीभ बोलूं शकली नसती आणि जीभ नसती तर बोलणारा बोलूं शकला नसता. हा एक संयोग आहे. एकटी कोणती च वस्तु नाहीं. आमच्यांत दोन भाग आहेत. एका भागाचा आम्हीं औजारा-प्रमाणें उपयोग करतों. दुसरा भाग म्हणजे खुद्द उपयोग करणारा. दोन्ही मिळून एक वस्तु उभी होते.

### सर्व सृष्टींत दोन भाग.

प्रत्येक व्यक्तींत आणि सृष्टींत दोन प्रकारचे मसाले आहेत. सोयीसाठीं एकाला 'देह' म्हणतात आणि दुसऱ्याला 'आत्मा.' पण नांव कोणतें हि असो; त्याचें स्वरूप शब्दांत सांगणें कठिण आहे. प्रत्येक जण दोहोंचा अनुभव घेत असतो. देह आणि आत्मा दोहोंचा दृढ संबंध आहे. दोघांचें पोषण केल्याखेरीज, दोघांना आपापलें खाद्य दिल्याशिवाय, माणसाचें समाधान होऊं शकत नाहीं आणि आनंद हि प्राप्त होत नाहीं. ही गोष्ट ज्याला थोडा विचार आहे त्याला सहज उमजेल. म्हणून शरीर आणि आत्मा दोहोंना कांहीं ना कांहीं द्यावें च लागतें.

आपापल्या विकासांत कोणी शरिराच्या पक्षांत जास्त झुकतो तर कोणी आत्म्याच्या पक्षांत. जो शरिराच्या पक्षांत झुकतो त्याला 'सुखार्थी' म्हणतात आणि आत्म्याकडे झुकणाराला 'आत्म्यनिष्ठ' म्हणतात. सुखार्थीला सुखाची अपेक्षा असते तर आत्मनिष्ठाला श्रेय किंवा कल्याणाची. पण श्रेय आणि सुख दोन्हींच्या इच्छा मात्र प्रत्येक मनुष्यांत असतात च. त्याचें परिमाण कमी जास्त असतें इतकें च. मनुष्य ज्या भूमिकेवर असतो त्यामानानें त्यांचें (सुख किंवा श्रेय यांचें) कमी अधिक परिमाण असतें. परंतु दोन्हींचें समाधान करण्यातें च त्याचें पूर्ण समाधान होतें, त्याला तृप्तीचा अनुभव येतो आणि त्याला वाटतें कीं मी योग्य जीवन जगत आहें.

## विज्ञान आणि आत्मज्ञान यांत निरंतर प्रगति

या दोन्ही अंगांच्या विकासासाठीं प्राचीन काळापासून मानव प्रयत्न करीत आला आहे आणि आज हि करत आहेत. त्याला शरिरासाठीं विज्ञानाची आणि आत्मकल्याणासाठीं आत्मज्ञानाची मदत मिळत गेलेली आहे. दोन्ही विद्यांचा विकास मनुष्यानें केला आहे. हिंदुस्थानांत आणि बाहेर हि प्राचीन काळापासून आजपर्यंत आत्मज्ञानांत आणि विज्ञानांत शोध होत गेले. विज्ञानामुळें तऱ्हेतऱ्हेचीं सुख-साधनें माणसाला मिळालीं, सुखसाधनांचा विस्तार झाला. ते शोध निरंतर प्रगत होत आहेत. प्राचीन लोकांपेक्षां आज आमच्या जवळ उपभोगाच्या वस्तु पुष्कळ जास्त प्रमाणांत आहेत. ज्या भोग्य वस्तूंची आम्ही कल्पना हि केली नव्हती त्यांचा आज रोज भोग घेत आहोंत. पूर्वींच्या लोकांनीं कधीं कल्पना हि केली नसेल कीं आम्ही दूरच्या बातम्या घरबसल्या ऐकूं शकूं. पण आज इथें बसून दिल्लीच्या बातम्या ऐकणें नित्याचा कार्यक्रम झाला आहे.

मनुष्याच्या या एका अंगाचा खूप विकास झाला. दुसऱ्या अंगाचा पण त्यानें विकास केला. त्यासाठीं आत्मज्ञान प्राप्त केलें, आत्म्यांत डुबकी मारली. मानवाचा आत्मा सत्यनिष्ठा, समत्वबुद्धि, न्यायवृत्ति, दया, प्रेम, वात्सल्य अनेक गुणांनीं परिपूर्ण असतो. आकाशांत अनंत तारे असतात त्याप्रमाणें आत्मा देखील अनंत गुणांनीं परिपूर्ण आहे. त्यांतील कांहीं गुणांचें भान मनुष्याला झालें आहे. त्याला सत्य आणि प्रेमाचें कांहींसें

भान झालें आहे, पण पुरें नाहीं. प्रेमाच्या विकासासाठीं त्यानें कुटुंबें बनविलीं, समाज बनवला, राज्य बनवलें, वेगवेगळीं नियंत्रणें आणि मर्यादा बनवल्या. तरी हि त्याचा पूर्ण विकास झालेला नाहीं. तो चालू च आहे. आत्म्याचे कित्येक गुण असे आहेत कीं ज्यांचें अद्याप भान देखील झालेलें नाहीं. ज्यांचें भान झालेंसें वाटतें त्यांचें हि अजून पुरें भान झालेलें नाहीं. मनुष्यरूपी पक्ष्याचे दोन पंख आहेत : (१)आत्मज्ञान आणि (२) विज्ञान. या दोन पंखांनीं तो विहार करीत असतो. त्यांतला जर एक देखील पंख तुटला तर त्याचा विहार संपला. म्हणून ह्या दोन्ही पंखांची मनुष्याला अत्यंत जरूर आहे.

## भारतांत आत्मज्ञानाचा आणि युरोपांत विज्ञानाचा विकास.

प्राचीन काळीं या भारत-भूमींत विज्ञान होतें च, तथापि आध्यात्मिक तृष्णा अधिक होती. त्या लोकांनीं आत्मगुणांचा शोध लावला. त्यासाठीं देहाला पीडा देऊन मोठ्या तपस्या केल्या. तो वारसा आम्हांला मिळाला आहे. या गोष्टीचा आम्ही अभिमान बाळगतों. इतर देशांत आध्यात्मिक ज्ञान नव्हतें अशांतली गोष्ट नाहीं, पण इथें तें अधिक होतें, जिज्ञासा हि अधिक होती; म्हणून संशोधन जास्त होऊं शकलें. दुसऱ्या देशांत, खास करून पश्चिम देशांत, या तीनशें वर्षांत विज्ञानाचा अधिक विकास झाला. म्हणून च आज मनुष्यापुढें दोन्ही गोष्टी उभ्या आहेत. विज्ञानानें खूप सुख-विस्तार केला आहे. इतका पूर्वीं कधीं हि झाला नव्हता. या दोन्ही विद्यांचा आम्हांला आमच्या जीवनांत उपयोग करून घ्यायचा आहे.

## वेदान्त व विज्ञान यांच्या आधारें शांति व समृद्धीची स्थापना

आज खेड्यांना प्रतिष्ठा नाहीं. ती प्रतिष्ठा आपल्याला आणायची आहे. ग्रामीण जीवन शांतिमय आणि समृद्ध बनवायचें आहे. शांति आणि समृद्धि या दोन्ही गोष्टी आम्हांला खेड्यांत न्यायच्या आहेत. शांति आत्मज्ञानानें, वेदांतानें येणार आणि विज्ञानानें समृद्धि येणार. वेदान्त आणि विज्ञान या दोन गोष्टींची आम्हांला सांगड घालायची आहे. म्हणून च मी म्हणतों कीं खेड्यामधें सगळ्यांनीं मिळून शेती केल्याशिवाय प्रगति

होणार नाहीं. विज्ञान सांगत आहे कीं जमीन एक करून गांवाची योजना कराल तर च समृद्धि येईल. आणि वेदान्त सांगत आहे कीं जमीन एक करून एकमेकांवर प्रेम केल्याशिवाय, सहकार्यानें वागल्याशिवाय शांति येणार नाहीं. या दोन गोष्टी आणायच्या म्हणजे खेड्यांनीं प्रेमानें ग्रामदान करायचें.

आज शहरांत समृद्धि असून हि शांति नाहीं. लोक सांगतात, हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें दारिद्र्याची समस्या आहे त्याप्रमाणें पश्चिमेकडे समृद्धीची समस्या आहे. समृद्धि कशी जिरवावी हें तेथील लोकांना कळत नाहीं त्यामुळें अशांति निर्माण होते. तिथें आत्मज्ञानाचा आधार नसल्यामुळें अशांति निर्माण होते आणि आपल्याकडे विज्ञान तर नाहीं च आणि शिवाय आपण आत्मज्ञान हि गमावलें असल्यानें समस्या च समस्या निर्माण झाल्या आहेत. पुष्कळांना असा भ्रम आहे कीं आमच्या जवळ आत्मज्ञान आहे पण ती गोष्ट खरी नाहीं. आपल्याजवळ फक्त त्याची श्रद्धा आहे. ती वस्तु मात्र अद्याप आपल्या जीवनांत आलेली नाहीं. घरांत वीज आहे, पण बटन दाबलेलें नाहीं. प्रकाश असून आपण तो गमावला आहे. आणि विज्ञान तर इथें आलें च नाहीं. तें सारें अजून इंग्रजींत च आहे. तें मातृभाषेंत आलें म्हणजे खेड्यापाड्यांत पसरेल. आपल्याला वेदांत आणि विज्ञान या दोहोंच्या आधारावर भारतांत आणि जगांत शांति व समृद्धि यांची स्थापना करायची आहे.

**रांची,**

२९-११-१९५२,

आणि दुसऱ्या प्रवचनावरून.

## अध्यात्मज्ञान अजून पूर्णतेला पोंचलेलें नाहीं : २ :

तुमचा हा गांव एका महापुरुषाच्या नांवानें प्रसिद्ध आहे आणि गोव्याच्या सत्याग्रहामुळें हि अनेकांना या गांवाच्या नांवाचा परिचय झाला आहे. महापुरुषांच्या नांवानें हिंदुस्थानांत अशीं अनेक गांवें ठिकठिकाणीं आहेत. परमेश्वराच्या कृपेनें अनेक सत्पुरुष हिंदुस्थानांत होऊन गेले. त्यामुळें निरनिराळ्या प्रांतांत त्यांच्या नांवानें अशीं गांवें आहेत. भूदानयात्रेच्या निमित्तानें अशा अनेक सत्पुरुषांच्या गांवांना जाण्याचा अवसर मला फुकटांत च मिळतो आणि हें पुण्य आपोआप च माझ्या पदरीं बांधलें जातें. परंतु अशा गांवीं मी जेव्हां जेव्हां गेलों तेव्हां प्रत्येक वेळीं माझ्या मनांत एक विचार नेहमीं येई. तो च विचार आज हि आला कीं असे सत्पुरुष आमच्या गांवांत, देशांत होऊन गेलेले असतांना या गांवांची अशी दशा कां ? आमच्या चित्तावर, समाजावर सत्पुरुषांच्या जीवनाचा कांहीं च परिणाम झाला नाहीं काय ?

आतां हें खरें आहे कीं, आज महाराष्ट्रांत शालेय पुस्तकें जितकीं खपतात, त्यांच्या खालोखाल ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा इत्यादि आध्यात्मिक ग्रंथ खपतात. त्यांचें वाचन आजतागाईत चालू आहे. आतां अलिकडे सर्वोदय-साहित्य असें च खपूं लागलें आहे. निरनिराळ्या प्रांतांत त्या त्या भाषेंत सर्वोदय-साहित्य आहे तें खपत आहे. तेव्हां सत्पुरुषांचें अस्तित्व फुकट गेलें आहे आणि लोकांना त्यांचें आकर्षण उरलें नाहीं असें नाहीं. उलट लोकांना सत्पुरुषांचें च आकर्षण आहे. असें असून सुद्धां ही दुर्दशा कां ? समाजांत साम्ययोग कां दिसत नाहीं ? विषमता कां आहे ? याचें कारण तपासलें पाहिजे.

### वैज्ञानिक नम्र आहेत

याचें एक कारण आध्यात्मिक आहे असें मला वाटतें. म्हणजे आमच्या आध्यात्मिक चिंतनांत एक दोष राहिलेला आहे. महापुरुषांचा दोष नाहीं. त्यांचा विचार समजणें व समजावून सांगणें यांत दोष राहून गेला आहे.

पुष्कळांचा समज असा आहे कीं, अध्यात्मज्ञान पूर्णतेला पोंचलें असून आतां त्यांत आणखी कांहीं प्रगति व्हायची राहिली नाहीं. वेदांत आणि संतांच्या अनुभवांत अध्यात्मशास्त्र हिंदुस्थानांत परिपूर्ण झालें आहे. विज्ञान मात्र पूर्ण कधीं च झालें नाहीं, असें वैज्ञानिक नम्र होऊन सांगत असतात. ते म्हणतात आमची प्रगति फार च थोडी, सिंधूमधें बिंदू इतकी झाली आहे. जरी आज स्पुटनिक फेकला जात आहे, चंद्रावर स्वारीच्या गोष्टी होत आहेत, तऱ्हे-तऱ्हेची शक्ति मानवाला उपलब्ध झालेली दिसत आहे, तरी हि हें सृष्टीचें ज्ञान अनंत आहे. त्याच्या अंशमात्र हि ज्ञान आमच्या हातीं आलें नाहीं असें विज्ञानवादी सांगतात.

## अध्यात्मांतला दोष

याच्या उलट अध्यात्मवादी काय सांगत असतात कीं, अध्यात्मज्ञान पूर्ण झालें आहे. त्यांत प्रगति व्हायची उरली नाहीं. त्याचा अंतिम अध्याय लिहून त्याच्या खालीं 'समाप्तम्' अशी रेघ हि ओढली आहे. त्यांत कांहीं जोडायचें राहिलें नाहीं. असें म्हणणें ही एक फार मोठी भूल झाली आहे. ज्याप्रमाणें विज्ञान वाढत आहे, त्यांत नवीन शोध लागत आहेत व पुढें हि लागतील; त्याचप्रमाणें अध्यात्मांत हि असे शोध लागणार आहेत व ते हि वाढत राहणार आहे. आजपर्यंत जी अध्यात्मविद्या आपल्या हातीं आली आहे ती अंशमात्र आहे. म्हणून जुन्या लोकांनीं जें लिहून ठेवलें आहे तें च पुन्हां पुन्हां वाचायचें आणि त्यांच्या च कथा निरनिराळ्या तऱ्हेनीं सांगत रहायच्या हें बरोबर नाहीं. एकाची गाथा वाचली कीं दुसऱ्याची वाचायची च नाहीं, असें कां ? तर म्हणे एका गाथेंत जो अनुभव आहे तो च इतर गाथांत आहे. त्यामुळें अध्यात्माची प्रगति कांहीं झाली नाहीं. अध्यात्मांत नवीन नवीन शोध करण्याचे प्रयत्न झाले नाहींत तर ती विद्या कुंठित होईल. आणि तसें च आपल्या देशांत झालें आहे. ही एक फार मोठी न्यूनता राहून गेली. आजपावेतों जें हातीं आलें आहे तें परिपूर्ण आहे असें म्हणतां येत नाहीं. अनुभवाचीं कितीतरी स्थानें अजून शिल्लक उरलीं आहेत. असें असून हि त्या ज्ञानाला, त्या विद्येला परिपूर्ण मानलें गेलें. हा एक फार मोठा दोष राहून गेला आहे.

## विज्ञानाचे दोष अनुभवानें सुधारतात

विज्ञानांत हि कांहीं दोष असतात पण ते नंतर अनुभवानें सुधारतात. एक काळ असा होता कीं, सूर्य पृथ्वीच्या भोंवतीं फिरत आहे असें वैज्ञानिक मानत होते. त्यांना माहीत होतें कीं पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत आहे असें म्हणणारे वैज्ञानिक आहेत. परंतु ते मोठा छान तर्क करीत, सुंदर उदाहरण देत. ते म्हणत पृथ्वी जर सूर्याभोंवतीं फिरत असती तर सकाळीं आपलें घरटें सोडून गेलेले पक्षी सायंकाळीं पुन्हां आपल्या घरटयांत परत कसे आले असते ? कारण, तेवढया वेळांत तर पृथ्वी कितीतरी पुढें निघून गेली असेल ! असा उत्तम पुरावा देऊन सूर्य च पृथ्वीभोंवतीं फिरतो आहे असें ते सिद्ध करीत. परंतु त्यांतला दोष लक्षांत आला व वैज्ञानिकांनीं पुढें ती चूक सुधारून घेतली. चुका होतात. त्या सुधारल्या पाहिजेत. आतां अध्यात्मांत हि नवीन ज्ञान प्राप्त करायचें आहे ती गोष्ट वेगळी च आहे. परंतु जुनें जें ज्ञान प्राप्त झालें आहे त्यांत एक चूक राहून गेली आहे कीं त्यामुळें आपल्या महापुरुषांचा प्रभाव सामाजिक जीवनावर पडत नाहीं.

## या चुकीचा अर्थशास्त्रावर हि परिणाम

या चुकीमुळें अर्थशास्त्रांत माणसानें संकुचित वृत्ति बनवली आहे. माझें घर, माझें शेत, माझें धन, माझी जात, माझ्या घराचें भलें, माझ्या राष्ट्राचें भलें. 'माझ्या' पलीकडे तो विचार च करीत नाहीं. यांत काय होतें ? एका व्यक्तीची संपन्नता दुसऱ्या व्यक्तीला बाधक होऊं शकते. मी जर संपन्न झालों तर त्या विरुद्ध काय उभे राहतें ? दुसऱ्याची विपन्नता. पण त्याच्या विपन्नतेंत जशी माझी संपन्नता तशी दुसऱ्याची संपत्ति ही माझी विपत्ति होऊं शकते. असा विरोध अर्थशास्त्रांत निर्माण होतो. आजचें जें पुढें गेलेलें अर्थशास्त्र आहे त्याला राष्ट्रीय अर्थशास्त्र म्हणतात. त्याचा अर्थ काय ? म्हणजे दुसऱ्या राष्ट्राचा विरोध करून आपल्या राष्ट्राला संपन्न करावें. अर्थशास्त्रांत व्यक्तिगतता आणि संकुचितपणाचा हा दोष जसा येतो तसा च दोष परमार्थांत हि येतो. माझा स्वार्थ, माझें सुख असें म्हणण्यांत जसा विचार-दोष आहे, इतरांपासून वेगळें तोडणें आहे त्याच प्रमाणें माझी मुक्ति, हा आध्यात्मिक व्यक्तिवाद, स्वार्थवाद आहे.

ही टीका मी च आतां करतों असें नाहीं, तर जुन्या काळीं हि हा दोष ध्यानांत आला होता, आणि त्यावर मोठमोठ्या पुरुषांनीं टीका हि केली होती. परंतु इतकें होऊन सुद्धां हा दोष सुधारला गेला नाहीं. प्रह्लादाचें वाक्य प्रसिद्ध आहे. ज्यावेळीं त्याच्यासमोर नृसिंहाची मूर्ति उभी झाली तेव्हां तो म्हणाला:

> **प्रायेण देवमुनयो स्वविमुक्तिकामा: ।**
> **मौनं चरन्ति विजने न परार्थनिष्ठा: ।।**
> **नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षुरेक: ।।**

बहुधा देव आणि मुनि स्वमुक्तीची कामना करणारे असतात. परंतु मी या दीनजनांना सोडून एकटा च मुक्त होऊं इच्छित नाहीं, असें नृसिंह-मूर्तीला प्रह्लाद धीटपणानें सांगतो. सगळ्यांना सोडून मी एकटा मुक्त होऊं इच्छित नाहीं ही प्रह्लादाची टीका अजून हि आम्हांला लागू आहे. कारण आम्ही अजून हि कांहीं सुधारणा केलेली नाहीं. 'माझी मुक्ति' हे दोन्ही शब्द परस्पर विरोधी आहेत. 'मी,' 'माझें' आहे तोंवर मुक्ति नाहीं. मीं ज्ञानी व्हावें व इतरांनीं मात्र अज्ञानांत रहावें या विचारांत मीं आपली मुक्ति गमावतों हें अजून लक्षांत आलेलें नाहीं.

## सिद्धीप्राप्ति हा हि एक पूंजीवाद

'माझ्या' साधनेंत 'मी' पक्का व मजबूत होत जातों. म्हणून कांहीं सिद्धि मिळवल्या तरी त्या हट्टानें च मिळवलेल्या असतात. हट्टाला पेटून पैसा मिळवावा तसें च हें. साधक हि एक प्रकारचा पूंजीपति होतो. सिद्धि लाभलेले, चमत्कार करणारे पुरुष साधु समजले जातात. लोक त्यांच्याकडून स्वार्थ साधूं पाहतात आणि ते हि समाजाकडून स्वार्थ साधूं पाहतात. अशा प्रकारें हिंदुस्थानांत जी परमार्थ-साधना झाली त्यांत सूक्ष्म स्वार्थ होता. म्हणून असें म्हणतां येईल कीं ती परमार्थ-साधना च नव्हती. आतां हें खरें कीं पैसे मिळवण्याच्या साधनेपेक्षां ती अधिक उच्च दर्जाची होती. दरजा वरचा होता पण दोन्हींची जात एक च होती

## साधनेच्या नांवावर स्वार्थ

जोंपर्यंत साधनेची खोली लाभली नाहीं तोंपर्यंत साधनेच्या नांवावर स्वार्थ साधतो. तो फार सूक्ष्म स्वार्थ असतो. त्याला पारमार्थिक किंमत नसते. समाजाचें उत्थान करण्याचें सामर्थ्य हि त्यांत नाहीं, किंवा व्यक्तीची उन्नति हि त्यानें होत नाहीं. परंतु त्यांत हि माणसाला एक प्रकारचें समाधान असतें. पण हें समाधान एखाद्या मरणोन्मुख माणसाच्या समाधानासारखें असतें. मरणाच्या वेळीं माणूस, मुलें बाळें सुखांत पाहून वासनारहित होऊं शकतो. सुखासमाधानानें तो मरतो. अशा माणसाला काय मुक्त माणूस म्हणायचें ? असलें सुख समाधान साधकाला तपामुळें मिळणार असेल तर त्याची कांहीं फार किंमत नाहीं. कारण तें समाधान मिळालें. ––पुढें काय ?–'ततः किम्' असा प्रश्न राहतो च.

## 'मी' ऐवजीं 'आम्ही'

साधनेंतील मुख्य गोष्ट 'मी' ला तोडावयाचें. 'मी' ला कसें तोडायचें? 'आम्ही' नें. वास्तविक 'मी' हा 'तूं' नें तोडायचा. 'तूं' म्हणजे परमेश्वर. परंतु परमेश्वर कुठें उपलब्ध आहे ? तो दिसतो कुठें ? कोणत्यातरी कोपऱ्यांत, वैकुंठांत लपलेला आहे. त्याचा कांहीं पत्ता च लागत नाहीं. म्हणून ईश्वर ही कोटी अव्यक्त च आहे. 'मी' जाईल तेव्हां 'तूं' येईल. तेव्हां 'तूं' 'मी' ला तोडणार कसा ? म्हणून 'मी' 'आम्ही' नें तोडायचा हें च उत्तम. मग 'आमची' साधना, 'आमची' भक्ति असें होईल. यानें व्यक्ति व समाज दोन्हींचें उत्थान एकदम च साधेल. खऱ्या अर्थानें ती साधना होईल.

## सामाजिक समाधि

बंगालमधें रामकृष्णांना जेथें प्रथम समाधि लागली होती त्या स्थानावर बसून मीं सांगितलें होतें कीं रामकृष्णांनीं जी समाधि अनुभवली ती सामाजिक बनवणें हें माझें काम आहे. 'सामाजिक समाधि' एवढा शब्द मीं उच्चरला कसा ? "**समाधि हरीचि, समसुखेंविण, न साधेल जाण द्वैतबुद्धी । बुद्धीचें वैभव, अन्य नाहीं दुजे ।**" म्हणजे सर्वत्र सुख-साम्य योजल्याशिवाय

'हरीची समाधि' लाभणार नाहीं. भेदभावाचें निर्मूलन करून सुख-साम्य संपादण्यांत बुद्धीचें वैभव आहे. म्हणजे समाधीचें सामाजिक रूप आहे आणि समाधि नेहमीं सामाजिक च होऊं शकते. अर्थात् च त्यांत व्यक्तिगत समाधि हि येते च. 'अहं' चा लोप झाला म्हणजे तो समाजरूप झाला. म्हणजे त्याचा नवीन कार्यक्रम सुरू झाला. तो आतां निरहंकारी होऊन व्यापक समाजकार्य करील. जोंवर त्याचा अहंकार गेला नव्हता तोंवर तो पाण्यांतील खड्याप्रमाणें पाण्यापासून वेगळा राहत होता. आतां मिठाच्या खड्याप्रमाणें पाण्यांत विरघळून गेला. त्याचा खडेपणा नाहींसा झाला, तो अधिक व्यापक झाला, द्रवरूप झाला. अहं लोपला. तो समाजमय, लोकमय, सृष्टिमय झाला. मुक्ति म्हणजे व्यापक कार्याचा आरंभ.

ही च गोष्ट दुसऱ्या बाजूनें विज्ञानानें साधली. हें लक्षांत घेऊन वागलें पाहिजे.

## विज्ञानानें 'मी' व 'माझें' संपवलें

आज विज्ञानांत इतकी प्रगति झाली आहे कीं एका मनुष्याचा डोळा बिघडलेला असेल, तर त्याच्या जागीं नुकत्या च मेलेल्या दुसऱ्या माणसाचा चांगला डोळा बसवला जातो. आतां तो मनुष्य काय 'माझा डोळा' असें म्हणूं शकेल ? कोणाला कुष्ठरोग झाला आणि त्याचा पाय सडला तर त्याचा पाय कापून काढून त्याच्या जागीं ताबडतोब मेलेल्या माणसाचा पाय बसवला जातो आणि तो चालायला लागतो. तर काय मग तो 'माझा पाय' म्हणेल ? विज्ञानाची ही करामत आहे कीं ज्याप्रमाणें एका मोटारचें चाक दुसऱ्या मोटारला लावूं शकतों त्याप्रमाणें एका व्यक्तीचा अवयव दुसऱ्या व्यक्तीला लावूं शकतों. आतां विज्ञान आणखी प्रगति करेल तेव्हां 'मी' 'माझें' चालणार नाहीं.

## विज्ञान-युगांत सत्याग्रह 

### जगावर विज्ञानाचा प्रभाव पडतो

बापू मोठ्या विनयानें म्हणत असत कीं सत्याग्रहाचा थोडासा च अंश मला समजला आहे. सत्याग्रह हें मोठें गहन शास्त्र आहे. यांत अजून कितीतरी शोध व्हायला हवा आहे.––बापूंचें हें विधान केवळ विनयाचें च नाहीं तर अगदीं यथार्थ आहे. आम्ही आजवर सत्याग्रहाचे जे प्रयोग केले ते अंधारांत चांचपडण्यासारखे होते; त्यांतून लख्ख प्रकाश दिसला नाहीं. थोडेसे प्रकाश-किरण मिळाले, त्यांच्या च आधारानें पुढें जात राहिलों.

आतां लोकशाही स्थापन झाल्यानंतर सत्याग्रहाचें स्वरूप कसें असावें इत्यादि प्रश्नांसंबंधीं मीं पूर्वीं कांहीं सांगितलें आहे. पण लोकशाही एक लहानशी वस्तु आहे. जीवनाला घडवणाऱ्या तीन मुख्य शक्ति आहेत––अध्यात्म-शक्ति, विज्ञान-शक्ति आणि शब्द-शक्ति किंवा साहित्य-शक्ति. बहुतेकांना असें वाटतें कीं जगावर प्रभाव पाडणाऱ्या व्यक्ति या मुख्यतः राजकारणी च आहेत. बाबर, सिकंदर, क्लाईव्ह, कोलंबस यांच्यासारख्या व्यक्तींचा प्रभाव जगावर विशेष पडला हें मानणें चुकीचें आहे. ज्या काळांत हे लोक होऊन गेले, त्या काळांत जीं वैज्ञानिक साधनें होतीं, तीं त्यांना प्राप्त झालीं होतीं. इंग्लंडजवळ जितकीं चांगलीं जहाजें होतीं, तेवढीं भारतापाशीं नव्हतीं. खुद्द शिवाजी देखील तलवारी पोर्तुगिजांपासून च खरेदी करीत होता. मराठींत तलवारीसाठीं 'फिरंगी' हा शब्द वापरला जाई. 'फिरंगीच्यापुढें वारवार विळे'. तलवारीच्यापुढें लहान लहान शस्त्रें काय टिकणार ? असा याचा अर्थ आहे. तेव्हां या व्यक्तींचा जो प्रभाव पडलेला दिसतो तो विज्ञान-शक्तीमुळें च. विज्ञान ही एक शक्ति आहे.

### आत्मज्ञान आणि साहित्य-शक्ति

जगावर प्रभाव पाडणारी दुसरी शक्ति आहे आत्मज्ञानाची. आणि आत्मज्ञान व विज्ञान या दोहोंच्या मधें राहून अनुसंधान जुळवणारा असतो

शब्द-शक्ति-संपन्न साहित्यिक. म्हणून तिसरी शक्ति आहे शब्दशक्ति किंवा साहित्यशक्ति

## सत्याग्रहाच्या शोधाकरिता अध्यात्मांत खोल जाण्याची गरज

सत्याग्रहासंबंधीं विचार प्रगट करतांना बापूंच्या काळांत येथें लोकशाही नव्हती असें मीं म्हटलें. त्यांच्या अखेरच्या दिवसांत भारतांत लोकशाही स्थापन झाली होती हें खरें आहे पण ती पूर्णत्वानें प्रस्थापित झाली नव्हती. आज मात्र लोकशाहीनें मूळ धरलें आहे. म्हणून च तेव्हांच्या व आजच्या परिस्थितीमधें फरक पडला आहे. पण सध्यां त्या गोष्टीचा विचार मी तात्पुरता सोडून देतों; आणि विज्ञानाच्या युगांत सत्याग्रहाचें स्वरूप काय राहील याबद्दल च सांगतों. एखादा मनुष्य काठी घेऊन धावून आला आणि समोरचा माणूस अतिशय दयाळू आहे असें त्याला दिसलें, तर काठी घेऊन येण्यांत आपण मूर्खपणा केला असें त्याला वाटेल. पण समजा, वरून एखाद्यानें बाँब फेकला किंवा घरीं बसल्या बसल्या एखाद्यानें तेथून च बाँब टाकला तर त्या बांब टाणाऱ्यावर त्याचा काय परिणाम होईल? उद्यां असें हि होईल कीं एखाद्या विमानाला मुंबईवर जाऊन आपटण्याची आज्ञा दिली जाईल आणि त्याप्रमाणें तें विमान मुंबईवर जाऊन आदळेल हि. अशा प्रसंगीं सत्याग्रह्यानें काय करावें ? सत्याग्रहीच्या नेत्रांतील करुणा व वाणींतील मार्दव, यांच येथें काय प्रभाव पडणार ? म्हणून ही विज्ञान-शक्ति आल्यामुळें आतां आपल्याला आध्यात्मिक क्षेत्रांत अधिक खोलखोल गेलें पाहिजे. प्राचीन काळचे लोक आध्यात्मिक क्षेत्रांत जितके खोलवर पोंचले, त्यापेक्षां हि अधिक खोलवर आम्हांला गेलें पाहिजे. आम्हांला हि घर बसल्या जगावर प्रभाव पाडणाऱ्या शक्तीचा विकास केला पाहिजे. असे करण्यावाचून सत्याग्रहाला आतां गति च नाहीं. हा गूढात्मवाद (Mysticism) नव्हे. गूढात्मवाद्यांचे जे अनुभव आहेत अगर भक्तांचे जे साक्षात्काराचे अनुभव आहेत ते सगळे आश्वासन मात्र आहेत, ते वस्तुतः साक्षात्कार नव्हेत. यालाच साक्षात्कारी दर्शन मानून जर एखाद्याला समाधान लाभलें तर तो अधिक गहन शोधापासून व दर्शनापासून वंचित च राहील. गूढात्मवाद हा हि एक मोठा च अनुभव आहे. अव्यक्त विश्वाशीं सरळ संबंध जोडला जाणें

किंवा साक्षात् संस्पर्श होणें ही हि मोठी च गोष्ट आहे. पण आतां एवढचानें भागणार नाहीं. आतां तर अणुशक्तीचा विरोध करूं शकेल अशा शक्तीचा शोध व्हायला हवा. देश, भाषा, धर्म, पंथ इत्यादींनीं सीमित झालेल्या चर्चा निरर्थक आहेत.

### माझा सत्याग्रह

पंढरपूरच्या देवळांत हरिजनांना प्रवेश मिळावा यासाठीं साने गुरुजींनीं सत्याग्रह केला होता. त्यापूर्वी ते पवनारला आले असतां त्यांनीं मला माझें मत विचारलें होतें. मी म्हणालों होतों, "माझा सत्याग्रह तर सुरू च आहे. विठ्ठलाच्या कोणत्या हि नव्या व जुन्या भक्ताच्या हृदयांत जेवढा विठ्ठल भरला असेल, तेवढा माझ्या हृदयांत आहे. या देवतेसंबंधींच्या सर्व साहित्याचा सखोल अभ्यास मीं केला आहे. एवढें असून हि उपवास करून मंदिर-प्रवेश मी घडवून आणणार नाहीं. जोंपर्यंत हरिजनांना तेथें प्रवेश नाहीं तोंपर्यंत मी हि तेथें प्रवेश करणार नाहीं. हा च माझा सत्याग्रह."

### सत्याग्रह-शोधाच्या मार्गावर

साने गुरुजींनीं ज्या प्रकारचा सत्याग्रह केला होता, त्या प्रकारचा सत्याग्रह करावा अशी माझी कधीं च धारणा नव्हती. त्या काळांत हि नव्हती. मग आज तर विज्ञान-युगांत आम्हांला हें कळलें पाहिजे कीं, मनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया ही मनाच्या भूमिकेवरून होणें च शक्य नाहीं. विज्ञानाच्या या युगांत जुन्यापुराण्या पद्धतींच्या कामाला कांहीं महत्त्व राहणार नाहीं. माझा हा विचार पूर्वींचा च आहे. आज विज्ञानाच्या प्रगतीमुळें तो अधिक स्पष्ट होत आहे.

आज काल मी असें सांगत असतों कीं धर्माची स्थापना अद्याप झालेली नाहीं च. लोकांच्या श्रद्धा बनल्या आहेत पण अजून सिद्धांत बनला नाहीं. सत्य-अहिंसेच्या बाबतींत हि ही च अवस्था आहे. कोणत्या हि परिस्थितींत सत्य चांगलें च आहे असें लोक मानीत नाहींत. म्हणजे सत्य चांगलें अशी श्रद्धा आहे पण केव्हां हि चांगलें असा सिद्धान्त नाहीं बनला. आतां विज्ञान हा धर्माचा आधार होईल, मनाच्या भूमिकेच्या

पलीकडे धर्म जाईल आणि मग धर्म व विज्ञान यांत कांहीं विरोध राहणार नाहीं. उलट त्यांच्यांत सामंजस्य उत्पन्न होईल.

हल्लीं माझें असें च चिंतन चालू आहे. म्हणून तीन वर्षांपूर्वी मी जितका पुरुषार्थी होतों तितका आज नाहीं. या अवस्थेला मी निवृत्ति म्हणतों. ही प्रवृत्ति-विरोधी निवृत्ति नाहीं. दुसऱ्या अर्थानें निवृत्तीकडे मी जात आहें. तो शक्तीचा शोध आहे. याला च मी सत्याग्रहाचा शोध म्हणतों.

## अतिमानस भूमिकेवरून

नुकतें च राजस्थानच्या एका माणसानें सत्याग्रहाच्या एका समस्ये-बद्दल माझें मत विचारलें. तेथील एका गांवांत हरिजनांना विहिरीवर पाणी भरूं द्या, असा त्याचा आग्रह चालला आहे. त्यासाठीं एकानें उपवास हि सुरू केला आहे. गांवकऱ्यांनीं सांगितलें कीं हरिजनांसाठीं एक वेगळी विहीर आम्ही बांधून देऊं. त्यांची 'ही सूचना मान्य करावी कीं उपवास चालू ठेवावा' असें मला विचारलें आहे. नवी विहीर बांधण्याची सूचना मान्य करावी असें च मी कळवणार आहे. विरोध करण्यासारखें समोर कांहीं आहे असें मानून व्यर्थ त्याच्याशीं टक्कर घेण्यांत काय अर्थ आहे ? जातिभेदाचें अस्तित्व मान्य करून जें जें केलें जाईल, त्यामुळें जातिभेद अधिक पक्का च होत जाईल. नव्या विहिरीवर हरिजन पाणी भरतील आणि इतर हि लोक भरतील. सगळ्यांची मिळून एक च जमात बनेल व हळू हळू त्यांच्यांत प्रेमभाव वाढू लागेल. हा सल्ला दुर्बल नसून शक्तिशाली आहे. कारण यामुळें मनाची भूमिका च नष्ट होऊन जाईल. ऊन संपलें कीं मृगजळ जसें आपोआप च नाहींसें होतें; त्याप्रमाणें हा सारा भेदभाव नाहींसा झाला आहे असें च दिसून येईल.

* * *

**प्रश्न**—आध्यात्मिक अ‍ॅटम बाँबचा शोध थोड्याच व्यक्तींना लावता येईल, नाहीं का ?

**उत्तर**—अणुशक्तीचा हि शोध थोड्या च व्यक्ति करतात. पण एकदा शोध लागल्यानंतर, त्याचीं जीं अवजारें बनतील त्यांचा उपयोग सगळ्यांना करता येईल.

**प्रश्न:**—आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत सत्याग्रह कोणत्या प्रकारचा करावा ?

**उत्तर:**—सत्याग्रह ही एक आध्यात्मिक शक्ति आहे. विज्ञानाची शक्ति मानस-शास्त्राला गौणत्व देते. म्हणून आतां अतिमानसाच्या भूमिकेवरून च सत्याग्रहाचा शोध करावा लागेल. मनुष्य मुळांत एक च आहे हा माझा विश्वास आहे. सगळीकडे विकासाच्या सारख्या च स्तरावर तो आहे. म्हणून एका च व्यक्तीच्या आत्म्यामधें प्रगट होणारी पण साऱ्या विश्वावर आपला प्रभाव पाडणारी शक्ति आज मिळविली पाहिजे.

वडगांव, जि. उस्मानाबाद

१२-६-५८

---

## विज्ञानाला आत्मज्ञानाचा अंकुश पाहिजे : ४ :

### विज्ञान श्रेष्ठ कीं आत्मज्ञान श्रेष्ठ ?

आज मंडळींनीं कांहीं चांगले प्रश्न विचारले आहेत, त्याची च मी आतां तुमच्या पुढें चर्चा करतों; म्हणजे विचाराला मदत होईल. त्यांनीं एक प्रश्न असा विचारला आहे कीं आजचें विज्ञान-युग आहे आणि आपल्याकडे अध्यात्मविद्येची वाढ झाली आहे तर आतां विज्ञान श्रेष्ठ कीं आत्मज्ञान श्रेष्ठ ? हा प्रश्न फार चांगला विचारला.

प्रथम विज्ञान म्हणजे काय आणि आत्मज्ञान म्हणजे काय हें जाणून घेतलें पाहिजे. यामधें अमका श्रेष्ठ आणि अमका कनिष्ठ असें कांहीं नाहीं. दोघांना हि एकमेकांची मदत होते. डोळा श्रेष्ठ कीं कान श्रेष्ठ असें विचारलें तर काय सांगणार ? सतार चांगली वाजते कीं नाहीं हें कान सांगेल. समोर झाड आहे कीं काय, वृक्षाचा रंग कसा आहे, हें डोळा सांगेल. दोन्हींची गरज आहे. दोन्ही मिळून परिपूर्ण ज्ञान उपलब्ध होतें. अध्यात्म सांगतें—दया करावी, सर्वांवर आपल्यासारखें च प्रेम करावें, कोणी दुःखी असेल तर त्याच्या मदतीसाठीं धावून जावें. पूर्वीच्या काळीं एखाद्याच्या

पोटांत दुखत असेल तर त्याला किती दुःख सहन करावें लागत असे ! परंतु आतां तावडतोड औषध देतात. त्यानें रोग बरा झाला तर ठीक, नाहीं तर गुंगीचें औषध देऊन ऑपरेशन करून व्याधि काढून टाकतात. ऑपरेशन करतांना त्याला कसला हि त्रास होत नाहीं. हें कशामुळें झालें ? विज्ञानामुळें. ही विज्ञानाची मदत झाली कीं नाहीं ? म्हणजे विज्ञानाची दयेला मदत झाली. अध्यात्मानें सांगितलें दया करा. विज्ञानानें त्याला मदत केली. म्हणून विज्ञान श्रेष्ठ नाहीं, तें आत्मज्ञानाला मदत करणारें आहे. समजा, भात करायचा आहे आणि तुम्ही विचारलें यांत अग्नि श्रेष्ठ कीं पाणी श्रेष्ठ ? तर काय सांगायचें ? भात करायचा म्हणजे दोन्ही पाहिजेत. त्यांत कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ट ! त्याप्रमाणें आत्मज्ञान हि पाहिजे आणि विज्ञान हि पाहिजे. दोन्ही मिळून काम चांगलें होतें.

## विज्ञान ही देवता आहे

पूर्वीं लोकांना अग्नीचा शोध लागला त्यावेळीं लांकडावर लांकडें घासून अग्नि पेटवीत असत. आतां त्या लहानशा आगपेटींत अग्नि राहतो. ती पेटी खिशांत हि ठेवता येते. पाहिजे तेव्हां अग्नि पेटवावा आणि आपलें काम करून घ्यावें. अग्नीच्या साह्यानें छान स्वयंपाक करता येतो. त्यामुळें अन्न पचायला पोटाला मदत होते. अग्नि नसता तर कच्चें धान्य खाणें किती कठिण गेलें असतें ! म्हणजे अग्नीची पचनक्रियेला मदत झाली. अग्नीचा शोध हा एक महत्त्वाचा शोध होता. त्यावेळीं तें एक नवीन विज्ञान च निघालें. आत्मज्ञानाला त्याची मदत झाली. विज्ञान कसें आहे ? तें न वाईट न चांगलें. आतां हा लाऊडस्पीकर पहा. त्याच्या समोर बसून समजा शिव्या दिल्या तर हा त्या शिव्या मोठ्यानें तुम्हांला ऐकवील, आणि भजनें म्हटलीं तर भजनें ऐकवील. जें कांहीं त्याच्यासमोर बोलाल तें तो मोठ्यानें ओरडेल. तो वाईट हि नाहीं, चांगला हि नाहीं. अग्नीचा घराला आग लावण्यासाठीं उपयोग केला तर तो वाईट ठरेल. स्वयंपाकासाठीं उपयोग केला तर तो चांगला ठरेल. तो स्वतः चांगला हि नाहीं, वाईट हि नाहीं. तो देव च आहे. देवाचें लक्षण हें आहे कीं जसा ज्याचा भाव तसा तो त्याला पावतो. जशी ही भूमि आहे. हिच्यामधें तंबाखु पेराल तर तंबाखु

उगवेल, आणि केळीं पेराल तर केळीं मिळतील. जें तिच्यांत पेराल तें तिच्यांत उगवेल. तशी विज्ञान ही देवता आहे. तुम्ही जसा तिचा उपयोग कराल तशी तुम्हांला पावेल.

आतां विज्ञानाचा उपयोग कसा करायचा, हें सांगायचें कुणी ? तें सांगायचें काम अध्यात्म-विद्येचें. शस्त्रांचा उपयोग जखमा बऱ्या करण्यासाठीं हि करता येतो आणि लोकांचे गळे कापण्यासाठीं हि करता येतो. तो कुठें करावा हें अध्यात्मविद्या सांगेल. जमिनींत काय पेरावें हें जमीन नाहीं सांगणार. ती म्हणेल तुम्ही तंबाखू पेराल तर मी तंबाखू देईन, केळीं पेराल तर केळीं देईन. ती तर देवता आहे. तिथें काय पेरावें हें अध्यात्मविद्या सांगेल.

## अध्यात्म व विज्ञान यांची जोड पाहिजे

विज्ञानामुळें हातांत शक्ति आली आहे, परंतु ती वापरावी कशी हें आत्मज्ञान सांगणार आहे. घोडा आहे. घोड्याला ताब्यांत ठेवलें, त्याला लगाम घातला, तर त्याच्यावर बसून रपेट करता येईल. नाहीं तर स्वार घोड्यावर बसण्याऐवजीं घोडा च स्वाराच्या छातीवर चढेल. कारण स्वाराला लगाम धरता आला नाहीं. त्याप्रमाणें घोडा म्हणजे विज्ञान आहे आणि लगाम म्हणजे आत्मज्ञान आहे. म्हणून विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड नसेल तर जगाचा संहार होईल आणि ती जोड दिली तर या पृथ्वीवर वैकुंठ उतरेल.

## ज्ञानदेवांची शिकवण च या काळीं उपयोगी

दुसरा फार चांगला प्रश्न असा विचारला आहे कीं ज्ञानदेवांची शिकवण त्या काळाला फार उपयोगी पडली हें खरें, पण आजच्या विज्ञान-युगांत त्यांची शिकवण उपयोगाची आहे काय ? ज्ञानदेवांची शिकवण त्याकाळीं उपयोगाची होती आणि आज हि ती उपयोगाची आहे. ज्ञानेश्वरांनीं अशी युक्ति साधली आहे कीं ती युक्ति तिन्ही काळीं उपयोगी पडावी. त्यांनीं असें सांगितलें कीं जीं पंचमहाभूतें आहेत––ही सृष्टि, ही वाफ, ही वीज, हे अणु-परमाणु––त्यांचा जर अक्कल ठिकाणावर ठेवून

उपयोग कराल तर ती तुम्हांला मदत करतील नाहींतर तीं तुमच्या बोकांडीं बसतील.

पूर्वीं चाकू हें एक हत्यार होते. त्याचा उपयोग केला तर काय एखादी जखम व्हायची. त्यानंतर तलवार, पिस्तुल अशीं उत्तरोत्तर तीव्र साधनें येत गेलीं. एकदा एका मुलाच्या हातांत पिस्तुल गेलें. त्याला वाटलें बाप नेहमीं त्याच्याशीं खेळतो, आज आपण त्याच्याशीं खेळूं या. त्या पिस्तुलाला चाप होता. तो त्यानें ओढला. पिस्तुल भरलेलें होतें, त्यामुळें पिस्तुलांतून गोळी सुटली आणि समोर बसलेल्या आईच्या चिंधड्या उडाल्या.

म्हणून तीव्र साधनें हातांत आल्यानंतर अक्कल ठिकाणावर राखण्याची जास्त गरज आहे. विज्ञान वाढल्यामुळें आत्मज्ञानाची गरज वाढली हें लक्षांत घेतलें पाहिजे. पुष्कळांना वाटतें आतां विज्ञान खूप वाढलें त्यामुळें आत्मज्ञानाची गरज च नाहीं. परंतु हा विचार चूक आहे. उलट जितकी विज्ञानाची शक्ति वाढेल त्याच्या पुढें आत्मज्ञानाची शक्ति असली पाहिजे. अमेरिकेंत विज्ञान पुष्कळ वाढलें आहे, पण आत्मज्ञानाचा तिथें तुटवडा आहे. आपल्या देशांत विज्ञान कमी आहे, पण अध्यात्मविद्या भरपूर आहे. त्यामुळें इथें विज्ञान किती हि वाढलें तरी चिंता नाहीं.एका हातांत ज्ञानेश्वरी आणि एका हातांत विज्ञान मग चिंता कसली? अमेरिका अजून बाल्यावस्थेंत आहे. अमेरिकेचे लोक पोरें च आहेत. तिथला इतिहास अवघा पांचशें वर्षांचा! युरोपचा दोन हजार वर्षांचा आहे. परंतु हिंदुस्थानचा इतिहास दहा हजार वर्षांचा आहे. त्यामुळें इथें विज्ञान वाढलें तरी कांहीं भय नाहीं. अमेरिकेंत आत्महत्या, पुष्कळ होतात. जरा कांहीं झालें कीं आत्महत्या! अमक्याशीं प्रेम होतें तें जमलें नाहीं, बाप रागवला, परीक्षा नापास झाली अशा अशा कारणांवरून तिकडे आत्महत्या होत असतात. याचें कारण डोकें ठिकाणावर राहिलें नाहीं. तें कसें राहणार? आत्मज्ञान नसल्यामुळें अक्कल ठिकाणावर राहत नाहीं, त्यामुळें अशा गोष्टी घडतात.विज्ञान खूप वाढलें, परंतु त्याचा उपयोग वाईट कामांसाठीं केला तर त्याला विज्ञान काय करणार? विज्ञानाचा उपयोग कसा करायचा हें कोण शिकवणार? हें अध्यात्म शिकवणार, ज्ञानेश्वरी शिकवणार. म्हणून ज्ञानेश्वरांच्या शिकवणीची जास्त गरज आतां

च आहे. या युगांत माणसाच्या एका हातांत ज्ञानेश्वरी व दुसऱ्या हातांत विज्ञान राहील. मग विज्ञान किती हि वाढलें तरी नुकसान काहीं च नाहीं.

## विज्ञान-युगामुळें च ग्रामदान हवें

विज्ञान पचवायचें असले तर ग्रामदानाशिवाय गति नाहीं. आजकाल वर्तमानपत्रांचें कोणतें हि पान तुम्ही उघडा. मारामाऱ्या, खून, दरोडे यांची बातमी नसलेले एक हि पान तुम्हांला मिळणार नाहीं. आणि या च गोष्टी मोठ्या प्रमाणावर घडल्या म्हणजे त्याला नांव देतात राजकारण ! आज जगांत ठिकठिकाणीं काय चाललें आहे ? इंडोनेशिया, फ्रान्स, अल्जेरिया सर्वत्र अशांतता आहे. जरा कुठें ठिणगी पडली कीं महायुद्ध पेटेल, धान्यभाव वाढतील. अशा स्थितींत खेड्यांतील लोकांना जर स्वतःला वाचवायचें असेल तर सारें गांव एक झालें पाहिजे. जमीन सारी गांवाची केली पाहिजे. जमिनींत काय काय पेरायचें, गांवासाठीं किती किती काय काय राखून ठेवायचें, वगैरे गांवाचें प्लॅनिंग गांववाल्यांनीं केलें पाहिजे.

अशा रीतीनें एका बाजूनें ग्रामदान, ज्ञानेश्वरी आणि दुसऱ्या बाजूनें विज्ञान. मग विज्ञानाची भीति कसली ?

( दक्षिण सातारा )

१८-५-५८

---

## आत्मज्ञानाचें ध्येय : सामाजिक समाधि :५:

हल्लींची जनता परलोक, चंद्र आणि मंगळापासून केवळ मजा लुटूं इच्छीत नाहीं, तर सृष्टीचें पूर्ण रहस्य मानवाच्या हातीं लागावें अशी तिची इच्छा आहे. निःसंशय हें असाध्य ध्येय आहे. किती हि प्रयत्न केला तरी ब्रह्मांडाची शक्ति मानवाच्या हातीं कशी लागेल ? परंतु विज्ञानाला यांत च समाधान आहे. तें अशा ध्येयाशिवाय प्रयत्न च करीत नाहीं. मेलेल्या माणसाला जिवंत कसें करता येईल वा बाह्यवस्तूंपासून मनुष्य कसा घडवता येईल याचा सुद्धां विज्ञान प्रयत्न करील. अशा तऱ्हेचे अयशस्वी

प्रयोग करीत असतांना त्यांत कधीं थोडेसें यश पण मिळून जातें आणि त्या अल्पशा यशानें जगाचें काम होतें

## 'मुक्ति आमच्या हातांत' हा देखील संकुचित विचार

पण आत्मज्ञानाचें ध्येय आहे काय? हिंदुस्थानांतील आत्मज्ञानाचें ध्येय फार च संकुचित आहे. मोह-माया, पाप-पुण्य, असो-नसो—प्राप्त परिस्थितींत संतोषानें रहायचें. बाहेरच्या सुखदु:खांशीं जणूं यांचा संबंध च नसतो. 'इतकें दु:ख असतांना असली ही शांति कशी?' म्हणून विचाराल तर ते म्हणतील, "ईश्वराची लीला च अशी आहे." त्यांना वाटतें मुक्ति यांच्या काखोटींत आहे. एकानें मला लिहिलें होतें "कशा मायेंत कशा अहंकारांत पडला आहेस तूं? अशानें का जगाचा उद्धार होणार आहे? असलीं हीं कामें टाक झटकून!" तेव्हां प्रश्न उभा होतो कीं मग करायचें काय?

पत्र लिहिणाऱ्याचा गुरु एक स्त्री होती. तिच्याशीं सात वर्षांपूर्वी माझी भेट झाली होती. ती स्त्री फार शांत आणि साध्वी होती. त्या माणसानें मला लिहिलें कीं 'तूं तिला शरण जा. ती देवता आहे, परादेवता आहे.' मीं विचारलें, "तिथें काय करावें लागेल?" त्यानें लिहिलें "हा प्रश्न का विचारायचा असतो? अरे, असा प्रश्न विचारणें च अज्ञान आहे, अहंकार आहे. करायचें-धरायचें आहे च काय? इथें येऊन राहून जा, परम शांति मिळेल" आहे ना सुंदर पत्र! हिंदुस्थानचे लोक मुक्तीला अगदीं तळहातावरची समजतात आणि म्हणतात कीं आम्हांला आत्मज्ञान प्राप्त झालें आहे. गांधी च एक असे निघाले, कीं जे शेंवटपर्यंत म्हणत राहिले 'मला आत्मज्ञान झालेलें नाहीं.' विज्ञानानें जसें आपल्यासमोर अशक्य कोटींतलें ध्येय ठेवलें आहे तसें च आत्मज्ञानासमोर पण हवें. विज्ञानाला साऱ्या ब्रह्मांडावर स्वामित्व हवें आहे. तसें च आम्ही पण संपूर्ण आत्मशक्तीवर प्रभुत्व स्थापित करण्याची इच्छा ठेवली पाहिजे.

## आजचें अपूर्ण आत्मज्ञान

आम्ही धर्म-साहित्याचें जें कांहीं अध्ययन केलें आहे, त्यावरून आमच्या लक्षांत हें आलें कीं मानवसमाजाला आत्मज्ञानाचा एक लहानसा

अंश च आजवर आकलन झालेला आहे. आमच्या समोर कुणाला जर विंचू चावला तर फार झाल्यास आमच्यांत थोडीशी करुणा जागृत होते. पण आत्मज्ञान झालेलें असल्यास––'मी आणि तो एक आहोंत' ही आत्मानुभूति असल्यास––त्याला जी वेदना झाली ती आम्हांला पण व्हायला हवी. या उलट आम्ही जर अत्यंत प्रसन्न असूं, शांत असूं तर ज्याला विंचू चावला असेल त्याला सुद्धां शांति आणि आनंद मिळायला हवा. दोन्ही पैकीं एक गोष्ट तरी व्हायला च हवी. विंचवाचा दंश आमच्या शरीरावर उमटायला हवा अथवा आमच्या शांतीचा––आनंदाचा––भाव विंचू चावलेल्या व्यक्तीजवळ पोंचायला हवा. अजून आपल्याला इतकें व्यापक आत्मज्ञान झालेलें नाहीं. एक अंशमात्र ज्ञान आहे. म्हणून च आमच्यांत थोडीशी करुणामात्र जागृत होते.

जर आमच्यासमोर बसलेले सर्व लोक एकरूप च असतील, तर ग्रामदान व्हायला अडचण कसली ? समाज प्रबुद्ध असेल तर त्याला समाधान देण्यांत सायास कुठले ? दिवा आणता च अंधार नाहींसा होतो, त्याच प्रमाणें एखाद्या ठिकाणीं लोक मूर्खाप्रमाणें भांडत असतील, एक दुसऱ्याचीं डोकीं फोडत असतील, त्या ठिकाणीं जर कुणी आत्मज्ञानी पोचला तर भांडण मिटायला हवें. असें होऊं पण शकतें; परंतु अजून आत्मज्ञानाचा व्हावा तसा विस्तार झालेला नाहीं.

## असंभव कल्पनांनीं उत्साह-वृद्धि

मानवाला सामाजिक समाधीचा अनुभव यायला हवा. रामकृष्ण परमहंसांची पहिल्या प्रथम ज्या ठिकाणीं समाधि लागली तें स्थान बंगाल मधें आहे. तिथें गेल्यावर मीं आपल्या व्याख्यानांत सांगितलें कीं ' जी समाधि रामकृष्ण परहंसांना व्यक्तिगतरूपानें लाभली, ती तुम्हांआम्हांला सामाजिक समाधीच्या रूपानें प्राप्त व्हायला हवी.'- हा अगदीं अशक्य कोटींतला कार्यक्रम आहे. परंतु असंभव अशा कल्पनांनीं आमच्यांत किती तरी उत्साह संचरतो ! आमच्या रोमरोमांत ही च एक वासना भिनली आहे !

अरसीकेरी, (म्हैसूर)
८-११-'५७.

## सामाजिक समाधि : ६ :

श्रीरामानुजाचार्यांची गोष्ट सगळ्यांना माहीत असेल. त्यांनीं आपल्या गुरूंनीं दिलेल्या मंत्राला जगजाहीर करण्यासाठीं स्वतः नरकांत राहणें स्वीकारलें आणि देशभर हिंडून त्याचा मुक्तपणें उपदेश दिला. त्याकाळीं आपल्या इथें ब्रह्मविद्या गुप्त ठेवण्याची प्रथा होती. ती चुकीची होती असें मी म्हणत नाहीं. त्यांत सुद्धां कांहीं सार होतें. ब्रह्मविद्या बाजारांत विक्रीला नेल्यास तिला मूल्य राहणार नाहीं, म्हणून ती गुप्त ठेवण्यांत च गोडी आहे. परंतु तिला प्रगट करण्यांतील गोडी सुद्धां और आहे. महाराष्ट्रांत ज्ञानदेव आणि एकनाथांनीं हें च केलें. हिंदुस्थानांत रामानुजांनीं ब्रह्मविद्येचे दरवाजे उघडे केले. तद्वत च महाराष्ट्रांत ज्ञानदेवांनीं ब्रह्मविद्येची लयलूट केली. महाराष्ट्रांत ज्ञानदेवांनीं जो महान् पराक्रम केला, रामानुज आणि चैतन्यांनीं तो च देशभर केला. ते जेथें जेथें गेले, ज्ञान च वाटत गेले. स्त्रिया, लहान मुलें आणि सामान्य जनता--सर्वांना ज्ञान देत गेले. म्हणून च सर्वत्र अशी भावना आहे कीं चैतन्य महाप्रभु कृष्णाचे अवतार आहेत. कारण त्यांच्यांत प्रेम साकार होऊन अवतरलें होतें. मला सांगायचें आहे कीं हा जो प्रेमाचा धर्म संतांनीं आम्हांला दिला, तो च आतां पुढें न्यायचा आहे. हा प्रेमधर्म त्या काळीं ज्या मर्यादांनीं जखडलेला होता, त्या मर्यादा आतां राहिलेल्या नाहींत. त्यामुळें च आज आपणास दोन पावलें पुढें जाता येईल. संतांनीं शिकवलेलें ज्ञान ओळखून त्याला नवें रूप देऊं आणि साऱ्या जगासमोर तें ठेवूं. ही वासना ह्या युगाला अनुरूप आहे. आज वैदिक धर्माला नवें रूप प्राप्त होणार आहे.

### भक्तीचें सर्वोदयांत रूपांतर

यापुढें भक्तीचें रूपांतर सर्वोदयांत होईल. **'समं सर्वेषु भूतेषु'** ह्या भक्तीला आतां 'परा भक्ति' नाहीं राहूं द्यायचें. 'सामान्या भक्ति' बनवायचें आहे. पूर्वी एखाद्याला च समाधींत अनुभव येई कीं 'भूतमात्र माझे मित्र आहेत, सगळे भेद मिथ्या आहेत,' हे नाहींसें झालें पाहिजे. पण हा अनुभव

आज सगळ्यांना आला पाहिजे. दुसऱ्या भाषेंत म्हणायचें तर आज सर्वांना सामाजिक समाधि साधली पाहिजे. परमात्मा माझ्या मुखांतून मोठमोठ्या गोष्टी बदवून राहिला आहे.

**साम्ययोग : आधीं कळस, मग पाया**

विज्ञानयुगांत साम्ययोग पण केवळ समाधींत अनुभवण्याची वस्तु राहिलेली नाहीं. उलट साऱ्या समाजांत ती अनुभवण्याची गोष्ट झाली आहे. साम्ययोग पूर्वीं 'शिखर' होतें, पण आतां 'पाया' झालेला आहे. ह्यापुढें आपणास साम्ययोगाच्या आधारावर जीवनाची उभारणी करावी लागेल. ही च विज्ञानयुगाची मागणी आणि आवश्यकता आहे. म्हणून च आज आमच्यासारख्या सामान्य जनांना पण असलें काम करण्याची प्रेरणा होऊन राहिली आहे.

**सर्वश्रेष्ठ भक्ताचें लक्षण : पूर्ण निर्भयता**

भक्तीचा मूळ मंत्र देणारा प्रह्लाद आहे. नारद त्याचा गुरु. परंतु महाभक्तांच्या यादींत प्रह्लादाचें नांव अगोदर येतें आणि नारदाचें सर्वांच्या शेवटीं ! ज्यावेळीं भयानक रूपांत नरसिंहावतार प्रकट झाला, तेव्हां भगवंतांची चिरपरिचित लक्ष्मी घाबरून गेली, नारदाची कधीं न थांबणारी वीणा क्षणभर थांबली आणि तो पण घाबरून गेला. अशा वेळीं प्रह्लाद निर्भयपणें नरसिंहाच्या रूपापुढें होऊन म्हणूं लागला : **नाहं बिभेमि**—मी तुला घाबरत नाहीं. परमेश्वरी रूपापुढें ही जी त्यानें निर्भयता दाखवली, त्यामुळें च तो सर्वश्रेष्ठ भक्त मानला गेला. दुष्ट रूपापुढें अनेकांनीं निर्भयता दाखवली होती. व्याध वाल्मीकीच्या समोर नारद डगमगला नाहीं. परंतु भगवंताच्या रूपापुढें तो पण क्षणभर भांबावला च. म्हणून च निर्भयतेच्या कसोटीवर प्रह्लाद उतरला.

त्यानंतर प्रह्लादानें भगवंतापाशीं वर मागितला

> "प्रायेण देवमुनयः स्वविमुक्ति कामाः ।
> मौनं चरंति विजने न परार्थनिष्ठाः ॥
> नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षुरेकः ।

तो म्हणाला, "प्रभो! स्वतःच्या मुक्तीची इच्छा करणारे देव आणि मुनि आजवर पुष्कळ होऊन गेले. ते जंगलांत जाऊन मौन-साधना करीत असत. परंतु त्यांच्यांत परार्थनिष्ठा नव्हती. मी मात्र एकटा ह्या सर्व कृपणजनांना सोडून मुक्त होऊं इच्छीत नाहीं." किती कठोर टीका प्रह्लादानें केली आहे कीं, "त्या मुनींच्या मागें स्वार्थ लागला होता, परार्थ नाहीं. आणि मी मात्र एकटा मुक्त होऊं इच्छीत नाहीं!" संस्कृत साहित्यांतील हा सर्वश्रेष्ठ उद्‌गार आहे. ह्या उद्‌गारांत किती विपुल कवि-हृदय ओसंडलेलें आहे!

## 'माझें' गेल्यावर च मोक्ष

वास्तविक मोक्ष एकटयानें च मिळवण्याची वस्तु नाहीं. ज्याला वाटतें कीं मोक्ष एकटयानें बळकावण्याची वस्तु आहे, त्याच्या हातून ती निसटून जाते. 'मी' आल्याबरोबर 'मोक्ष' जातो. माझा मोक्ष हें वाक्य च व्याहत आहे, चुकीचें आहे. 'माझें' गेल्यावर मोक्ष मिळणार. हा विषय आम्हां सर्वांना चिंतन आणि आचरण करण्यासारखा आहे. मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेवली पाहिजे कीं यापुढें आम्हांला जीवनांतील आर्थिक, सामाजिक आदि भेद नाहींसे करून च आपलें सारें जीवन बदलायला हवें.

पंढरपुर (महाराष्ट्र)
२९-५-५८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६८६३ वि: निबंध
क्रमांक १५०६ नों दि: ३५।८।६७

## विज्ञानयुगांतील तीन कर्तव्यें                                    : ७ :

प्रश्न विचारण्यांत येतो कीं विज्ञान जर असें च वाढत राहिलें तर अज्ञानें जगाचें भलें होईल का ? विज्ञान ज्या दिशेनें आज विकसित होत आहे, त्या दिशेनें त्याचा विकास होत राहणें योग्य आहे का ?

### विज्ञानाच्या उन्नतीचा प्रयत्न प्राचीनतम

विज्ञानाचा विकास अलीकडे च होत आहे असें नाहीं. मानवाचा जन्म झाला तेव्हांपासून च तो विज्ञानासाठीं प्रयत्न करीत राहिला आहे. रेडिओ निघाला, आम्हांला वाटलें कीं फार मोठा शोध लागला, विज्ञान पुढें गेलें. परंतु याहून हि मोठींमोठीं पाउलें पूर्वींच्या विज्ञानानें टाकलीं आहेत. पूर्वींच्या काळीं लोकांनीं जे प्रयोग केले, त्याच्या आधारावर आजचें विज्ञान वाटचाल करीत आहे. अग्नि निर्माण करणें अति प्राचीन काळच्या लोकांना माहीत नव्हतें. पण पुढें जेव्हां अग्नीचा शोध लागला तेव्हां जीवनांत किती परिवर्तन करावें लागलें असेल ! कल्पना करा, तुमच्या-घरांतला अग्नि पांचदहा दिवसांसाठीं दुर्मिळ झाला तर तुमची काय दशा होईल ? पहिल्या प्रथम तर आमच्या घरांतून होणारा स्वयंपाक च बंद होईल. थंडी वाजून आम्हांला कापरें भरेल. विस्तवाच्या सहाय्यानें किती तरी वनस्पतींपासून औषधें बनवितात, तीं मग कशी बनतील ?

ह्याहि पूर्वीं एक काळ असा होता कीं ज्यावेळीं केवळ दगडापासून च लोक अवजारें बनवीत असत. त्यांच्या जवळ लोखंड नव्हतें. पण जेव्हां लोखंडाचा शोध लागला, तेव्हां जीवनांत किती परिवर्तन झालें असेल ? दहा दिवस जर लोखंडावर बहिष्कार टाकला तर नित्याच्या जीवनांत कितीकिती परिवर्तन करावें लागेल, याचा विचार तर करा. पेन्सील तासण्यासाठीं चाकू मिळणार नाहीं, कपडे शिवायला सुई मिळायची नाहीं, कापण्यासाठीं कात्री लाभणार नाहीं, शेतकऱ्याला नांगरण्यासाठीं फाळ मिळणार नाहीं आणि खोदण्यासाठीं कुदळ मिळणार नाहीं, फावडा मिळणार नाहीं. अशानें आपलें काम व्हायचें कसें ? आज जी नवीन नवीन

औजारें तयार होतात, तीं सर्व लोखंडापासून बनवलेलीं असतात. लाकडावर कामें होतात, परंतु त्या लाकडाला कापण्या-रंधण्यासाठीं लोखंडाची गरज आहे. लोखंड जेव्हां प्राप्त झालें असेल, त्यावेळीं लोकांच्या जीवनांत कितीतरी परिवर्तन घडलें असणार !

पूर्वीं लोकांना गाईचें दूध काढणें माहीत नव्हतें. शिकार करून प्राण्यांना ते खात असत. पण पुढें गाईवर आपण प्रेम करूं शकतों, तिला चारापाणी देऊन तिच्या स्तनांतून दूध काढून घेऊं शकतों हें ज्याला प्रथम सुचलें असेल, त्यानें केवढा मोठा शोध लावला ! थोडक्यांत शेतीचा शोध, गो-रक्षणाचा शोध, अग्नीचा शोध, कापसापासून कापड बनवण्याचा शोध, किती तरी शोध पूर्वीं लावले गेले.

## विज्ञानाची महत्ता

सुरवातीला भाषेच्या शक्तीचा आविष्कार झाला. त्यानंतर शोध होत होत आज आपण अॅटमपर्यंत पोचलों आहोंत. वीज तर पाश्चिमात्य राष्ट्रांतून केव्हांपासून आविष्कृत होऊन गेलेली आहे. हिंदुस्थानांत पण तुम्हांला कांहीं दिवसांनीं विजेचे चमत्कार पहायला मिळतील. अणुशक्तीनें सुद्धां कित्येक प्रकारचे कारखाने चालू लागतील. विकेंद्रित उद्योग देखील खेडयाखेडयांतून अशा तऱ्हेनें चालवता येणें शक्य होईल. विज्ञान प्राचीन काळापासून आजवर सारखें विकास करीत आहे. पुढें हि तें विकास करील आणि तसा विकास व्हायला हवा. त्यामुळें मानवी जीवनांत सुंदरता येईल. मनुष्याला दृष्टीचें ज्या प्रमाणांत ज्ञान होईल, त्या प्रमाणांत तो सृष्टीचें रूप चांगल्या प्रकारें आकलन करूं शकेल व तिच्या शक्तीचा उपयोग करूं शकेल. मीं हा चष्मा लावलेला आहे. हा जर नसता तर माझ्या समोर असलेल्या लोकांना मी पाहूं शकलों नसतों इतका आंधळा मी आहे. असा हा विज्ञानाचा उपयोग स्पष्ट आहे.

## आत्मज्ञानानें च विज्ञानाला योग्य दिशा

विज्ञानाची दुहेरी शक्ति आहे. एक विनाश-शक्ति आणि दुसरी विकास-शक्ति. विज्ञान सेवा करूं शकते आणि संहार हि करूं शकतें.

अग्निनारायणाचा शोध लागला. अग्नीपासून स्वयंपाक पण होतो आणि घराला आग पण लावली जाऊं शकते. परंतु अग्नीचा उपयोग घराची राख रांगोळी करण्यासाठीं करायचा कीं चूल पेटवण्यासाठीं, याचा निर्णय करण्याची शक्ति विज्ञानांत नाहीं. ही निर्णय-शक्ति आत्मज्ञानांत आहे. पक्षी जसा दोन पंखांनीं उडतो त्याप्रमाणें मनुष्य आत्मज्ञान आणि विज्ञान या दोन शक्तींनीं समृद्ध होऊन सुखी होतो. प्रत्येक यंत्रांत दोन प्रकारची शक्ति असते. एक वेग देणारी, दुसरी दिशा दाखवणारी. मोटारच घ्या. तिचा दहा मैलांचा वेग आहे. हा वेग वीस वा तीस मैल करणें एका यंत्रावर अवलंबून असतें. परंतु तिला पश्चिमेला किंवा पूर्वेला वळण्याचें काम दुसऱ्या यंत्राचें असतें. जर या दोहोंपैकीं एक का यंत्र नसेल, तर काम होणार नाहीं. मोटारीला दोन्ही यंत्रांची गरज असते. आपण पायांनीं चालतों, डोळ्यांनीं नाहीं; परंतु दिशा कळते ती डोळ्यांनाच. ह्याचप्रमाणें आत्मज्ञान आहे डोळा आणि विज्ञान आहे पाय. मानवाला जर आत्मज्ञानाची दृष्टि नसेल तर हा आंधळा कुठें कसा भटकेल सांगता येत नाहीं. त्याच-प्रमाणें त्याला दृष्टि आहे, पण पाय नसतील तर तो इकडे तिकडे पाहूं शकेल परंतु त्याला घरांतून बाहेर पडता येणार नाहीं. थोडक्यांत विज्ञाना-शिवाय जगांत कोणतें हि काम होऊं शकणार नाहीं आणि आत्मज्ञानाशिवाय विज्ञानाला नीट दिशा च लाभणार नाहीं.

## विज्ञानाची विक्री

पण आज विज्ञानाची विक्री होते. मोठमोठे संशोधक विनाशक शस्त्रास्त्रें बनवण्याला महत्त्व देतात. हे एवढे बुद्धिमान् असून हि धनांनीं विकत घेतले जातात. ह्यांना पैसा दिल्यावर ज्या प्रकारचें संशोधक तुम्ही त्यांना करायला सांगाल त्याप्रकारचे शोध ते तुम्हांला लावून दाखवतील. मग त्या शोधांनीं भलें हि जगाचा नाश होवो अथवा कल्याण होवो. आम्ही धनलोभानें स्वतःला विकणार नाहीं, विध्वंसक शस्त्रास्त्रें बनविण्यांत सहयोग करणार नाहीं आणि संहारक असा कोणता हि शोध लावणार नाहीं असा जर वैज्ञानिक प्रण करतील तर जग वांचेल. पण जोंवर सारा समाज अशाप्रकारचे विचार ग्रहण करणार नाहीं तोंवर संशोधकांना हि

अक्कल येणार नाहीं. विनाशक संशोधनाच्या वृत्तीला लोक घृणेच्या दृष्टीनें पाहूं लागतील तेव्हां च हे शोध बंद होतील.

## विज्ञान आणि अहिंसेचा योग

विज्ञान जर वाढत राहील आणि त्याची तशी वाढ आपल्याला हवी असेल तर त्याच्या जोडीला अहिंसेला पण ठेवावें लागेल. अशानें च जगाचें भलें होईल. विज्ञान आणि अहिंसा यांचा योग झाल्यास जगांत–भूतलावर स्वर्ग अवतरेल. पण जर कां विज्ञान आणि हिंसेची दोस्ती झाली, त्यांचें लग्न लागलें, त्यांचें सूत जमलें तर जगाचा सत्यानाश अटळ आहे. विज्ञानाचा विकास व्हावा यासाठीं च आम्ही अहिंसेवर इतका जोर देत असतों. विज्ञानाचा विकास करायचा असेल तर त्याच्या जोडीला, त्याच्या रक्षणाच्या दृष्टीनें, अहिंसेची गरज राहील च. हिंसेला कायम ठेवायचें असेल तर तुम्ही विज्ञानाला प्रोत्साहन देतां कामा नये. जुन्या काळची हिंसा दुसऱ्या प्रकारची होती. भीम आणि जरासंधाची कुस्ती झाली. जो मरणार होता तो मेला, जो वांचणार होता तो वांचला. त्यामुळें जगाचें फार नुकसान झालें नाहीं. हिंसेला जर स्थान ठेवायचें असेल तर लाठचाकाठचांनीं भांडा, मल्लयुद्ध करा. त्यासाठीं बंदुकीच्या शोधाची धडपड कशाला ?

## हिंसेनें विज्ञानाची होळी

विज्ञानाला सीमित कराल तर हिंसा टिकली तरी जास्त नुकसान होणार नाहीं. पण जर विज्ञानाची प्रगति हवी असेल तर त्याच्या जोडीला अहिंसेला स्थान दिल्यानें च जग वांचेल. अहिंसेला विज्ञानाबरोबर राहूं देण्याचा अर्थ होतो––मानवा-मानवांत जे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठीं शस्त्रांचा उपयोग न करणें, ते प्रश्न अहिंसेनें सोडवणें. मग वैज्ञानिकांना सांगितलें जाईल––बाबांनो, ऑपरेशनसाठीं जीं शस्त्रें लागतात तीं बनवा, मात्र तोडफोड करणारीं शस्त्रें नका बनवूं. ह्या रीतीनें मनुष्याच्या जीवनांत निर्माण होणारे एकूणएक प्रश्न आम्ही अहिंसेनें च सोडवूं आणि विज्ञानाचा विकास करूं, तर त्यांत आमचा फायदा च आहे. म्हणून च आम्ही वारंवार म्हणत असतों कीं विज्ञान आणि हिंसा परस्परांच्या विरुद्ध आहेत. दोन्ही एकत्र नांदूं शकत नाहींत. विज्ञानाला

टिकून रहायचें असेल तर त्यानें हिंसेचा समूळ उच्छेद करायला हवा, त्याशिवाय गत्यंतर नाहीं. जर विज्ञान आणि हिंसा एकत्र नांदूं लागतील, तर मनुष्य आणि त्याचें विज्ञान दोन्ही राहणार नाहींत.

## भूदान-यज्ञाची दृष्टि

ह्या दृष्टीनें भूदानयज्ञाकडे पाहिल्यास एक नवीन दर्शन घडेल. सान्या आशिया खंडांत जमिनीचा प्रश्न मुख्य आहे. तो आम्ही भूदानयज्ञानें सोडवूं इच्छितों. हा प्रश्न हिंसेनें सोडवूं तर आपापसांत द्वेषभाव वाढेल. विज्ञानयुगांत त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. परंतु एवढा मोठा हा प्रश्न आम्ही अहिंसा, प्रेम आणि शांतीनें सोडवूं तर परस्परांचा सहयोग लाभेल, समाजाची शक्ति वाढेल आणि समाज सुखी होईल. लोक विचारतात कीं तुम्ही इतकी व्यर्थ पायपीट कशाला करता ? भूदानाच्या कामासाठीं इतकी व्यर्थ उठाठेव हवी कशाला? कायदा कराल तर काम होईल कीं. एवढें कराल तर सारी फत्ते! परंतु कायद्यानें काय होईल ? समजा 'लोकांच्या जमीनी हिसकावून घेण्यांत येतील' असा कायदा केला. ह्यावर शेतकरी म्हणेल 'मी देत नाहीं.' मग त्याला जेलमधें घालतील. ही आहे कायद्याची शक्ति! कायद्याची शक्ति, त्याच्या मागें उभ्या असलेल्या दंडशक्तींत आहे, लष्करांत आहे. म्हणून लोकमत तयार करण्यानें च हा प्रश्न सुटणार आहे आणि त्यानें च प्रजेचें काम होणार आहे. लोकांचा सहयोग नसेल आणि कायद्यानें जर एखादी गोष्ट लादली जाईल तर कायदा निष्प्रभ होईल आणि समाजांत घातक विचार पसरतील, मत्सर वाढेल.

अहिंसेबरोबर पण एक कायदा असूं शकतो. एखादें काम अनेक व्यक्तींनीं केल्यानंतर आणि लोकमत तयार झाल्यानंतर उरलेल्या थोड्याशा कामासाठीं कायद्याचा उपयोग होऊं शकतो. अशा तऱ्हेनें अहिंसेंत सुद्धां कायद्याचें एक स्थान आहे. पण हें स्थान येतें शेवटीं. अहिंसेनें भूमि-समस्या सोडवण्याचा हा जो विज्ञानयुगांत प्रयत्न चालला आहे, यांत फार मोठी शक्ति आहे.

## विज्ञान आणि यंत्र

लोकांच्या लक्षांत एक गोष्ट येत नाहीं. ते म्हणतात, तुम्ही लहान-लहान उद्योग उभे करूं इच्छितां आणि म्हणून च विज्ञानविरोधी आहांत. लोकांना वाटतें मोठमोठे उद्योगधंदे उभे करणें म्हणजे च विज्ञान. लहानसहान उद्योगांबरोबर विज्ञानाचा जणूं मेळ च बसत नाहीं! वास्तविक यंत्रांच्या उपयोगाचा विज्ञानाशीं तसा कांहीं संबंध नाहीं. कोणत्या यंत्राचा कुठें उपयोग करावा आणि कुठें नाहीं, हा कांहीं विज्ञानाचा विषय नाहीं. एखाद्या समाजाची लोकसंख्या प्रमाणापेक्षां अधिक आहे आणि त्यांच्यासाठीं काम कमी आहे, तर त्या समाजांत मोठीं यंत्रें चालणार नाहींत. हिंदुस्थानांत मनुष्यबळ अधिक आणि जमीन कमी. जपानमधें सुद्धां जमीन कमी आणि माणसें जास्त. अशा स्थितींत तिथें लहान लहान प्रमाणावर च उद्योग चालतील. जिथें मनुष्यसंख्या कमी आणि जमीन जास्त असेल तिथें मोठमोठे उद्योग चालू शकतील.

लहान यंत्रें हवीं असतील तर विज्ञान तीं बनवून देईल आणि अजस्त्र यंत्रें हवीं असतील तर तीं सुद्धां विज्ञान बनवून देईल. लहान यंत्रें बनविण्यानें विज्ञानाची कुशलता कमी होते आणि मोठीं यंत्रें बनविण्यानें ती वाढते असें मानण्याचें कांहीं च कारण नाहीं. हें लहानसें घडयाळ आहे. यांत का विज्ञानाचा कमी उपयोग झालेला आहे ? तो लहानसा थर्मामिटर; त्यांत काय विज्ञानाचा उपयोग कमी आहे ? एक लहानसें शिवण्याचें मशीन घ्या. त्यांत काय विज्ञानाला वाव मिळालेला नाहीं ? कॅमेरा लहानसा झाला म्हणून काय त्यांत विज्ञानाला अवकाश नाहीं ? विज्ञानाच्या उपयोगाशिवाय का कधीं कॅमेरा बनूं शकेल ? विज्ञानाशिवाय का घडयाळ होईल ? थोडक्यांत, लहान काय, मोठीं काय, सर्व यंत्रें बनवण्यांत विज्ञानाचा उपयोग होत असतो. याचा अर्थ, यंत्रें लहान बनवायचीं कीं मोठीं, हें तुम्ही ठरवायचें. तुम्ही समाजशास्त्रानुसार विज्ञानाला हुकूम सोडा, कीं विज्ञान तुमच्या आज्ञेप्रमाणें तुम्हांला यंत्र बनवून देईल.

'हिंदुस्थानला विज्ञानयुगांत टिकून रहायचें असेल तर काय काय करावें लागेल ?' असा प्रश्न लोक विचारतात. मी त्यांना म्हणतों कीं मानवापुढील

प्रश्न अहिंसेच्या शक्तीनें, नैतिक शक्तीनें च सोडवूं असा निर्णय करावा लागेल. दुसरी गोष्ट ही कीं विज्ञानाचा उपयोग सेवेचें साधन म्हणून करावा लागेल संहारक साधनें निर्मिण्याच्या कार्यांत नाहीं. आणि तिसरी गोष्ट, विज्ञानानें मोठीं यंत्रें बनवावींत कीं लहान-लहान, हें परिस्थिति पाहून ठरवावें लागेल. ह्या गोष्टी आपण ध्यानांत घेऊं तर विज्ञानापासून आपल्याला भरपूर फायदा होईल.

पट्टामुंडाई (ओरिसा)
१-३-'५५

---

## विज्ञानयुग आणि अध्यात्माची दिशा : ८ :

कन्याकुमारीला समुद्रकाठीं बसून प्रतिज्ञा केली होती कीं 'जोंवर भारतांत ग्राम-स्वराज्याची स्थापना होत नाहीं, तोंवर मी फिरत च राहीन.' ह्या प्रतिज्ञेचा पुन्हां 'पीरपंचाल' ला बर्फावर ध्यानस्थ बसून पुनरुच्चार केला. अशा रीतीनें तो विचार वातावरणांत पसरला. हिंदुस्थानला ग्रामस्वराज्याच्या दिशेनें जावें लागेल आणि तो जाईल. आज निरनिराळीं राज्यें आपापल्या परीं गांवांना अधिकार देण्याचा यत्न करीत आहेत. या योजनेंत पुष्कळ ढिलाई आहे, उणीवा हि भरपूर आहेत परंतु दिशा ठीक आहे. हा सारा विचार सुधारावा लागेल. मग देशांत एक वातावरण निर्माण होईल; पुढें ग्रामदान, भूदान, सर्वोदय, ग्रामस्वराज्य इत्यादि विचार खेड्यापाड्यांतून पोंचवले जातील आणि त्यानंतर हिंदुस्थानांत ग्रामस्वराज्य होईल यांत कांहीं शंका च नाहीं. ह्या कार्यांत आम्ही आपला जास्तींत जास्त पुरुषार्थ, जितका करता येईल तितका, निरंतर करीत राहिलें पाहिजे.

## हृदय-प्रवेशाची प्रक्रिया

ह्या समग्र कार्याचें अधिष्ठान आध्यात्मिक आणि नैतिक आहे. आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांची स्थापना केल्याशिवाय सर्वोदय-विचार प्रतिष्ठित होणार नाहीं. जरी ह्या मूल्यांचें चिंतन करणाऱ्या ऋषींचा विश्वास होता, तरी समाजानें त्यांचें म्हणणें मानलें नाहीं. आम्ही आतां त्या मूल्यांची स्थापना करूं इच्छितों. यासाठीं च पुढच्या यात्रेंत जरा अधिक खोलांत उतरूं आणि बीजाचें संशोधन करूं. यांत जितका हृदय-प्रवेश आणि हृदय-परिचय करता येईल तितका करूं. हृदय-प्रवेशाची एक प्रक्रिया असते. तिचें आम्हांला ज्ञान आहे. पण ती कितपत साधेल सांगता येत नाहीं. प्रक्रिया ही कीं निज-देह-बंधन सैल व्हावें. आम्ही देहाच्या बंधनांत बांधलेले आहोंत. तें बंधन ढिलें झाल्याशिवाय हृदय-प्रवेश अ-संभव आहे. आमचा यत्न हा राहील कीं तें बंधन, ज्यांत ह्या देहाशीं जीवात्मा जखडलेला आहे, सुटावें–सैल व्हावें. आम्ही अशी धडपड करीत राहूं तर सहज च बाहेरच्या पुष्कळशा वस्तु आम्हांला सोडता येतील. यापुढें आम्ही स्थूल विचार लोकांवर सोपवून, मूलभूत बुनियादी विचार च ठेवीत जाऊं. बाकीचें जें असेल तें लोक च करतील. आम्ही फक्त समजावून सांगूं, त्याहून अधिक कांहीं करणार नाहीं. अशानें च देश शक्तिशाली बनेल.

## विचारांत शक्ति

साधारणपणें दिसतें कीं अनेक लोक मार्गदर्शन करूं इच्छितात, वाट दाखवूं इच्छितात; त्यामुळें नाना पक्ष स्थापन होतात. त्यांत वरून खालीं मार्गदर्शन केलें जातें, डिसिप्लीन—अनुशासन—लादलें जातें आणि संघटना अगदीं शिस्तबद्ध केली जाते. प्रत्येक जातीला आपली संघटना कशी मजबूत बनेल ह्याची च चिंता असते. ही संघ बनवण्याची वृत्ति आम्हांला कधीं मानवली नाहीं. अशा प्रकारच्या संघटनांनीं सत्कार्य घडत नाहीं. ज्यांतून जनतेच्या इच्छा व्यक्त होतात, तें निश्चित च सत्कार्य असेल, असें म्हणता येत नाहीं. जितकी संघटना मजबूत होईल, तितकें कार्य अधिक घडेल असें मुळीं च नाहीं. अनेकांचा आमच्या विचार-पद्धतीवर

हा च आक्षेप आहे कीं, बाबा पुष्कळ वातावरण तयार करतो, पण संघटना नाहीं करीत. जर मजबूत संघटना बनविली असती तर सर्व काम होऊन गेलें असतें. परंतु आम्हांला विचारांची जितकी किंमत वाटते, तितकी दुसऱ्या कोणत्या च गोष्टीची वाटत नाहीं. विचारांत शक्ति असते याचें आम्हांला भान आहे. विचाराशिवाय दुसऱ्या एखाद्या गोष्टींत शक्ति असते हें आम्ही मानीत नाहीं. परंतु लोक संघटन-शक्तीवर च विश्वास ठेवतात.

## मानवजीवनाच्या संकुचिततेचीं कारणें

ह्या साऱ्या संघटना स्वतःच्या च भारानें गळून पडणार आहेत हें मला सांगायचें आहे. ह्या ज्या आधारावर उभ्या आहेत, तो आधार च विज्ञानयुगांत टिकणारा नाहीं. यापुढें इकडे विश्व राहील आणि तिकडे मानव. मधले सारे दुवे कमजोर पडणार आहेत. खेड्याला समूह मानून मानव आपलें सर्वस्व समाजाला दान करील, परंतु त्याचे आपले स्वतःचे स्वतंत्र विचार राहतील. स्वतंत्र मानव आणि विश्व, या दोघांच्या मधें बंधन आणणारा कोणता हि दुवा विज्ञान सहन करणार नाहीं. आजवर जातिभेदांनीं, विधिविधानांनीं बहिष्कार आदींच्या रूपांनीं मानवाला जखडलें होतें. अनेक धर्म-पंथांनीं मानवाला नाना उपासनांत बांधलें होतें, अनेक ग्रंथांनीं आपलें ओझें बुद्धीवर लादून मानवाला करकचून टाकलें होतें. मला सांगायचें आहे कीं मी कोणतें च बंधन स्वीकारायला वा पुस्तकाचें ओझें डोक्यावर घ्यायला तयार नाहीं. एखाद्या पुस्तकांत जें लिहिलें आहे, त्यांतील प्रत्येक वाक्य भगवद्वाक्य आहे, त्यावर विचार करायला नको, असें जर आम्ही मानूं तर मनुष्याची बुद्धि कुंठित होईल, स्वतंत्र प्रज्ञा नष्ट होईल. अनेक लोकांनीं राष्ट्र-भावना जाग्रत करून मनुष्याच्या बुद्धीला संकुचित केलें आहे. ह्या सर्व कारणांनीं मनुष्य-जीवन सीमित झालें आहे.

## अध्यात्मविद्या आणि विज्ञानाची एकवाक्यता

अध्यात्मविद्या ह्या सर्वांच्या विरुद्ध पहिल्यापासून च उभी होती. पण आतां विज्ञान सुद्धां त्यांच्या विरुद्ध दंड थोपटून उभें आहे. जाति, धर्म, पंथ, राष्ट्र—हे सारे काल्पनिक भेद त्यागा असे वेदांत पहिल्यापासून च

सांगत आला आहे. हा विचार लोक श्रवण करीत. त्यांतल्या फार च थोडयांना हे विचार पटत असत. आतां हे विचार फार दूरचे राहिलेले नाहींत. त्यांच्याशिवाय आमचें चालूं शकेल, आमच्या जीवनांत त्याची गरज राहिलेली नाहीं, अशी स्थिति आतां नाहीं. आजवर आम्ही या विचारांना उंच अटाळयावर ठेवलें होतें. परंतु आतां जाति, पंथ, राष्ट्र इत्यादि भेद सोडण्याची ती च गोष्ट विज्ञान सांगून राहिलें आहे. अशा तऱ्हेनें एका बाजूनें विज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें वेदांत, ब्रह्मविद्या, दोघे हि एक च गोष्ट सांगत आहेत आणि ह्या भेदावर प्रहार करीत आहेत. तेव्हां लक्षांत घ्यायला हवें कीं राजकारणी आणि धर्मांध लोकांनीं आजपर्यंत जे कांहीं संप्रदाय बनवले, ते शेवटचा श्वास घेत आहेत. ह्यानंतर त्यांना शेवटचा रामराम घ्यायचा आहे. ही गोष्ट मीं काश्मीरमधें पुन्हां पुन्हां सांगितली. आनंदाची गोष्ट ही कीं आमच्यांतील वरिष्ठ राजकारणी पुरुष सिद्धांततः हें मान्य करतात. मी म्हणतों, तुम्ही सिद्धांततः मानता, हें तर चांगलें च आहे. परंतु यापुढें तुम्ही आपल्या आचरणानें यापासून किती हि दूर राहिलात तरी सुद्धां शेंवटीं ती गोष्ट तुमच्या मानगुटीवर बसेल आणि तुम्हांला ती कबूल करावी लागेल. एक वस्तु सिद्धांततः मान्य केल्यावर तिला तुम्ही किती दिवस टाळत राहणार आणि आपली जुनी चाकोरी पकडून ठेवणार ?

## आध्यात्मिक विकास ही भौतिक गरज

आज ग्राम-स्वराज्याच्या कल्पनेला हिन्दुस्थानच्या तमाम राजनैतिक पक्षाचे लोक, आधुनिक विचाराच्या कसोटीवर कसून संमति देतात हें कशाचें निदर्शक आहे ? जनतेच्या आशा–आकांक्षा वेगानें उंचावत आहेत. हें असें कां चाललें आहे ? हा विचार काय विनोबानें विकसित केला ? नाहीं. हा विनोबा म्हणजे नुसता एक कण, एक अणुमात्र आहे. या विज्ञान-युगांत आण्विक शक्ति आली, त्यानें शस्त्रांचा शोध लागला आणि त्या हि पेक्षां अधिक संहारक शस्त्रांचा उत्तरोत्तर अधिकाधिक शोध होत आहे. परंतु त्या हि पेक्षां अधिक वेगानें आध्यात्मिक शोध होत आहे. म्हणजे विज्ञानानें आध्यात्मिक शोधाला चालना मिळत आहे, गति मिळत आहे. आध्यात्मिक क्रांतीची गति पूर्वीं जितकी कधीं च झाली नव्हती तितकी विज्ञान-युगांत

झाली आहे. दुसऱ्या भाषेंत बोलायचें झालें तर आध्यात्मिक विकास ही आजच्या जगाची भौतिक गरज आहे.

## राज्यशक्ति सीमित हिंसेनें कार्य करते

हल्लीं पुष्कळ लोक मोठमोठ्या गोष्टी सांगतात आणि हिंसेविरुद्ध ओरड करतात. याचा अर्थ त्यांची अहिंसेवर निष्ठा आहे असा नाहीं. कित्येक जण 'न्यूक्लीअर वेपन्स' विरुद्ध आहेत. ते म्हणतात कीं जगाच्या हितासाठीं त्यांचा वापर होता कामा नये. अशाप्रकारें आरडाओरड करून सांगणारे, भांबावलेले अहिंसक नसतात. त्यांना वाटतें कीं 'न्यूक्लीअर वेपन्स' च्या पुढें आपली 'कन्वेन्शनल वेपन्स' चालणार नाहींत. तीं त्यांना चालवायचीं आहेत. दंडशक्तीच्या आधारावर समाजाला चांगल्या तऱ्हेनें जखडून आपली सत्ता चालवायची असल्यानें त्यांना आपला दरारा टिकवायचा आहे. ह्या नव्या अस्त्रापुढें आपलीं जुनीं शस्त्रें गळून पडतील याची त्यांना भीति आहे. हे लोक अहिंसेच्या हितासाठीं नाहीं तर सीमित हिंसेच्या हितासाठीं असें बोलत आहेत. राज्यशक्ति सीमित हिंसेच्या साह्यानें कार्य करीत असते. त्या लोकांना भीति वाटते कीं त्यांची ही दंडशक्ति आतां हतप्रभ होणार, आणि म्हणून ते 'न्यूक्लीअर वेपन्स' विरुद्ध त्रागा करीत आहेत.

## जागतिक युद्ध अहिंसेच्या निकट

आम्ही सुद्धां न्यूक्लीअर वेपन्सच्या विरुद्ध आहोंत. परंतु आम्हीं सांगितलें कीं आम्हांला 'वर्ल्ड-वॉर' (विश्वयुद्ध) ची कांहीं भीति नाहीं. आम्ही विश्वयुद्धाला म्हणतों कीं तूं येणार असशील तर लवकर ये ना ! मला त्याची भीति नाहीं. मला भीति आहे ती या लहान लहान शस्त्रास्त्रांची आहे. लाठी-काठी, कृपाण, बंदूक, तलवार–हीं सारीं भयानक शस्त्रें आहेत. तीं नाहींशीं व्हायला हवींत. यांच्यामुळें च जगांत अशांति आणि भीति निर्माण होते. विश्वयुद्धाला मानव नाहीं आमंत्रण देत, तें तर 'डिवाइन' (दैवी) असतें. परमेश्वराला जेव्हां वाटतें कीं संहार व्हावा तेव्हां च मानवाला तशी प्रेरणा होते. अशावेळीं माझ्यासारख्याची अहिंसेच्या गोष्टी करीत राहण्याची काय बिशाद आहे ! तशा प्रसंगीं माझ्या हातांत देखील तलवार येईल.

ईश्वराविरुद्ध कोणाचा निभाव लागणार? ईश्वराची इच्छा असेल कीं मानव-समाज पुसला जाऊन 'कोरी पाटी' व्हावी आणि पुन्हां एकदां नवीन सृष्टि निर्माण व्हावी, तर तो हें सर्व करूं शकतो. उद्यां जर भूकंप झाला अथवा सारी सृष्टि जलमय झाली आणि आफ्रिकेच्या घनदाट जंगलांत राहणारे थोडेसे लोक च वांचले तर पुन्हां पहिल्यापासून 'सिविलाइजेशन'–सभ्यता–ला आरंभ होईल. मग ते लोक सांगूं लागतील कीं, पूर्वीं विमानें पण होतीं. मग ते रामायणासारखीं महाकाव्यें लिहितील. ते लोक हें सुद्धां लिहितील कीं एका काळीं ब्रह्मास्त्राचा उपयोग होत असे. त्याच्यामुळें सर्वजण मूर्छित होत असत. मानवाच्या विकासाला पहिल्यापासून सुरुवात होईल. ईश्वराची अशी च इच्छा असेल तर तिच्या आड कोण येईल? म्हणून मला त्याची चिंता नाहीं. आम्ही 'वर्ल्डवॉर'ला भीत नाहीं. आम्हांला विश्वयुद्ध अहिंसेच्या अगदीं निकट वाटतें. वर्तुळाचीं दोन टोकें जशीं जवळ असतात तसें विश्वशुद्ध आणि अहिंसा अगदीं जवळ आहे. हें समजून घेण्याची गरज आहे. विश्वयुद्ध संपल्यावर अहिंसेला च स्थान मिळणार आहे. दरम्यान शस्त्रास्त्र आदि कांहीं च राहणार नाहीं. 'कन्वेन्शनल वेपन्स' चालत रहावीत आणि आपलें आसन डळमळूं नये म्हणून बहुतेक हल्लीं विश्वयुद्ध टाळण्याचा यत्न चालतो, आणि इच्छा असते कीं 'न्यूक्लीअर वेपन्स' वापरांत येऊं नयेत. ह्या कारणामुळें च 'न्यूक्लीअर वेपन्स' चा विरोध करणारे फाशीच्या शिक्षेचा आणि जेलचा विरोध करीत नाहींत. कारण त्यांना माहीत आहे कीं या अस्त्रांच्या पुढें त्यांची फाशी, जेल इत्यादि सर्वंच नामशेष होणार आहे. त्यामुळें त्यांना मृत्युदंड, फाशी, जेल हवा आहे. कारण त्यांना आपलें राज्य चालावें असें वाटतें.

मानवाला अहिंसेची प्रेरणा होते कुठून, हें कांहीं आम्ही सांगूं शकत नाहीं. पुष्कळांना वाटतें कीं आजचा कायदा म्हणजे ढोंग, थोतांड आहे. राज्यकर्त्यांना वाटतें कीं त्यांचा दरारा टिकून रहावा. परंतु आतां त्यांचे दिवस भरले आहेत, दिवस अगदी बोटांवर मोजणें चालू आहे. यापुढें त्यांचें चालणार, नाहीं ही गोष्ट त्यांच्या पण लक्षांत आली आहे. पण प्रयत्न करून पाहतात कीं जितकें लांबणीवर टाकतां येईल तितकें टाकत रहावें. राजकारणी लोकांची ही रीत च आहे. ते इच्छितात कीं प्रश्न लोटता

येईल तितका दूर लोटीत रहावें. निदान आपल्या आयुष्यांत तरी तो प्रश्न उद्भवूं नये. मग तो प्रश्न आपल्या मुलांसमोर उभा राहिला तरी त्याला हरकत नाहीं ! समस्यांना बगल देत राहण्याची त्यांना हातोटी साधलेली असते, त्या समस्या ते सोडवूं इच्छीत नाहींत. आमच्या 'मिनिस्ट्री' च्या काळांत ही समस्या बाजूला सारता आली तर बरें च, मग भलें हि पुढच्या 'मिनिस्ट्री' समोर तो प्रश्न दत्त म्हणून उभा राहत असेल तर उभा राहो. असा त्यांचा विचार चालत असतो. अशी ही त्यांची अत्यंत कोती दृष्टि असते. ते अगदीं जवळचें पाहतात, दूरचें पाहत नाहींत. **'परं पश्यत माऽपरम् दीर्घं पश्यत मा ह्रस्वम्,** दूरचें पहा, जवळचें पाहूं नका, ही ऋषींची शिकवण आहे. पण राजकारणी अगदीं जवळचें पाहतील आणि तेवढें थोडेसें सांवरलें गेलें कीं झालें काम, असें मानतील.

## विज्ञानांतून आत्मसाक्षात्कार

हल्लीं कांहीं लोक म्हणत आहेत, श्रद्धा नष्ट होऊं लागली आहे. पण विज्ञानामुळें श्रद्धेची गरज च नाहीं. मनुष्याला जगाचा अनुभव येईल आणि त्याच अनुभवांतून सर्व जगांत ब्रह्मतत्त्व भरलें आहे असें त्याला दिसून येईल. विज्ञानाचे प्रयोग चालू असतात. आज विज्ञान आणि गणिताच्या योगानें ब्रह्मविद्येचें जसें स्पष्ट दर्शन आपणाला होत आहे तसें प्राचीन काळीं होत नव्हतें. त्यांच्या समोर स्थूल उपमा च होत्या. उपनिषदांत कथा आहे. पिता पुत्राला ज्ञान देत आहे. त्यामधें वडाच्या झाडाची उपमा आहे. बाप म्हणतो–लहानशा बीजांतून एक विशाल वृक्ष फोफावतो. त्या लहान बीजांत तो दिसत नाहीं, पण तो त्यांत च लपलेला असतो. तसें च आत्म्याचें स्वरूप आहे. म्हणून च हे पुत्रा, तूं श्रद्धा ठेव.

परंतु आतां तर आपल्याजवळ सूक्ष्म दाखले आहेत. हें 'ॲटम युग' आहे असें म्हणतात. पण 'ॲटम' मुळें ब्रह्मविद्या स्वच्छ दृष्टीस पडेल; ही चेतनाशक्ति कणाकणांतून प्रवेश करूं शकते याचा साक्षात्कार होईल.

(कस्तुरबाग्राम, आणि दुसऱ्या व्याख्यानांतून)

३१-८-'६०

---

# आम्हांला 'विश्वमानव' घडवायचा आहे : ९ :

एक दिवस पवनारला 'आजाद हिंद सेने' चे एक गृहस्थ मला भेटायला आले होते. भेटतां च 'जयहिंद' चा त्यांनीं उद्‌घोष केला. मीं प्रतिसाद दिला– 'जयहिंद, जय दुनिया, जय हरि' अशा रीतीनें मी हें सूचित केलें कीं 'जयहिंद' नें पण धोका होऊं शकतो. म्हणून 'जय दुनिया' म्हणायला पाहिजे. आणि शेंवटीं परमेश्वराचें नांव तर हवें च. अखेर आम्ही आहोंत कोण याचा सर्वांत अगोदर विचार केला पाहिजे. आम्ही पहिल्या प्रथम का कर्नाटकवासी, त्यानंतर भारतीय आणि अंती मानव आहोंत कीं प्रथम मानव, नंतर भारतीय, मग कर्नाटकवासी, त्यानंतर परिवारवाले आणि शेवटीं देहस्थित ! अखेर आम्ही आहोंत कोण ?

## विश्व-नागरिकता : मूल्य-परिवर्तनाचा अमोघ मंत्र

हा शिक्षणशास्त्राचा विषय आहे. पूर्वीं आश्रमांत मी जेव्हां शिक्षकाचें काम करीत असे त्यावेळीं वर्धा जिल्ह्यांत च होतों. असें असलें तरी मुलांना वर्धा जिल्ह्याची अथवा महाराष्ट्राची च माहिती देत नसे. उलट हें च सांगत असे कीं आपण या जगताचे निवासी आहोंत, विश्व-नागरिक आहोंत. हें विश्व किती अफाट म्हणाल, तर आकाशामधल्या त्या असंख्य तारका, कोटचवधि त्या प्रचंड अशा तारकांच्या मधें एक सूर्य. अति प्रचंड अशा तारकांच्या तुलनेंत तो कसपटासमान देखील नाहीं. अशा या सूर्याच्या आवतीभोवतीं आपली ही पृथ्वी फिरत असते. ह्या पृथ्वीवर असंख्य (चतुर्विध) प्राणी आहेत. २०-२५ लाख प्रकारच्या जीवजंतूंची मोजणी वैज्ञानिक करतात, तर आपल्या पुराणांत ८४ लाख योनि सांगितलेल्या आहेत. कांहीं हि असो. लाखांची, कोटींची, च गोष्ट आहे. त्यांत च मानव नांवाची एक लहानशी योनि आहे. अशा मानवयोनींतला, मानव-समाजांतला भारत एक देश आहे. त्यांत महाराष्ट्र म्हणून एक प्रदेश आहे.

त्या प्रदेशांत वर्धा नांवाचा एक लहानसा जिल्हा आहे. त्या जिल्ह्यांत एक आश्रम आहे. त्या आश्रमांत दोन शेतें आहेत. आणि त्यांत आम्ही आहोंत. म्हणजे आमचें कांहीं जणूं अस्तित्व च नाहीं.

वेदांत तीन मंत्रांचें एक अघमर्षण सूक्त आहे. त्या मंत्राच्या जपानें 'अघमर्षण' म्हणजे पाप-निरसन होतें. त्या सूक्तांत म्हटलें आहे कीं 'सुरवातीला ऋत आणि सत्य होतें. त्यापासून सूर्य, चंद्र आदि सृष्टि झाली, नक्षत्रें झालीं'--बस, संपलें सूक्त ! कोणी विचारूं शकतो कीं शेंवटीं या सूक्ताच्या जपाचा पापनिवारणाशीं संबंध काय ? तात्पर्य हें च कीं ह्याचा जप करण्यानें इतक्या विशाल ब्रह्मांडाची कल्पना मनुष्यासमोर उभी राहते आणि त्याच्या तुलनेंत आपण किती क्षुद्र आहोंत, ह्याचें भान होतें आणि त्यामुळें अहंकार नाहींसा होतो. पापाची प्रेरणा च होत नाहीं.

दुसरें उदाहरण घ्या. मुलाला भरवायचें असतें. मूल रडतें हट्ट करतें खात नाहीं. आई त्याला अंगणांत नेऊन कावळा, चिमणी दाखविते. मूल कावळा-चिमणीकडे टक लावून पाहतें आणि रडणें बंद होऊन जातें. शेवटीं ह्या मुलानें त्या कावळ्यांत पाहिलें तरी काय ? हें च ना कीं तो माझा भाऊ आहे. त्याला एकदम जाणीव झाली कीं तो आत्मा आहे आणि मी पण आत्मा आहे. तो चेतन आहे आणि मी पण चेतन आहे. झालें; तो एकदम त्याच्याशीं एकरूप झाला आणि आपलें दु:ख विसरला. भारतीयारनें तमिळ मधें एक सुंदर कविता लिहिली आहे. त्यांत तो म्हणतो--"**कोके करवै एगल जाती**" म्हणजे कावळ्याची आणि आपली जात एक च आहे. थोडक्यांत प्रथम आपण मानव आहोंत, नंतर भारतीय, त्यानंतर कन्नडिग. हें जर ध्यानांत येईल तर मूल्य च बदलून जाईल. हे लहानसहान रागद्वेष आणि मानअपमान माझ्या तरी ध्यानांत च येत नाहींत. आतां आपण आहोंत, पण कदाचित् दोन तासानंतर राहणार हि नाहीं. अशा स्थितींत हें सर्व आहे काय ?

## ज्ञानाबरोबर हृदय पण विशाल हवें

माणसाच्या हातीं आज विशाल शक्ति आलेली आहे. पण त्याबरोबर त्याचें हृदय संकुचित राहिलें बुद्धि सीमित राहिली तर मनुष्याच्या जीवनांत

असा कांहीं विसंवाद निर्माण होईल कीं त्यामुळें त्याचें व्यक्तित्व च विस्कळित होऊन जाईल. पूर्वीच्या काळीं मोठमोठ्या सम्राटांना पण जगाचा भूगोल माहीत नव्हता. अकबर केवढा मोठा सम्राट! पण त्याचें भूगोलाचें ज्ञान म्हणाल तर इंग्रज इथें आले आणि त्याच्या दरबारांत गेले तेव्हां त्याला माहीत झालें कीं 'इंग्लंड' म्हणून कोणता तरी एक देश आहे. परंतु आज लहान लहान मुलांना पण जगाच्या भूगोलाचें ज्ञान असतें. इतक्या विशाल आणि व्यापक ज्ञानाबरोबर जर चित्तांत लहानसहान रागद्वेष ठेवूं तर आमचीं शकलें होऊन जातील. ज्ञानाच्या ह्या विशालतेला अनुकूल असें विशाल हृदय पण हवें. तें लाभलें तर मानव इथें स्वर्ग आणूं शकेल.

आज सर्वत्र जीं लहानलहान कामें होऊन राहिलीं आहेत, तीं वेगळीं आहेत आणि समाज-क्रांति, समाजाच्या उत्थानाचें काम, वेगळें आहे. कुठें थोड्याशा भूमिसुधारणा केल्या, किरकोळ मदतीचे अथवा उत्पादन वाढवण्याचें काम करून टाकलें—हीं असलीं कामें जगभर चालत च असतात. अमेरिकेंत भरपूर उत्पादन होत असतें. जगाची अर्धी संपत्ति तिथें आहे. परंतु त्यांना समाधान नाहीं. शांति आणि निर्भयता तिथें नाहीं. दुसऱ्या देशापेक्षां कितीतरी अधिक आत्महत्येचें प्रमाण त्या देशांत आहे. आणि तऱ्हेतऱ्हेचें वेडेसुद्धां तिथें आढळतात ! आपल्या देशाचें उत्पादन वाढवण्याची गरज आहे ह्यांत कुठें मतभेद च नाहीं. परंतु त्याबरोबर मानव-हृदयाचें उत्थान पण गरजेचें आहे. आमची राहणी खालच्या पातळीची आहे, ती वाढली च पाहिजे. परंतु त्याबरोबर च चिंतनाची पातळी पण उन्नत व्हायला हवी.

## ग्रामदानाचा आनंद

ग्रामदान, भूदान आदींमुळें जमीनीचा प्रश्न सुटतो ही गोष्ट गौण आहे. मुख्य गोष्ट ही आहे कीं त्यामुळें चिंतनाची पातळी उंचावते. आपलें सारें गांव एक परिवार होईल, तिथली हवा पाणी जमीन—परमेश्वराच्या या साऱ्या देणग्या—सर्वांच्या होईल, आम्ही परस्परांच्या सहयोगानें काम करूं, मी स्वतःसाठीं नाहीं पण समाजासाठीं काम करीन, केवळ आपली नाहीं तर साऱ्या समाजाची चिंता करीन. अशा वृत्तीनें सारी नैतिक पातळी बिलकुल च बदलून जाते. ह्या साऱ्या कारणामुळें मला ह्या आंदोलनांत

उत्साह वाटतो. वय झालें असलें तरी सुद्धां थकवा वाटत नाहीं. कारण अंतरंगांत एक अद्‌भुत आनंद आहे. त्याचें शब्दांत वर्णन करणें कठिण. मी तर निरंतर अमृतपान करीत असतों आणि त्याची थोडीथोडी गोडी सर्वांना चाखवूं इच्छितों.

## भूदान-ग्रामदानांनीं नव्या विश्वाची निर्मिति

आम्हांला नवीन मानव बनवायचा आहे. जुन्या गोष्टी संपुष्टांत आल्या. आतां तर देशांच्या हद्दी सुद्धां स्थिर राहूं शकत नाहींत. एकदा आस्ट्रेलियाचे एक गृहस्थ मला भेटायला आले होते. जगाच्या संदर्भांत भूदानाचा अर्थ काय होतो म्हणून त्यांनीं मला विचारलें. मीं म्हटलें, "हा च अर्थ कीं ऑस्ट्रेलियांत मुबलक जमीन आहे आणि जपानजवळ कमी, तेव्हां तुम्ही जपानवाल्यांना आमंत्रण द्यावें." उत्तर ऐकून बिचारा सर्द झाला. तो म्हणाला, "हो, आमच्याजवळ तशी जमीन विपुल असली तरी आमच्या संस्कृतीची रक्षा व्हावी अशी आमची इच्छा आहे. म्हणून आमच्या संस्कृतीशीं ज्यांचें साम्य आहे असे युरोपचे लोक येतील तर त्यांना स्वीकारायला आम्ही तयार आहोंत." मीं म्हटलें, "हें च विष आहे. तें नष्ट करण्यासाठीं भूदानयज्ञ चाललेला आहे." जपानची सभ्यता अलग, आस्ट्रेलिया, युरोप आणि हिंदुस्थानची सभ्यता अलग, हिंदूंची सभ्यता अलग आणि मुसलमानांची सभ्यता अलग-- या साऱ्या अभद्र गोष्टी घालवण्यासाठीं च भूदानयज्ञ आहे. भूदानांत आमच्यासमोर कांहीं लहान उद्दिष्ट नाहीं. आम्हांला मानवजीवन बदलायचें आहे आणि नवीन विश्व निर्माण करायचें आहे.

## आध्यात्मिक मूल्यें प्रस्थापित करण्याचा यत्न

ग्रामदानामुळें भूमिसुधारणा होते, जमीनीचे प्रश्न सुटतात हें सर्व खरें आहे. परंतु हीं सारीं गौण फळें आहेत. जगभरची मंडळी आमच्या भूदानयात्रेंत सामील होतात, तीं कांहीं हें पहायला सामील नाहीं होत कीं भूमिसुधारणा कशी होत आहे. तीं येथें आध्यात्मिक मूल्यांची स्थापना कशी होऊन राहिली आहे, हें पाहण्यासाठीं येतात. यावेळीं हिंसेपुढें जग

अगदीं बेजार आणि हैराण झालेलें आहे. सैन्यशक्तीनें प्रश्न सुटत नाहींत हें निश्चित होऊन गेलेलें आहे. तरी सुद्धां जुनी चाकोरी च हाताळली जात आहे. आम्ही आध्यात्मिक मूल्यें स्थापन करण्याच्या गोष्टी करतों, परंतु न सैन्य कमी करतों, न पोलिसाचें काम हि सीमित करतों. आजच्या स्थितींत आमचें सांगणें, सांगणें च राहील. म्हणून हिंदुस्थानांत जनतेकडून नैतिक पद्धति अवलंबण्याचा यत्न व्हायला हवा. त्यासाठीं च शांतिसेना आणि ग्रामदान आहे. तुम्ही ह्या दृष्टीनें ह्या विषयाचें अध्ययन करावें अशी आमची इच्छा आहे. आमचा एकच जप आहे. तो म्हणजे-- विश्वमानव निर्माण करणें.

बंगलोर (म्हैसूर)
१८-१-'५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८६३ वि: लिबंध
क्रमांक १५०६ नों: दि: २५।८।६८

## जगाला रूप देणाऱ्या तीन शक्ति : १० :

साहित्यापासून मला नेहमीं फार उत्साह मिळतो. साहित्यदेवतेसंबंधीं माझ्या मनांत मोठी श्रद्धा आहे. एक जुना प्रसंग मला आठवतो. बालपणींचा, जवळपास दहा वर्षांचा काळ माझा एका लहानशा खेड्यांत च गेला. नंतरचीं दहा वर्षें बडोद्यासारख्या मोठ्या शहरांत गेलीं. मी कोंकणांतील खेड्यांत होतों, आणि वडील कांहीं अध्ययन आणि कामाच्या निमित्तानें बडोद्याला असत. दिवाळीच्या दिवसांत ते बहुधा घरीं येत असत. एक दिवस आई म्हणाली, "आज तुझे बाबा येणार आहेत. तुझ्यासाठीं ते गोडगोड मेवा-मिठाई आणतील." वडील आले. लगे च मी त्यांच्याजवळ गेलों. त्यांनीं आपली मेवा-मिठाई माझ्या हातांत दिली. मिठाई म्हणजे गोल गोल लाडवासारखी कांहीं वस्तु, असें आम्ही समजत असूं. पण आणलेलें मिठाईचें पाकीट गोल नव्हतें, तें चपटेंसें होतें. मला वाटलें कीं काहीं विशेष प्रकारची मिठाई असेल. उघडून पाहिलें तर त्यांतून दोन पुस्तकें निघालीं. तीं घेऊन मी आईजवळ गेलों आणि तिला दाखवलीं. तेव्हां आई म्हणाली,

"बाळा, बाबांनीं तुझ्यासाठीं जो खाऊ आणला आहे, त्याहून अधिक गोड खाऊ दुसरा कोणता च असूं शकत नाहीं." तीं पुस्तकें रामायण आणि भागवताच्या गोष्टींचीं होतीं, असें मला आठवतें. आजपर्यंत तीं पुस्तकें मीं कितीदां तरी वांचलीं. आईचें तें वाक्य 'याहून अधिक गोड दुसरा कोणता च खाऊं असूं शकत नाहीं' मीं कधीं विसरलों नाहीं. या वाक्यानें माझ्यावर अशी मोहनी घातली आहे कीं आजसुद्धां मेवा-मिठाई मला तितकी गोड वाटत नाहीं, जितकें कीं चांगल्या विचारांचें पुस्तक !

## साहित्य कठिणतम साधनेची सिद्धि

तसें तर भगवंताच्या अनंत शक्ति आहेत, पण साहित्यांत त्या शक्तींची केवळ एक च कला प्रकट झालेली आहे. परमेश्वराच्या शक्तीची ही कला कवींना आणि साहित्यिकांना प्रेरणा देत असते. कवि आणि साहित्यिक च त्या शक्तीला हेरतात. दुसऱ्यांना त्याचें दर्शन होत नाहीं. महंमद पैगंबराबद्दल सांगतात कीं ते जेव्हां समाधींत लीन होत तेव्हां अगदीं घामाघूम होऊन जात. जवळच्या लोकांना त्यांचें तें घोर तप पाहून कापरें भरून जाई ! किती वेदना होत असतील त्यांना ! परंतु ती वस्तु होती 'ती'च, जिला अरबींत 'वह्‌ई' म्हणतात. वह्‌ई म्हणजे पुस्तक किंवा वही नव्हे. 'वह्‌ई' त्या वस्तुला म्हणतात, जी परमेश्वराचा निरोप मानवाजवळ पोंचवते. तो परमेश्वराचा संदेश जेव्हां मनुष्याच्या हृदयावर स्वार होतो, तेव्हां फारच क्लेश, तीव्र वेदना (टार्चर) होतात, ह्याला वाटल्यास प्रसूति-वेदनेची उपमा देता येईल. प्रसूतीच्या काळीं स्त्रियांना ज्या वेदना होतात त्याहून हि ही वेदना अति तीव्र असते. माझ्या अनुभवावरून मी हें सांगूं शकतों कीं त्यावेळीं असें कांहीं वाटूं लागतें की आपण स्वतःच्या अस्तित्वाला पारखे होत आहोंत. कोणती तरी वस्तु आपल्यावर सत्ता चालवूं पाहत आहे. अशी कांहीं वस्तु, जी आपण टाळूं शकत नाहीं, परंतु टाळता आल्यास टाळूं इच्छितों; वाटतें टळेल तर बरें. पण ती टळत नाहीं; टाळली जाऊं शकत नाहीं. अशा वेदनेच्या अंतीं जें दर्शन होतें तें च लोकांना चाखायला मिळतें. ती वेदना लोकांना माहीत होत नाहीं. ती फक्त कवि आणि साहित्यिक च अनुभवतात, जाणूं शकतात.

## कवीची व्याख्या

माझ्या दृष्टीनें कवि म्हणजे दोनचार कडवीं लिहिणारा, अनुप्रास जमवणारा नाहीं. कवि 'क्रांतदर्शी' असतो. ज्याला पलीकडचें दर्शन आहे, तो आहे कवि. ह्या बाजूचें, अलीकडचें, पहायला तर हे दोन डोळे आहेत. त्यांचा आमच्यावर फार मोठा उपकार आहे च. हे डोळे आमच्या समोर ही सजलेली सृष्टि उभी करतात. जगाचें वैभव आम्हांला दाखवितात. सृष्टीच्या सौंदर्याचें पान याच दोन डोळ्यांनीं आम्ही करीत असतों. तसे हे डोळे अपराधी पण आहेत. या दोन डोळ्यापलीकडे एक तिसरी वस्तु आहे, जी यांच्यामुळें दृष्टिआड होते. या वैभवशाली जगाहून कितीतरी अधिक संपन्न असें दुसरें एक जग आहे, त्याला हे दोन डोळे लपवून ठेवतात. या डोळ्यांची तिथपर्यंत पोंच नाहीं. ह्यांच्यामुळें मनुष्य त्या जगाकडे आकृष्ट होत नाहीं. परंतु जेव्हां तिसरा डोळा उघडतो, तेव्हां त्या जगाचें दर्शन, म्हणजे जगांतील सर्वसामान्य व्यवहारांत आणि त्या व्यवहाराला आधारभूत अशा ज्या शक्ति आहेत त्यांचें दर्शन, होतें. त्यांतून काव्यस्फूर्ति होते, साहित्याची स्फूर्ति होते. म्हणून च माझी साहित्यिकांवर फार श्रद्धा आहे.

## जगाला रूप देणाऱ्या शक्ति

लोक मला विचारतात कीं परमेश्वराशिवाय या जगाला आकार देणारे कोण कोण आहेत? कुणाला वाटतें कीं राजकारणी पुरुषांनीं जगाला रूप दिलें. मोठेमोठे इतिहास लिहिले जातात— बाबर आला आणि त्यानें हीं हीं कामें केलीं. क्लाइव्हनें हें केलें, तें केलें. इतिहासाच्या नांवावर ह्या गोष्टी शिकवल्या जातात. शाळेंत मुलांना त्या घोकायला सांगतात. परंतु समाजाच्या जीवनांत कुठें बाबराचा आहे का पत्ता? क्लाइव्हची आहे का मोजदाद? हे जगाला रूप देणारे होऊं शकत नाहींत. जगाला रूप देणाऱ्या आहेत तीन शक्ति : विज्ञान, आत्मज्ञान आणि साहित्य!

## विज्ञानाची शक्ति

वैज्ञानिक जगाच्या जीवनाला वळण लावतो. माझ्या समोर हा लाऊड-स्पीकर आहे म्हणून शांतीनें तुम्ही सगळे ऐकूं शकता. हा नसता तर माझा

आवाज इतक्या लोकांपर्यंत पोचूं शकला नसता. माझें दर्शन घेऊन आणि नमस्कार करून लोकांना जावें लागलें असतें अथवा मला च लहान समुदायांत बोलावें लागलें असतें. पण आज एवढा समुदाय शांतीनें ऐकत आहे. हा आणखी दहा पट असता तरी ऐकूं शकला असता. त्याची कल्पना जुन्या काळच्या लोकांना येऊं च शकली नसती.

विज्ञानानें जीवनांत केवळ स्थूल परिवर्तन होतें असें नाहीं, तर मानसिक परिवर्तन पण होत असतें. छापखान्यामुळें विज्ञानाचा किती सहजपणें प्रचार होऊं शकतो याची कल्पना आमच्या पूर्वजांना आलेली नसणार. हें खरें, कीं त्या साधनामुळें वाईट गोष्टींचा हि प्रचार होऊं शकतो ! परंतु जीवनाला वळण लावणाऱ्या वस्तु विज्ञानानें निर्माण होतात आणि वैज्ञानिकांनीं जीवनाला वळण दिलें आहे, यांत कांहींच शंका नाहीं. अग्नीच्या शोधानंतर सारे ऋषिगण भक्तिभावानें अग्नि-गीतें गावं लागले. हीं गीतें वेदामध्यें आहेत. कदाचित् आतां अणुशक्तीचें गुणगान करणारे ऋषिगण निर्माण होतील. आजतरी अणुशक्ति संहार करण्यासाठीं आली आहे. संहारकाच्या रूपांत च ती आमच्यासमोर उभी आहे. परंतु ती शिवरूप पण आहे, केवळ रुद्ररूप च नाहीं. जेव्हां ती शिवरूपानें प्रगट होईल तेव्हां जगाचें जीवन च बदलून जाईल.

## आत्मज्ञानाचें सामर्थ्य

जीवनाला रूप देणारी दुसरी शक्ति आहे आत्मज्ञान. जगाच्या पाठीवर जिथें जिथें आत्मज्ञानी जन्माला आले, तिथें तिथें त्यांच्यामुळें सर्वच्या सर्व जीवन बदलून गेलें. येशूख्रिस्त आले, गौतमबुद्ध आले, लाओत्से आले, महंमद पैगंबर आले, नामदेव आले, तुलसीदास आले, माणिक्यवाचकर आले. ठिकठिकाणीं असे महात्मे जन्मले. अशा एकेका व्यक्तीच्या आगमनामुळें लोकांच्या जीवनाचें स्वरूप बदलून गेलें. लोकांच्या जीवनाचें स्वरूप बदलणारी ही दुसरी शक्ति आहे.

## साहित्याची शक्ति

जगाला आकार देणारी तिसरी शक्ति आहे, साहित्य. वाल्मीकि आले, व्यास आले, डॉन्टे आले, होमर आले, शेक्सपियर आले, रवींद्रनाथ

आले. असे थोर थोर पुरुष जगांत आले आणि त्यांनीं अशी वस्तु दिली कीं जिच्यामुळें जीवन नेहमींसाठीं समृद्ध बनावें. त्यांनीं जगाला अशी विचारशक्ति दिली कीं ज्यामुळें जगाचें रूप पालटून गेलें. जगाला शांतीची गरज भासली तेव्हां शांतीचा विचार दिला. उत्साहाची गरज निर्माण झाली, उत्साह दिला. आशेची आवश्यकता भासली, आशा दिली. ज्यावेळीं ज्या ज्या वस्तूची गरज भासली ती ती वस्तु त्यांनीं समाजाला दिली. जगांत ज्या मोठमोठ्या क्रांत्या झाल्या, त्यांच्यामागें असल्या विचारकांचे विचार च होते. ज्यांना पलीकडचें दर्शन होते अशा साहित्यिकांचें तें साहित्य होतें.

## वाणी : विज्ञान आणि आत्मज्ञानामधील पूल

या तीन शक्तींनीं आजवर जगाला रूप दिलें आहे. पुढें सुद्धां जीवनपद्धतीला स्वतंत्र वळण लावणाऱ्या या च तीन शक्ति राहणार : विज्ञान, आत्मज्ञान आणि साहित्य अथवा वाक्शक्ति, जिला 'वाणी' पण म्हणतात. विज्ञानामुळें जीवनाचें बाह्यरूप बदलून जातें आणि त्यामुळें मनुष्याच्या मनावर परिणाम करणारी अनेकविध परिस्थिति निर्माण होते. परंतु विज्ञान सरळ मनावर परिणाम घडवीत नाहीं. वाणी विज्ञानाच्या पुढें जाऊन हृदयावर च सरळ घाव घालते. ती अगदीं हृदयाचा ठाव घेते. मागाहून आत्म-ज्ञान आंत प्रकाश पाडतें. विज्ञान बाहेरून प्रकाश पाडतें. ह्या दोहींच्या मधें वाणी पुलाचें काम करते. ती दोन्ही किनाऱ्यांचा संयोग घडविते आणि दोन्हीकडे प्रकाश देते. तुलसीदासजी म्हणतात--

**रामनाम-मणि-दीप धरु, जीह देहरी-द्वार ।**
**तुलसी भीतर बाहिर हुं जौं चाहसि उजियार ॥**

"तुला जर आंत आणि बाहेर उजेड हवा असेल, प्रकाश हवा असेल, तर हा रामनामरूपी मणिदीप जिव्हारूपी उंबरठ्यावर ठेवून दे. इथें दिवा लावता च, आंत आणि बाहेर, दोन्हीकडे प्रकाश होईल." हा असला थोर उपकार वाणी करते. माणसाला परमेश्वराची ही अप्रतिम देणगी आहे.

९८९४८

## वाणीचा सदुपयोग व्हावा

वाणीची ही देणगी मनुष्याची फार मोठी शक्ति आहे. या शक्तीचा जेथें दुरुपयोग होतो, तेथील समाज अवनत होतो आणि जेथें तिचा सदुपयोग होतो, तेथील समाज उन्नति करतो. ऋग्वेदांत म्हटलें आहे :

**"सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रत ।"**

आपण धान्य चाळतों तेव्हां त्यांतील भरीव दाणे तेवढे ठेवून घेतों आणि बाकीचा भुसा, कोंडा, फेकून देतों. त्याच प्रमाणें ज्या समाजांत वाणीचें शुद्धीकरण चालतें, ज्ञानीपुरुष मननपूर्वक वाणी परिष्कृत करीत असतात आणि उत्तम, पावन, पवित्र, शुद्ध, निर्मळ, स्वच्छ, निखळ शब्द हुडकून काढतात, त्या शब्दांचा उपयोग करतात, त्या समाजांत लक्ष्मी वास करते.

अनेकांना वाटतें कीं सरस्वती आणि लक्ष्मीचें वाकडें आहे. परंतु ऋग्वेदानें याहून अगदीं भिन्न म्हटलें आहे. लक्ष्मीचें आणि सरस्वतीचें वैर आहे असें हृणण्यांत किती अज्ञान आहे ! वाणी तर संयोजन-शक्ति आहे. ती तर अंतरंगांतील सृष्टि आणि बाहेरचें जग, आत्मज्ञान आणि विज्ञान, यांना जोडणारी कडी आहे. जगांतील सर्व शक्तींना जोडणारा जर कोणता दुवा असेल तर तो वाणीचा आहे. असें असतांना तिचें कुणाबरोबर वांकडें कां असावें ? वाणी सूक्ष्म-शक्ति आहे, त्यामुळें तिच्या आंत दुसऱ्या शक्ति दडून असतात. माझी तर वाणीवर फार भिस्त आहे. श्रवण आणि कीर्तन मिळून वाणी बनते.

## मी 'प्रकाश' इच्छितों

तुम्हां साहित्यिकांकडून मी तुमच्या विचाराचा 'प्रकाश' इच्छितों. हा अगदीं स्वतंत्र शब्द आहे, आपल्या भारताचा हा खास शब्द आहे. इंग्रजींत एक शब्द आहे–'प्रोपेगंडा', जो अगदीं उथळ आहे. त्याच प्रमाणें दुसरा शब्द आहे–'पब्लिसिटी. पण मला तर न 'प्रोपेगंडा' हवा, न 'पब्लिसिटी'. मला हवा प्रकाश. लोकांसमोर आमच्या कामाची अवास्तव स्तुति केली जावी असें मला वाटत नाहीं, अथवा आमच्या कार्यांतील प्रत्येक

लहान-सहान गोष्ट वारंवार सर्वत्र सांगत सुटावें हें हि मला नको. परंतु या कार्यामागें जो विचार आहे, जो फार च मजबूत, खोल आणि व्यापक आहे, त्याचा प्रकाश आम्ही आपल्या आचरणानें आणि प्रयोगानें वाढवावा. शुद्ध विचार लोकांना समजवावा. यावेळीं आम्हांला जास्तींतजास्त खोल, व्यापक आणि मजबूत विचार उपलब्ध आहेत. आमच्या नंतर येणाऱ्या लोकांना याहून अधिक मजबूत, खोल आणि व्यापक विचार प्राप्त होतील. तरी पण आम्हांला जे विचार उपलब्ध आहेत, ते विश्वव्यापक विचार आहेत. आत्म्याच्या अंतरांत नेणारे आहेत. आजवरचे संत आणि दार्शनिक जितक्या खोलवर गेले होते, त्याहून अधिक खोलांत आम्हांला जावें लागेल तेव्हांच सर्वोदय-विचाराचें यथार्थ दर्शन होऊं शकेल.

## साहित्यिक सर्वथा स्वतंत्र

प्रामाणिक वैज्ञानिक आणि स्वतंत्र साहित्यिक आत्मज्ञान्याप्रमाणें अत्यंत स्वतंत्र असतो. तो कधीं स्वतःला विकीत नाहीं. जग आपलें म्हणणें मानो वा न मानो, त्याची त्याला पर्वा नसते. ह्याबाबतींत तो अत्यंत सुरक्षित जीव आहे. म्हणून च तुलसीदासजींनीं म्हटलें आहे--

**'स वाग्विसर्गो जलताऽघ विप्लवो'**

हा वाग्विसर्ग–ही भागवताची भाषा आहे–जनतेचा अघविप्लव होईल. म्हणजे जो वाक्समूह जनतेच्या पापाला धुणारा असेल, तो च 'साहित्य' म्हणविला जाईल. जनतेच्या पापांना जो शब्द धुईल, तो च सारस्वत म्हटला जाईल. बाकीचें सारें वाङमय च राहील. साहित्याचा अर्थ आहे, जीवनाच्या जोडीनें सतत राहणारी वस्तु, आयुष्याची जी शिदोरी तें च साहित्य. तें निरंतर बरोबर असावें.

पंढरपूर,
३०-५-'५८

## अहिंसात्मक सहयोगी योजनेचा अर्थ : ११ :

येलवालला भरलेल्या ऐतिहासिक ग्रामदान-परिषदेंत भारतांतील भिन्न-भिन्न विचारवादी आले होते आणि त्यांनीं दोन दिवस चर्चा करून देशाला एक संहिता दिली. त्या संहितेंतील दोन शब्द आमच्यासाठीं द्विविध आशीर्वादरूप आहेत. त्यांत त्यांनीं लिहिलें आहे : 'विनोबांनीं सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठीं जी अहिंसात्मक आणि सहयोगी पद्धत स्वीकारली आहे, ती आम्हांला मान्य आहे.' असें लिहिण्यांत त्यांनीं आमच्या कामांत दोन गोष्टी पाहिल्या. पहिली ही कीं आमची कार्यपद्धति अहिंसात्मक आहे. हा झाला प्राचीन आशीर्वाद. आणि दुसरी ही कीं, ही सहयोगी पद्धत आहे. हा आहे आधुनिक आशीर्वाद.

### सर्वोदय-विचार : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक

अहिंसात्मक आणि सहयोगी, या दोन्ही कार्यपद्धति आमच्या सर्वोदयाच्या कामास भिडल्या आहेत. अहिंसात्मक पद्धत आत्म्याच्या एकतेच्या अनुभवावर उभी आहे. हा आहे आध्यात्मिक विचार. आणि सहयोगी पद्धत उभी आहे विज्ञानावर. अशा तऱ्हेनें आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दोन्हींचा योग सर्वोदयांत झाला आहे. म्हणून च तो पुढाऱ्यांना मान्य झाला. आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दोन्ही दृष्टि मिळून सर्वोदय-विचार होतो. कांहींना वाटतें कीं सर्वोदयवाले म्हणजे जुन्याला बिलगून राहणारे, कोणत्या हि तऱ्हेच्या वैज्ञानिक शोधांची किंमत च नसलेले. हे मिलपेक्षां चरखा पसंत करतील, चरख्यापेक्षां तकली पसंत करतील, धातूच्या तकलीपेक्षां लाकडी तकली निवडतील. यापुढें जाऊन जर कुणी बोटांनींच सूत काढील तर त्यांना तें आणखीन च पसंत पडेल. सर्वोदयाच्या आध्यात्मिकतेबद्दल कुणाला शंका नव्हती. पण त्याच्या वैज्ञानिकतेबद्दल मात्र साशंकता होती. आतां दोन्ही बाबतींत निःसंदिग्धता झाली आणि आम्हांला द्विविध आशीर्वाद मिळाला.

## लाओत्सेची योजना केवळ अहिंसात्मक

वैज्ञानिकतेच्या अभावीं अहिंसात्मक आध्यात्मिक योजना कशा प्रकारची होईल, तिचें एक उदाहरण देतों. चीनमधें लाओत्से म्हणून एक दार्शनिक होऊन गेले. त्यांच्या आदर्श खेड्याच्या कल्पनेंत गांव सर्व वस्तूंत स्वाश्रयी राहील, त्याला बाहेरून कोणती च वस्तु घ्यावी लागणार नाहीं, खेडूत स्वतःच्या खेड्यांत सर्व प्रकारांनीं संतुष्ट राहतील; परंतु रात्रीं जेव्हां त्यांना दूरवरच्या कुत्र्याचें भुंकणें ऐकूं येतें तेव्हां हे अंदाज करतील कीं जवळपास एखादें खेडें निश्चित च असणार. ही आहे वैज्ञानिकतेच्या अभावीं बनलेली अहिंसात्मक योजना. या योजनेंत एक खेडें दुसऱ्या खेड्याची हिंसा करीत नाहीं. या खेड्यांतले लोक दुसऱ्या कोणत्या खेड्यांतल्या बांधवांना भेटायला जात नाहींत. त्यांना संपर्काची कांहीं गरज नाहीं. आम्ही सर्वोदयाची गोष्ट सांगतों तेव्हां इथल्या पुढाऱ्यांना वाटतें कीं हे लोक बहुतेक लाओत्सेवाली योजना अमलांत आणूं इच्छित आहेत.

## स्टॅलिनची योजना : केवळ सहयोगी

आध्यात्मिकतेच्या अभावीं—अहिंसेच्या अभावीं—वैज्ञानिक योजना कशी होते, हें आतां पहा. त्यासाठीं आपण रशियाचें उदाहरण घेऊं. तिथली सर्व शेती सामूहिक केलेली आहे. त्यासाठीं समोरचा तयार आहे किंवा नाहीं, याची तिथें विचारपूस च केली जात नाहीं. शेतीच्या कामांत बैलांची सल्ला कुणी घेत नाहीं. त्याचप्रमाणें योजना बनवण्यांत सामान्य जनतेला तिथें कुणी पुसत नाहीं. योजना सरकार च करील आणि तदनुसार सर्वांना काम करावें लागेल. बैलाचा धर्म आहे, अंगचोरपणा न करतां काम देणें आणि व्यवस्थापकाचें काम आहे, बैलांना पोटभर चारापाणी देणें. ह्या योजनेंत अन्नवस्त्र सगळ्यांना मिळेल, भौतिक गरजांची उणीव राहणार नाहीं. परंतु तुमच्यापाशीं कुणी विचार-विनिमय करणार नाहीं; तुम्हांला तुमचे विचार आचरणांत आणण्याची स्वतंत्रता राहणार नाहीं.

## सर्वोदयांत दोन्हींचा समन्वय

लाओत्सेवाली आणि स्टॅलिनवाली अशा दोन योजना मी तुमच्या समोर मांडल्या. लाओत्सेच्या योजनेला 'अहिंसात्मक' विशेषण लागू होतें,

तर स्टॅलिनच्या पद्धतीला 'सहयोगी' म्हणता येईल. सर्वोदयांत मात्र दोन्हीचा समावेश झालेला आहे. ही 'अहिंसात्मक आणि सहयोगी' म्हटली गेली आहे, आणि म्हणून च हिला देशांतील सर्व भिन्नभिन्न विचारकांचा आशीर्वाद मिळाला आहे.

म्हैसूर,
२५-९-'५७

---

## विज्ञानाला अहिंसेची बैठक हवी : १२ :

प्रश्न विचारण्यांत आला आहे कीं विज्ञानाचा स्वीकार करण्यासाठीं आम्हांला ग्रामोद्योगाच्या योजनेंत प्रत्यक्ष काय करावें लागेल ?

अहिंसा आणि विज्ञान यांच्या समन्वया ने च 'सर्वोदय' होतो असा ह्याबाबतींत माझा विचार आहे. अहिंसेशिवाय शोषणमुक्त समाजाची स्थापना होऊं शकत नाहीं आणि विज्ञानाच्या अभावीं सर्वांना मजूरी मिळणें जवळ जवळ अशक्य आहे. विज्ञान मजूरी वाढवूं शकतें परंतु त्यांत शोषण कमी करण्याची क्षमता नाहीं. शोषण कमी करण्याची क्षमता मनुष्याच्या योजनेवर अवलंबून आहे. त्यासाठीं योजना अहिंसेची असावी आणि त्याला विज्ञानाचें सहकार्य असावें, तेव्हां च सर्वोदय होईल.

### अनुकूल उपकरणें ग्राह्य

मजूरी देण्यासाठीं आणि उत्पादन वाढवण्यासाठीं आम्हीं अवजारांचा उपयोग करावा. हीं अवजारें अशीं हवींत कीं त्यांच्यामुळें सर्वांना काम तर मिळावें पण अधिक परिश्रम होऊं नये. प्रत्येक माणसाला दहा तास काम करण्याची योजना आखल्यास ती अयशस्वी होईल. इतकें तास काम करणें प्रत्येकाला शक्य नाहीं आणि तें उचित हि नाहीं. म्हणून माणसाचे श्रम वाचले पाहिजेत, उत्पादन वाढलें पाहिजे आणि कुणी बेकार पण राहता कामा नये. आमच्या या विचारांना जीं जीं उपकरणें अनुकूल असतील,

त्यांचा आम्ही उपयोग करूं. शेतीसाठीं आज जीं उत्तमांत उत्तम अशीं अवजारें आहेत, त्यांचा योग्य तऱ्हेनें उपयोग केल्यास, आज आहे त्यापेक्षां चारपांच पट उत्पन्न सहज च वाढू शकतें.

उदाहरण म्हणून दोर वळण्याचें च काम घ्या. तो हातांनीं वळण्यापेक्षां उपकरणांनीं वळल्यास, तेवढ्या च वेळांत चारपांच पट वळता येईल. सहापट देखील होऊं शकेल. चौपट तर मी स्वतःच वळला आहे. अशा च तऱ्हेचें शिवण्याचें काम आहे. हातांनीं शिवण्यांत ज्या अडचणी आहेत, त्यांचें निवारण शिवण्याच्या मशीननें करता येईल. यासाठीं तें मशीन अवश्य उपयोगांत घ्यावें. अडचणी दूर करण्याऐवजीं लोक काम च सोडून पळ काढतात. शिवण्याचें काम स्त्रियांचें, पण हल्लीं पुरुषांनीं तें घेतलें ! हें असें कां ? मशीनच्या मदतीनें शिवण्याचें काम स्त्रियां सहज करूं शकतात.

विणकामसुद्धां एक आवश्यक उद्योग आहे. हातमागावर विणणें तर चांगलें च आहे. स्थानीय उपयोगासाठीं 'पॉवर' वापरल्यास त्याला हि तशी हरकत नाहीं. मी तर अणुशक्तीची प्रतीक्षा करीत आहे. अणुशक्ति विकेंद्रित होऊं शकते. विकेंद्रित अणुशक्तीचा खेड्या-पाड्यांतून उपयोग होऊं शकतो. असें झाल्यास मी तिचें सहर्ष स्वागत करीन. अणुशक्तीचा उपयोग उत्पादन-वृद्धि करून दुसऱ्यांचें शोषण करण्यांत केल्यास, तें चुकीचें होईल. म्हणून अणु-शक्ति प्राप्त करून तिच्या सहाय्यानें दुसऱ्या क्षेत्राचें शोषण न करता तिचा उपयोग केल्यास माझा कसला च विरोध नाहीं.

## विजेच्या उपयोगाची मर्यादा

आज परंधाम आश्रमचीं मुलें आलीं होतीं. परंधामला वीज आलेली आहे. मी त्या मुलांना म्हटलें कीं विजेचा पूर्ण उपयोग व्हायला हवा. रात्रीच्या प्रकाशासाठीं मला विजेची गरज नाहीं. तिचा मुख्य उपयोग उद्योगासाठीं व्हायला पाहिजे. पाणी उपसण्यासाठीं, छापखान्यासाठीं किंवा अशा दुसऱ्या कामासाठीं विजेचा उपयोग करता येईल.

हातांनीं दळण्याची प्रवृत्ति आतां जवळजवळ नाहींशी झालेली आहे. हातांनीं दळणें तर सर्वोत्तम आहे. पण दळणें शक्य नसल्यास, यंत्रांनीं दळून घेतल्यास त्यालासुद्धां माझी कांहीं हरकत नाहीं. फक्त त्या यंत्राचा वेग

एवढा ठेवावा कीं उष्णतेनें धान्याची नासाडी होणार नाहीं. आजच्या पिठाच्या गिरण्यांतून इतका वेग असतो कीं त्यामुळें अन्नाचें सत्त्व कमी होऊन जातें. एका दृष्टीनें मला हा गुन्हा वाटतो. परंतु कमी वेगाचें यंत्र असल्यास, कुणाचें शोषण होत नसल्यास आणि ती गांवची सार्वजनिक वस्तु असल्यास माझा अशा यंत्रावर आक्षेप नाहीं. पूर्वींपासून माझ्या मनाची अशी ही ठेवण आहे.

## लगदा यंत्रांनीं बनवा

बापूंच्या बरोबर सुद्धां एक वेळीं अशा तऱ्हेची चर्चा झाली होती. फार जुनी गोष्ट आहे. माझे वडील मगनवाडींत आले होते. ते तिथें सात दिवस राहिले. त्यांना तिथें फार बरें वाटलें. परंतु तिथें हातकागद बनवण्यासाठीं जो लगदा बनवला जात होता, तो हातांनीं बनवणें चुकीचें आहे, यंत्रांनीं तो बनवला जावा असें त्यांना वाटे. माझे वडील एक वैज्ञानिक होते. त्यांचें सारें जीवन विज्ञानाच्या शोधांत खपलें होतें. लहानपणीं ते मला विज्ञान शिकवीत. विज्ञानाच्या संबंधानें वडिलांशीं माझी रोज चर्चा होत असे आणि आईशीं भक्तीच्या संबंधानें. अशा तऱ्हानें विज्ञान आणि भक्ति दोन्हींची चर्चा लहानपणापासून मी रोज ऐकत आलों आहे. वडिलांनीं माझ्याकडून विज्ञानाचे कित्येक प्रयोग करून घेतले. वडिलांनीं हातकागदाच्या लगद्याबाबत जें मत प्रदर्शित केलें, तें मीं बापूंना सांगितलें. माझ्या वडिलांना सर्व जण 'बाबा' म्हणत. मी बापूंना म्हणालों कीं कागदाचा लगदा यंत्रांनीं बनवण्यांत कांहीं दोष नाहीं असें बाबा म्हणत होते. आपलें मत सांगून बाबा बडोद्याला निघून गेले. त्या वेळीं ते तिथें राहत असत. तिथें जाऊन त्यांनीं मला एक पत्र लिहिलें. त्यांत शेवटीं लिहिलें होतें "हें जें पत्र तुला लिहिलें आहे, त्याला लागलेल्या सर्व वस्तु मीं तयार केलेल्या आहेत. कागद मीं बनविला आहे, शाई मीं बनवलेली आहे, आणि लेखणी–जिनें मीं हें पत्र लिहीत आहे–ती सुद्धां मीं बनविली आहे. अशा रीतीनें सारेच्या सारें पत्र स्वावलंबी आहे. ह्या कागदांत दुसऱ्या रंगाची थोडी छटा राहून गेलेली आहे. ही छटा घालवण्यासाठीं मेहनत घ्यावी लागते म्हणून मी ती तशी च राहूं दिली आहे. त्यानें कांहीं खास नुकसान होत

नाहीं." अशाप्रकारें एका व्यक्तीनें दुसऱ्याची मदत न घेता सगळाच्या सगळा कागद बनविला. त्या साठीं जो लगदा लागतो तो केला. लगद्याबाबत काय नीति असावी यासंबधीं त्यावेळीं बापूंशीं पुष्कळ चर्चा झाली होती. बाबांच्या मृत्यूनंतर दोनचार वर्षांनीं हा च विषय पुन्हां निघाला. आतां लगदा बहुतेक यंत्रांनीं तयार केला जातो.

## ही पण खादी च आहे

चरख्याच्या जागीं अंबर चरखा आला तेव्हां त्याचें स्वागत करायचें कीं नाहीं ह्यावर चर्चा झाली. मी तर त्याचें पूर्वींपासून च स्वागत केलें होतें. सर्व सेवा संघाच्या विचारकांना सुरवातीस त्याचें स्वागत करणें योग्य वाटलें नाहीं. आणि तें योग्य च होतें. एकदम नवीन विचाराचें स्वागत झाल्यास त्यांतून गंभीर प्रश्न पण निर्माण होऊं शकतात. मी कृष्णदासला म्हणालों, "सर्व सेवा-संघांत चर्चा होत आहे, ती आणखी कांहीं दिवस चालेल. परंतु माझ्याकडून अंबर चरख्याचें पूर्ण स्वागत आहे." तेव्हां कृष्णदास जोरानें कामाला लागला. नुकतें च मीं साबरमतीला पाहिलें कीं त्यानें पुष्कळ चांगली प्रगति केली आहे. तो चरख्याला गृहोद्योगासाठीं उपयोगी साधन बनवूं इच्छितो. हुबळींत एक गुजराती गृहस्थ आहेत. त्यांनीं आपल्या घरीं 'अंबर चरखा' विजेवर चालवला आहे. त्यावर एक मनुष्य सूत कांतून आपल्या घरासाठीं पुरेसा कपडा तयार करून घेतो. त्यांनीं मला विचारलें, "काय हिला खादी म्हणता येईल?" मी म्हटलें, "अवश्य. तुम्ही ही जर विकत नसाल तर ही जरूर खादी च आहे." अशाप्रकारें यंत्रांचा आणि विज्ञानाचा उपयोग उपकरणांच्या सुधारणेंत आणि अवजारांना विजेवर चालवण्यांत होऊं शकतो. पण ह्यांत सुद्धां मर्यादा येते. एक तर ह्यांत अंतर्बाह्य शोषण नसावें, आणि दुसरें, योजनापूर्वक सुधारणा व्हाव्यात.

**फतेहनगर,** (राजस्थान)
३-२-'५९

---

हें भूदान आंदोलन सुरू होण्यापूर्वीं सेवाग्रामला जागतिक शांतता परिषद भरली होती. मी त्यावेळीं आजारी असल्यामुळें परिषदेला हजर राहूं शकलों नव्हतों परंतु संदेश पाठविला होता. त्यांत मीं म्हटलें होतें—"मला मोठया हिंसेचें भय नाहीं. मात्र अल्प प्रमाणावरच्या हिंसेचें मला मोठें भय वाटतें. मी वर्ल्ड-वॉरला डिव्हाईन समजतों. अशीं युद्धें माणसें घडवून आणीत नाहींत. अल्प हिंसा जी सर्वत्र पसरली आहे त्याची मला चिंता वाटते." हा विलक्षण संदेश जेव्हां मी पाठवला तेव्हां त्याच्यावर पुष्कळ च चर्चा झाली आणि शेवटीं किशोरलालभाईंना हरिजनमध्यें त्यावर लिहावें लागलें.

अण्वस्त्रें बंद करा अशी मागणी करण्यांत येते, परंतु केवळ त्यानें मानवाच्या प्रश्नाची सोडवणूक होणार नाहीं. उलट मामुली अस्त्रें च जास्त हिंसक आहेत, आणि मोठीं अस्त्रें अहिंसेच्या जास्त जवळ आहेत. कारण मोठीं अस्त्रें आल्यानंतर जगापुढें दोन च मार्ग उरले आहेत. एक तर मानवाचा संहार करावा अथवा अहिंसेला जागा द्यावी. याशिवाय तिसरी गति शोधण्याची जी कांहीं लोकांची धांदल चालते ती माझ्या लक्षांत येत नाहीं. अण्वस्त्रे बंद करावी आणि हिंसेची मधली दशा टिकून रहावी हें मला पूर्वीं पटलें नाहीं, आज ही पटत नाहीं. विज्ञानाशीं अहिंसा जोडली गेली तर च विज्ञान टिकेल, हें आज विज्ञान च सांगून राहिलें आहे. अध्यात्म आणि अहिंसा यांचें शिक्षण विज्ञान सक्तीनें देत आहे. गीतेनें सांगितलें आहे 'ऐकण्याची इच्छा नसेल तर त्याला कोणती हि गोष्ट सांगू नये.' परंतु विज्ञान आतां आपली ऐकण्याची इच्छा असो वा नसो सक्तीनें तें ऐकवणार आहे. विज्ञानाची च जर प्रगति कुंठित झाली, तर मात्र अहिंसेला लवकर जागा मिळणार नाहीं.

## विज्ञानाचा आविष्कार

विज्ञानशक्ति आपला आविष्कार स्वतः होऊन व्यापक स्वरूपांत करून राहिली आहे. आत्मज्ञान आणि अहिंसेच्या मदतीला ती धावून आली आहे,

त्यामुळें मला जोर आला आहे. पृथ्वी पादाक्रांत करण्याची उमेद मला आली आहे. कारण विज्ञान आतां स्वतःचे आविष्कार स्वतःच येऊन मानवापुढें करीत आहे. सूर्य उगवला आणि आपण किती हि डोळे झांकून घेतले म्हणून काय होणार ? सूर्यवत् विज्ञान स्वयमेव प्रकाशमान् झालें आहे. लहानपणीं आम्हांला यंत्रें वगैरेच्या बाबतींत कांहीं च कळत नसे. परंतु हल्लीं आठ-आठ दहा-दहा वर्षांचीं मुलें अगदीं गुंतागुंतीचीं यंत्रें हाताळतात ! याचा अर्थ असा नव्हे कीं आम्हांला जी अक्कल होती, त्यापेक्षां यांना फार अक्कल आली आहे. त्याचा अर्थ एवढा च कीं विज्ञानदेवता आतां फार प्रसन्न झाली आहे आणि आपण होऊन च प्रगट होत आहे. विज्ञानाची प्रगति थांबवता येणार नाहीं. त्याचा विकास निरंतर होत राहील. त्यामुळें च अहिंसेला आशा आहे. नाहींतर बिचारी अहिंसा महापुरुषांच्या हृदयांत व चार आचार्यांच्या मठांत राहत होती. तिला आतां विज्ञानानें अवकाश दिला आहे. मला कांहीं लोक विचारतात, "आज विज्ञानाचा इतका जोर असतांना तुमचें हें ग्रामदान कसें चालणार ?" मी त्यांना म्हणतों "अरे, विज्ञान वाढलें आहे म्हणून च तर ग्रामदान चालणार. नाहींतर त्याला पुसत होता कोण ?" सुरी, लाठी, पिस्तुल यांच्यावरचा आपला विश्वास अजून उडाला नाहीं. हीं छोटीं हत्यारें म्हणजे भुतें च आहेत. मोठ्या देवतेवर विश्वास ठेवण्याऐवजीं, या क्षुद्र देवतांवर–भुताखेतांवर–आपला विश्वास बसला आहे. त्यामुळें तमोगुण वाढला आहे आणि भगवत्-श्रद्धा कमी झाली आहे. भूताखेतांवर विश्वास असण्यापेक्षां नास्तिकता परवडली ! अशा भोळ्या आणि मूढ श्रद्धेपेक्षां नास्तिकता भगवत् उपासनेला जास्त जवळची. क्षुद्र देवतेचा उपासक हा परमेश्वरापासून दूर असतो. नास्तिकाच्या चित्तावर थोडासा जरी संस्कार झाला कीं झाला च तो आस्तिक ! त्यामुळें अगदीं नास्तिक शिरोमणि मला अहिंसेच्या अगदीं जवळचा वाटतो. परंतु हे क्षुद्र हिंसापूजक, लाठी, पिस्तुल, बंदुक यांच्यावर श्रद्धा असणारे अहिंसेचे वैरी आहेत, आणि अहिंसेला धोका देणारे आहेत.

## कल्याणकारी शक्ति

अण्वस्त्रें आणि परमाणुशक्ति ही ईश्वराच्या अगदीं जवळची आहेत. ती नवीन जग निर्माण करूं शकते, ती परम देवता आहे. ती जगाला उत्तम स्थितींत राखूं शकते किंवा जगाचा संहार हि करूं शकते. म्हणून ती ब्रह्मा विष्णु महेश्वराच्या शक्तीसारखी आहे. त्यासाठीं च ती जवळची आहे. परंतु त्यांच्या ऐवजीं आपण छोटीं-छोटीं शस्त्रें घेऊन बसतों. तीं वापरण्याचे आपण बंद केलें, क्षुद्र हिंसा बंद झाली, तर मोठीं शस्त्रें ताबडतोब बंद होतील. आणि तो "अणु" सहज च चैतन्याचा दर्शक ठरेल. **'बाप रुकुमादेवीवरु अणुप्रमाण भासला,'** सगुण आणि निर्गुण, प्रत्यक्ष भगवंत अणुप्रमाणें भासला. अणूची संहारक शक्ति नाहींशी केली व तिचा उपयोग विधायक कार्याकडे लावला, तर ती भगवंताप्रमाणें कल्याणकारी ठरेल, आणि मग अणु-शक्ति मानवाच्या जीवनाला मदत देणारी होईल. अग्नीनें आग हि लावता येते. जर लोकांनीं ठरविलें कीं अग्नीचा दुरुपयोग करायचा तर जेवढ्या वेगानें लोकांनीं घरें बांधावीं, त्यापेक्षां किती तरी वेगानें जाळून टाकता येतील. पण आज तसें होत नाहीं. चुकून आग लागते कारण लोकांनीं ठरवलें आहे कीं, अग्नीचा उपयोग रसोईकडे च करायचा.

## अणुशक्तीवर सूक्त लिहावें लागेल

'अग्नी मीळे पुरोहितम्' येथून च ऋग्वेद सुरू होतो. मानव अग्नीचा उपयोग चांगल्या कार्यासाठीं करूं लागल्याची, हा मंत्र म्हणजे सुरुवात आहे. त्या च ऋग्वेदांतील दोन स्कंदामध्यें जवळ जवळ दोनशे सूक्तें अग्नीवर आहेत. त्याच प्रमाणें अणुशक्तीचा उपयोग आतां चांगल्या कार्याकडे च करावा लागेल. नाहींतर टिकाव लागणार नाहीं. जशी अग्नीवर सुक्तें आहेत, तशीं अणु-शक्तीवर नवीन सूक्तें लिहावीं लागतील. आणि त्याचा आद्य प्रणेता ज्ञानेश्वर च ठरेल, असें मला वाटतें. अणुशक्ति ही देवता आहे की राक्षसी आहे हें मनुष्य तिला कसें वापरणार त्यावर ठरणार आहे. ती उभयशक्तिवर्जित आहे. तिला हिंसा-अहिंसा स्पर्श करूं शकत नाहीं, नीति-अनीति स्पर्श करीत नाहीं, ती तटस्थ आहे. म्हणून

अहिंसेची जोड जर त्या शक्तीला दिली तर या पृथ्वीवर स्वर्ग येईल आणि येशू ख्रिस्ताची प्रार्थना --'हे देवा, तुझे आकाशांत जसें राज्य आहे तसें पृथ्वीवर येवो' प्रत्यक्ष सृष्टींत येईल.

**मुख्य प्रश्न**

हा प्रश्न फार मोठा आहे. त्यामुळें इतर सारे प्रश्न मला गौण वाटतात. जरी इतर प्रश्नांना प्रसंगोपात महत्त्व येत असलें आणि साऱ्या समाजाची तन्मयता त्यांत होत असली तरी ते गौण आहेत आणि हा प्रश्न मूलभूत स्वरूपाचा आहे. म्हणून समाज-शास्त्रज्ञांनीं, राजनैतिकांनीं, धार्मिकांनीं, तत्त्ववेत्त्यांनीं, साहित्यिकांनीं--सर्वांनीं मिळून त्यावर प्रहार केला पाहिजे. राजनैतिक चळवळी करतांना कोणते निर्बंध असावेत, साहित्यांत काय मर्यादा असाव्यात, सरकारच्या पोलिसांनीं लोकांशीं वागतांना कसें वागावें हें सर्वांनीं ठरवलें पाहिजे. सामाजिक, राजनैतिक साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्यें कोणत्या मर्यादा पाळाव्यात हें ठरलें पाहिजे. त्या मध्यें जबरदस्ती असूं नये. कारण जबरदस्ती आली कीं मर्यादा अमर्यादा बनतात. साहित्यिक, शैक्षणिक, धार्मिक, राजनैतिक क्षेत्रांत प्रगति करायची असेल तर कांहीं मर्यादा पाळल्या पाहिजेत.

कुरुंदवाड,
१०-५-१९५८

## मनोमालिन्य कसें घालवता येईल ? : १४ :

हें आंदोलन जसजसें खोल जात आहे तसतसा कार्यकर्त्यांचा दर्जा वाढायला हवा आणि आध्यात्मिक चिंतनांतहि खोलवर प्रवेश व्हायला हवा. मनाची मलिनता धुवून शुद्ध करण्याची ही सारी प्रक्रिया आहे.

### विज्ञान-आत्मज्ञानाच्या दृष्टीनें मन गौण

कुणा दोघांत भांडण झालें तर दोघांना जवळ बोलावून, त्यांच्याशीं त्यांच्या मनोभूमिकेवरून तासन्तास गोष्टी करण्याची बापूंना सवय होती. ह्यांत ते कधीं सफल होत, कधीं नाहीं. ही देखील एक पद्धत आहे, पण ती अचूक नाहीं. ही व्यक्तिगत आहे आणि विज्ञानयुगांत व्यक्तिगत कार्य-पद्धति प्रभावी होऊं शकत नाहीं. ती मानसिक युगांतील पद्धत आहे. पुढचें युग विज्ञानाचें आहे. त्यांत ऑब्जेक्टिव्ह—सत्यप्रधान—राहणार. कुणाच्या मनाला काय वाटलें. याला कांहीं महत्त्व नाहीं. विज्ञान सृष्टीला समोर ठेवून मनाला गौण मानतें. आणि आत्मज्ञान सुद्धां त्याला गौण च मानतें. दोघे हि मनाला गौण समजतात. अध्यात्माचें म्हणणें आहे कीं मनाचें उन्मन बनवायला हवें. विज्ञान पण हें च म्हणतें. अशा स्थितींत कुणांत मनोमालिन्य निर्माण झाल्यास काय करायचें ? तशा स्थितींत उपेक्षेनें च हेतु साध्य होईल असें म्हणावें लागतें. अजून आपल्याला उपेक्षेच्या शक्तीची कल्पना नाहीं. मनाच्या पातळीच्यावर जाऊन विचार करूं तेव्हां च कार्य होईल.

---

### अरविंदांचें अतिमानस-दर्शन

यासाठीं च श्रीअरविंद 'सुप्रामेंटल' ची गोष्ट करीत असत. त्यांच्या मतें वर जाऊन परमेश्वरदर्शनाच्या आणि परमेश्वर-स्पर्शनाच्या अमृतपानानें परितुष्ट होऊन मन उन्मन होतें आणि त्यानंतर तें खालीं उतरतें. ह्याला च अवतरण म्हणतात. मुक्ति लाभली म्हणजे समाप्ति झाली असें ते मानीत नाहींत. श्रीअरविंद म्हणतात, मुक्तीनंतर—मन उन्मन झाल्यानंतर—फिरून कार्यक्रम सुरू होतो. ही भूमिका अतिमानसाची आहे. ह्याला ते 'अवतार' म्हणतात.

मुक्ति लाभल्यानंतर कुणाला खालीं उतरावेसें वाटलें तर तो उतरूं शकतो; आणि उतरण्याची इच्छा नसली तर तो मुक्तींत विलीन होऊन जातो, अशीच आजवर कल्पना होती. परंतु श्रीअरविंदांच्या मतानुसार ती गौण वस्तु आहे. शंकर आदि म्हणतात कीं मुक्ति प्राप्त झाल्यानंतर परतूं नका. पण श्रीअरविंदांच्या दृष्टीनें मुक्ति म्हणजे विश्वाच्या सेवेची एक संधि प्राप्त करणें होय. जोंवर मुक्ति नाहीं, तोंवर विश्वाची सेवा असंभव. मुक्तीशिवाय सेवा करायला जाल तर कदाचित् ती सेवा न होता आणखी च कांहीं होऊन बसेल.

आम्हांला जर अशा रीतीनें समाजपरिवर्तन घडवून आणायचें असेल, हृदय-परिवर्तन करायचें असेल, तर ती शक्ति––आमच्यांत आहे किंवा नाहीं हें आधीं स्वतःला विचारून पहावें लागेल––प्राप्त करण्यासाठीं प्रथम मुक्ति प्राप्त करावी लागेल. परंतु तेवढ्यावर गोष्ट संपत नाहीं. परमेश्वराजवळ जाऊन तो 'सुप्रामेंटल'पर्यंत पोंचेल. नंतर ती स्थिति प्राप्त करून ह्या जगांत अवतार घेऊन साऱ्या विश्वांत स्वतःच्या इच्छित शक्तींनीं विचार पसरवील आणि सर्वांच्या जीवनांत परिवर्तन घडवून आणील. कारण, आम्हांला साऱ्या जगाला दिव्यरूप द्यायचें आहे.

## निदान मानसिक भूमिकेवरून तरी वर उठा

हें जें सांगितलें तें एक विशाल दर्शन आहे. आतां च आपण वर जाऊन पुन्हां अवतरूं असली आकांक्षा ठेवूं नये. जरी एवढें मोठें काम करूं शकलों नाहीं तरीसुद्धां मनाच्या पातळीच्यावर तर आपल्याला गेलें च पाहिजे. न जाऊं तर समाजांतील भांडणें संपणार च नाहींत आणि ह्या संघर्षाला कमी करण्यासाठीं सदैव तेल देत रहावें लागेल. खरें म्हणजे हें यंत्र च असें पाहिजे कीं त्यांत घर्षण नसावें, तेल देण्याची गरज पडूं नये. आपल्या या शरीरांत ढिलेपणा नसला तरी हाडें मात्र एकदुसऱ्याशीं घासत नाहींत, घर्षण होऊं नये अशी योजना च तिथें आहे. अशी ही सारी व्यवस्था आहे, कारण तिथें प्रेमशक्ति काम करीत आहे. पायाला त्रास होताच हात लगेच सेवेला लागतो. शरीरांत जी प्रेमशक्ति आहे, तिच्यामुळें च शरीराच्या अवयवांत घर्षण होत नाहीं आणि त्यांच्याकडून इच्छित

काम घेता येतें. अशाच प्रकारची समाजाची पण यंत्र-रचना होईल तर मग तेलाच्या डबीची गरज राहणार नाहीं.

तुम्हांला अरविंदांचे विचार मीं सांगितले. अशा महान् महान् व्यक्तींचे विचार जाणून घेतले पाहिजेत. जगांतील विचारकांच्या विषयीं आम्हांला कांहीं माहिती नसावी हें योग्य नाहीं. विचारांतील नाविन्य कोणतें, लोकांवर त्याचा परिणाम काय आहे, आम्ही त्यांतून काय घेऊं शकतों, हें आम्हांला कळलें पाहिजे.

## हें युग महाकाव्याचें

म्हैसूरमधें आम्ही तिथले महाकवि पुट्टप्पाजींना* विचारलें कीं, या काळांत तुम्ही एवढें मोठें महाकाव्य लिहूं कसें शकला ? ते म्हणाले, "भारतांत आज महाकाव्याचें युग आहे. या ५०-६० वर्षांत इथे जितके महापुरुष होऊन गेले तितके जगांत दुसरीकडे कुठें झाले नाहींत. म्हणून महाकाव्याचा काळ हा च आहे." याचा अर्थ विज्ञानयुगांत महाकाव्य निर्माण होणार नाहीं असें मानणें चुकीचें आहे. विज्ञानयुगांत सृष्टींतील गूढ अर्थ प्रगट होईल. जुन्या लोकांसमोर सृष्टींतील रहस्य कमी प्रगट होतें. तेव्हां लोकांना वाटे कीं सृष्टींत जेवढें ज्ञान प्रगट आहे, तेवढें विज्ञान आणि जें जें गूढ राहिलें तें काव्य. जुन्या लोकांना सृष्टींत गूढता किती आहे तें माहीत च नव्हतें. त्यामुळें काव्याला वाव कमी होता. गूढता जितकी अधिक प्रगट होईल, काव्याला तितकी च अधिक संधि लाभेल. जुन्या काळीं सृष्टि कमी प्रगट होती आणि सृष्टीचें गूढ पण कमी प्रगट होतें. त्यामुळें विज्ञान देखील कमी होतें आणि काव्य सुद्धां. या काळीं सृष्टीचें प्रकाशन अधिक आहे, तसें गूढतेचें प्रकाशन पण अधिक आहे. सृष्टि आणि तिची गूढता दोन्ही अधिक प्रकट आहेत. म्हणून विज्ञानाची शक्यता अधिक आहे, तशीच काव्याची देखील शक्यता अधिक आहे.

पांडवपुर,
३०-९-'५७

---

* [श्री. पुट्टप्पा कानडी भाषेंतील महाकवि असून त्यांनीं कानडींत आधुनिक दृष्टिकोनांतून रामायणाची रचना केलेली आहे.]

मनुष्य एक प्राणी आहे, परंतु त्यांत आणि अन्य प्राण्यांत आजवर कांहीं ना कांहीं फरक राहिला आहे. शेवटीं तो फरक आहे कोणता ?

## मानव आणि इतर प्राण्यांतील अंतर

दुसरे प्राणी प्राण-प्रधान आहेत, तर मानव मनःप्रधान. तसा मानवांत प्राण आहे आणि मन पण. परंतु मुख्य आहे मन च. प्राणी हालचाल करतो तेव्हां खूप जोरानें पळतो. हल्ला करील तर तो सुद्धां जोरानें. ह्या हल्ल्यांत प्राण प्रधान असेल, मन नाहीं. एक कुत्रा दुसऱ्या कुत्र्यावर प्रेमानें तुटून पडेल आणि तसा च द्वेषानें पण. प्रेमानें तुटून पडेल तर सहजपणें पडतो. त्याची ती प्राण-प्रेरणा आहे. प्राणी नाचतो-बागडतो, हल्ला करतो वा तुटून पडतो—ही सारी प्राण-प्रक्रिया आहे. हें सारें करण्यांत त्याला जखम झाली तरी त्याला त्याची पर्वा नसते.

मुलें सुद्धां असें च करतात. लहानपणीं खेळतां खेळतां दगड फेकतात. ते कांहीं हेतुपूर्वक नाहीं फेकीत. फेकण्याची इच्छा झाली म्हणून फेकला. त्यांचें खेळणें एक प्राणवृत्ति आहे. परंतु तो दगड कुणाला तरी लागतो आणि रक्त वाहूं लागते, तेव्हां हा एक प्रसंग होतो. त्याचा मानसिक परिणाम पण होतो, कारण मुलाला हि मन असतें. ह्यावरून हें स्पष्ट आहे कीं आम्हांला सुद्धां प्राण-प्रेरणा होत असते. परंतु ती प्राण-प्रधान नसून मनःप्रधान असते. लहान लहान जंतूंना निरनिराळ्या क्रिया, हालचाली करतांना आपण पाहतों. त्यांच्यांत सूक्ष्म मन नसतें असें नाहीं. पण तिथें मुख्य वस्तु आहे प्राण आणि मानवांत मुख्य वस्तु आहे मन. भावना, वासना, कामना, प्रेरणा, आशा, निराशा आदींच्या ज्या प्रक्रिया आहेत, त्या साऱ्या मानसिक वृत्ति मनुष्यांत काम करीत असतात. भीति, हिंमत, अभिमान, मानापमान, प्रेम, आसक्ति, द्वेष, तिरस्कार, घृणा हा सारा मानवाच्या मनोवृत्तींचा खेळ आहे.

## विज्ञान मानसशास्त्राला जुमानीत नाहीं

अशा प्रकारची ही प्राण्याची प्राणभूमिका असते तर मानवाची मनो-भूमिका ! परंतु आतां विज्ञान मानवाला म्हणूं लागलें आहे कीं तुझी ही मनोभूमिका आतां कामीं पडणार नाहीं. तुला आतां विज्ञानभूमिकेवर यावें लागेल. याचा अर्थ ज्याला आम्ही मानसशास्त्र म्हणतों, तें सारेंच्या सारें अगदीं बेकाम ठरणार. विज्ञान मानसशास्त्राला मानीत नाहीं. वरून अॅटम-बॉंब पडतो, तो कांहीं हें पाहत बसत नाहीं कीं यांतीत कोण दोशी आहेत आणि कोण निर्दोषी. अॅटमबॉंब पडल्यावर मानव, पशु सर्व च नष्ट होणार. पूर आला म्हणजे नदी महापुरुष, अल्पपुरुष, जनावरें, लाकूड जें जें कांहीं वाटेंत आलें त्याला वाहून नेते. नदी जशी मानस-शास्त्राच्या पलीकडे आहे, तसें च विज्ञान मानसशास्त्राहून भिन्न कोटींत आहे.

## आजच्या मानवाची वैज्ञानिक प्रगति

ज्या अणूपासून हें सारें जग, ही सारी सृष्टि निर्माण झाली आहे, ती सारी शक्ति आज मानवाच्या कह्यांत आलेली आहे. ज्या अणुशक्तीच्या विस्कळित होण्यानें जगाचा लय होऊं शकतो ती शक्ति माणसाच्या हातीं लागली आहे. अणूशीं अणूचा संयोग होण्यानें सृष्टि साकार होते आणि सारे अणु वेगवेगळे झाल्यास सृष्टीचा नाश होतो. असली ही सृष्टयुत्पादक आणि सृष्टिसंहारक अणु-शक्ति आज माणसाच्या हातांत आहे.

एवढें च नव्हे, माणसानें आकाशांत एक नवीन उपग्रह सोडला आहे. तो पृथ्वीच्या आवर्तीभोंवतीं फिरत आहे. ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. याचा अर्थ यापुढें केवळ अंतर्‌राष्ट्रीय चिंतनानें भागणार नाहीं. अंतर्गोलीय चिंतन, अंतर्जागतिक चिंतनाची गरज राहील. हें सारें जर मनुष्य मानसिक भूमिकेवरून करील तर तें चालेल कसें? कल्पना करा, मी कुणावर प्रेम करतों आणि कुणाचा द्वेष. आम्ही तीघे एकाच पुरांत वाहत आहोंत. तीघांना पोहता येत नाहीं. तेव्हां हा पण बुडेल, तो पण आणि मी पण. प्रेम पण बुडले आणि द्वेष पण. म्हणून जेव्हां तुम्ही पुरांत वाहत असता, तेथें न प्रेम उपयोगी पडतें न द्वेष. आज मानवाच्या हातीं

शक्ति लागली आहे, तिला पूर आला आहे. ती आहे सृष्टीची शक्ति. त्या सृष्टीच्या शक्तींत तुमचें मन कामीं पडणार नाहीं.

## ईश्वरी आत्म्यांत मानवाचें मन हानिकारक

आज तुम्हांला ती योग्यता प्राप्त झालेली आहे, जी परमेश्वराची स्वतःची आहे. शेवटीं सृष्टीची उत्पत्ति आणि लय करतो कोण? परमेश्वर च ना ? आज तर सृष्टीची उत्पत्ति आणि लय मनुष्य करूं शकतो. माणूस एक लहानसा परमेश्वर च झाला आहे. आतां हा परमेश्वर मनाच्या पातळीवर काम करणार नाहीं, त्याच्यावर राहील. राग, द्वेष, आसक्ति आदि मनांत च असतात. त्यांत आमचें हें क्षुद्र मन लुडबुड करील तर फार नुकसान होईल. परमेश्वर माणसाच्या मनानें काम करूं लागला तर मोठी भयानक स्थिति होईल. माणसांत जर गाढवाचें मन राहिलें तर काय दशा होईल ?

विज्ञानामुळें माणसांतील रागद्वेषांचे परिणाम अत्यंत तीव्र होऊं शकतात. म्हणून माणूस जेव्हां रागद्वेषरहित होईल तेव्हां च त्याला आज लाभलेली ही विज्ञानशक्ति त्याच्या उपयोगी पडेल. मानसशास्त्रांत केवळ वरवरचा फरक करण्यानें नाहीं, तर जुनें सारें मानसशास्त्र संपुष्टांत आणण्याचा आजच्या मानवापुढें प्रश्न आहे. जुन्या मानसशास्त्रांत वीस अध्याय असतील तर हा एकवीसावा अध्याय त्याला जोडून देण्यानें भागणार नाहीं. जुन्या मानसशास्त्रांच्या सर्व ग्रंथांची होळी करावी लागेल. जुनी राहणी, रागद्वेष, मानापमान, रीतिरिवाज, प्रथा सर्व कांहीं फेकून द्यावें लागेल.

## विज्ञान पूर्वींपासून च मनाच्या वर

विज्ञानाची भूमिका मनाच्या वरची भूमिका आहे. विज्ञान आपल्याला त्या भूमिकेवर नेण्यासाठीं बळजबरी करीत आहे. पूर्वींच्या काळीं सुद्धां हें माहीत होतें कीं विज्ञानाची भूमिका मनाच्या वरची आहे. उपनिषदांत म्हटलें आहे:– 'प्राणो ब्रह्मेति' पुढें म्हटलें आहे: 'मनो ब्रह्मेति' त्यानंतर 'विज्ञानं ब्रह्मेति'. प्राणाची भूमिका प्राण्यांची आहे, मनाची भूमिका मनुष्याची आणि विज्ञानाची भूमिका ऋषींची आहे. ह्यावरून त्याकाळीं

विज्ञानाची भूमिका माहीत तर होती, पण त्याची जबरदस्ती नव्हती. व्यक्तिगत विकास म्हणून कोणी एखादा आपला विकास करीत करीत विज्ञानाच्या भूमिकेवर पोंचत असे. परंतु तो सर्व व्यक्तिगत विकासाचा विचार होता.

आतां एखादा महापुरुष इच्छा म्हणून विज्ञानाची भूमिका प्राप्त करील हें या युगांत चालणार नाहीं. उलट अनिवार्यपणें सर्व लोकांना विज्ञानाच्या भूमिकेवर येण्याचें नाटक करावें लागेल. मी खोटें बोलणारा माणूस आहें. परंतु नाटकांत मला हरिश्चंद्राचें काम मिळालें आहे. आतां तिथें जर मी आपलें खोटें आठवूं लागेन तर हरिश्चंद्राची भूमिका कशी वठेल ? जसें हरिश्चंद्राचा अभिनय करण्यासाठीं आपलें खोटें मला विसरावें लागेल, तसेंच विज्ञान- युगांत आम्हा सर्व लोकांना आपल्या मनोभूमिका विसराव्या लागतील. थोडक्यांत आजच्या युगांत आम्हांला विज्ञानाच्या भूमिकेवर सक्तीनें यावें लागेल.

## साधना व्यक्तिगत नको, सामूहिक

परंतु आम्ही तिथें पोंचूं तें आध्यात्मिक प्रयत्नानें च. विज्ञान आध्यात्मिक चिंतनाची जबरदस्ती करून राहिलें आहे. तें म्हणत आहे, "जुने ऋषि व्यक्तिगत साधना करीत होते. आतां तुम्ही सामूहिक साधना करा. असें कराल तर च तुमच्यासाठीं विज्ञान कल्याणकारी ठरेल. अन्यथा तुमचा नाश होईल." विज्ञानाच्या भूमिकेवर जाणारा ऋषि काय करीत असे ? 'मी' आणि 'माझें' सोडून देत असे. तो वेदान्त सांगे—हें घर माझें नाहीं, हें शेत माझें नाहीं, हें शरीर माझें नाहीं. त्याच्याप्रमाणें च आतां आम्हा सर्वांना म्हणावें लागेल की 'हें घर, ही संपत्ति, हें शेत माझें नाहीं, सर्वांचें आहे.' विज्ञानयुगांत हें अनिवार्यपणें करावें च लागेल. तुमच्यासमोर दोन च पर्याय आहेत—सामूहिक साधना किंवा सर्वनाश ! दोन्हींतून निवडा. एकतर आध्यात्मिक साधना करून पृथ्वीवर स्वर्ग आणा अथवा पृथ्वीबरोबर स्वतः आणि स्वतःबरोबर पृथ्वीला घेऊन नष्ट होऊन जा.

## सर्व कांहीं नवें करा

'सुप्रामेंटल' भूमिकेची भाषा दार्शनिक भाषा आहे. ती अगदीं सामान्य समजून तुम्हांला आणि मला तिचा प्रयोग करावा लागेल. विद्यार्थी आणि शिक्षक दोघांना विज्ञानाच्या प्रयोगशाळेंत हा प्रयोग करावा लागेल. शेतकरी, व्यापारी, सरकार, प्रजा सर्वांना हा प्रयोग करावा लागेल. तेव्हां तुमचीं तीं जुनीं पाठ्यपुस्तकें, गोष्टी, वाङ्मय सारें आज कुचकामीं ठरलें आहे. सर्व वाङ्मय संकुचित पातळीवर आहे. तें आतां उपयोगी पडणार नाहीं. आतां नवीन वाङ्मय निर्माण करावें लागेल. धर्माची पुन्हां सुरुवातीपासून स्थापना करावी लागेल. वरच्या स्तरावर जावें लागेल. जुना धर्म काम देणार नाहीं. 'मूर्तीसमोर गेलों, कापूर लावला, आरती केली कीं झाला भगवान् प्रसन्न !' हें आतां चालणार नाहीं. आतां तर सर्व मानवसमाज परमेश्वराची मूर्ति झाला आहे. त्याची आरती करावी लागेल. मानवदेवतेला भोग मिळतो किंवा नाहीं हें पहावें लागेल.

## नाटक च वास्तविकतेंत परिणत होईल

साऱ्या मानव-समाजाला भगवान् समजून त्याच्या पूजेचें नाटक आज करावें लागेल. सुरुवातीला आम्ही हें नाटक केलें तरी तेवढ्यानें देखील हळूहळू तें पूर्णपणें साधून जाईल. आम्ही ग्रामदानाचें नाटक सुरू केलें आहे. लोक विचारतात, "काहो, ग्रामदानी गावच्या लोकांनीं जमीनीची आसक्ति कां सोडून दिली ? इतके कां ते वैराग्यवान् झालें ? आपल्या मुलाबाळांकडे ज्या प्रेमभावनेनें पाहतात, त्या च प्रेमभावनेनें गांवच्या सगळ्या मुलांच्याकडे ते का पाहत आहेत ? अहो, शेवटीं एका क्षणांत हें झालें कसें ?" आम्ही सांगतों कीं त्यांनीं ग्रामदान केलें याचा अर्थ एक नाटक केलें. अशा नाटकांची या युगांत फार गरज आहे असें विज्ञान सांगत आहे. हळूहळू हें च विज्ञान या नाटकाला सत्यसृष्टींत पण परिणत करील.

धारवाड,
३१-१-'५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६७६३ विः निबंध
क्रमांक १५०६ नों दि २९।८।६५

## मन:क्षोभ नित्य टाळा



हिंदुस्थानसारख्या विविधतेनें आणि अनेकतेनें भरलेल्या देशांत स्नेहाशिवाय चाललेलें एखादें काम किती हि महत्त्वाचें असलें तरी, शेवटीं तें हानिकारक च सिद्ध होईल. म्हणून आपल्या देशासाठीं सर्वांत महत्त्वाची गोष्ट 'अनुराग' आणि 'स्नेह' आहे.

### सांप्रत मतभेदांची किंमत न्यूनतम

मी तर सर्व 'आइडिऑलॉजी' अथवा विचारसरणींना गौण मानतों. मुख्य मानतों स्नेह-भावनेला च. विज्ञानानें जीं साधनें निर्माण केलीं आहेत, त्यांच्यासमोर ही 'आइडिऑलॉजी' अगदीं गौण ठरते. विज्ञानामुळें मानवाच्या हातांत आलेल्या विशिष्ट साधनांनीं विपुल लाभ होऊं शकतो आणि भयंकर नुकसान हि होऊं शकते. दोन्हींची शक्यता विज्ञानांत आहे. तेव्हां विज्ञानाच्या साधनांचा फायदा करून घ्यायचा असेल तर मतभेदामुळें केव्हां हि कटुता न येऊं देता नेहमीं प्रेमभाव च कायम ठेवावा लागेल. अशा रीतीनें विज्ञानयुगांत मतभेदांची किंमत फार च अल्प ठरते.

विज्ञानयुगांत जिथें मतभेद राहतात त्या स्थानाची पण योग्यता कमी होते. शेवटीं हे मतभेद असतात कुठें ? डोके, कान, नाक, शरीर अथवा आत्म्यांत तर नाहींत. मनांत च ते राहतात. विज्ञानाची जशजशी प्रगति होईल तसतसें मनाचें महत्त्व पण निश्चित च कमी होईल. परंतु आत्म्याचें आणि शरीराचें महत्त्व जसेंच्या तसें राहील. भूक लागल्यावर जेवणें पूर्वीपासून चालू आहे आणि पुढें विज्ञानयुगांत पण चालत च राहील. विज्ञानासमोर मन टिकूं च शकत नाहीं. नाना विकार, तऱ्हेतऱ्हेचे संकल्प-विकल्प, आणि रागद्वेष मनांत असतात; त्यामुळें तुकडेतुकडे होऊन जातात, एकीकरण होत नाहीं. विज्ञान एकीकरणाची अपेक्षा करतें. साऱ्या समाजाला एक करण्याचा उपाय करूं तर विज्ञानाचा लाभ घेतां येईल.

### मतभेद बौद्धिक पातळीवर न्या

मनाला अडथळा निर्माण झाल्यावर जें म्हणून साधन समोर दिसतें, मनुष्य त्याचा च उपयोग करूं लागतो. या दिवसांत कित्येक सभांतून

हमरीतुमरीवर येणें, खुर्च्याटेबलांची आदळआपट करणें असल्या घटना पहायला–ऐकायला मिळत असतात. अशा अत्यंत क्षोभेच्या वेळीं आजचीं तीव्रातितीव्र साधनें उपलब्ध झालीं आणि मानवानें त्याचा उपयोग केला तर किती अनर्थ होईल, ह्याची कल्पना हि करता येत नाहीं. याचा विज्ञानाला फायदा तर नाहीं च, उलट बांका प्रसंग ओढवेल. म्हणून आम्हांला मतभेदांना बुद्धीच्या क्षेत्रांत आणावें लागेल. त्यांना मनाच्या कक्षेंत ठेवणें योग्य होणार नाहीं. याचा अर्थ आम्ही बौद्धिक दृष्टीनें एकमेकांना आकलन करावें आणि परस्परांच्या विचारांत परिवर्तन घडवण्याचा यत्न करावा.

बापू उत्तरोत्तर साधनशुद्धीचा महिमा गात असत. त्या साधनशुद्धीला पण विज्ञानामुळें अतिशय वेग मिळालेला आहे. आज 'साधनशुद्धी'चा अर्थ होतो कीं आम्ही ज्या साधनांचा उपयोग करूं, त्यांच्या बाबतींत न आमच्या मनांत क्षोभ असावा न समोरच्याच्या मनांत. समाजांत क्षोभ निर्माण न करता मानसिक वा सामाजिक जें कांहीं परिवर्तन घडेल, तें च घडायला हवें. थोडक्यांत परस्पर विचारविमर्श च व्हायला हवा. सर्व च प्रश्न सुटलेले आहेत असा देखील एक काळ येऊं शकतो असली कल्पना च करता येणार नाहीं. नेहमीं कोणता ना कोणता प्रश्न हा राहणार च. परंतु त्या प्रश्नांच्या उलगडयाचीं साधनें शुद्ध असायला हवींत. ही च विज्ञान-युगाची मागणी आहे. पूर्वीं कुणाला शिवी न देणें अथवा कुणावर हात न उचलणें च साधनशुद्धींत येत असे. परंतु आतां विज्ञानामुळें त्याचें क्षेत्र पण व्यापक झालें आहे. आज साधनशुद्धीचा अर्थ मनांत क्षोभ निर्माण न करणारीं साधनें इथपर्यंत व्यापक झालेला आहे.

## मनाला नाहीं, बुद्धीला आवाहन करा

तेव्हां प्रश्न निर्माण होतो कीं "मनांत क्षोभ नसेल तर आंदोलन कसें चालवता येईल ? 'आंदोलना'चा अर्थ आहे--मनांत क्षोभ. आज जें म्हणून आंदोलन चालतें, त्यांत मनांत क्षोभ निर्माण करतात च. मग तो चांगल्या अर्थानें असो वा वाईट अर्थानें असो, ती गोष्ट वेगळी. तेव्हां क्षोभ निर्माण केल्याशिवाय काम होईल च कसें?" असा प्रश्न विचारणाऱ्याचें

मन जुन्या जमान्यातलें आहे, या जमान्यांतलें नाहीं. हें विज्ञानयुगांतील मन नाहीं. क्षोभाशिवाय देखील काम होऊं शकतें याची जुन्या मनाला कल्पना च नाहीं.

पंडित जवाहरलालजींनीं 'भारताचा शोध' नामक आपल्या ग्रंथांत शंकराचार्यांचें वर्णन केलें आहे. त्यांनीं लिहिलें आहे : "मोठी आश्चर्याची गोष्ट ही कीं शंकराचार्यांनीं एक सामाजिक कार्य केलें आणि साऱ्या भारताच्या हृदयावर अमिट प्रभाव पाडला. आणि तो सुद्धां केवळ बुद्धि-पूर्वक, विचार समजावून च." साधारणपणें सार्वजनिक पुढारी समाजांत परिवर्तन घडवण्यासाठीं बहुधा मनाला च अपील करतात. परंतु शंकराचार्यांनीं मनाला नाहीं, तर बुद्धीला आवाहन केलें आहे. बुद्धीला आवाहन करीत असतांना सुद्धां बहुतेक अन्य दार्शनिक केवळ शाब्दिक चर्चा करतात, तसें त्यांनीं केलें नाहीं. उलट ते गांवोगांव हिंडले. १५-१६ वर्षें सतत फिरत असतांना त्यांनीं लोकांजवळ जाऊन त्यांना विचार सांगणें पण चालू ठेवलें. आजच्या विज्ञानयुगांत शंकराचार्यांची ही पद्धत च टिकेल. जुन्या काळीं शंकर जितके बलवान् होते त्यापेक्षां आतां अधिक बलवान् होतील. कारण, त्यांच्या ग्रंथांत विचाराशिवाय दुसरें कांहीं च नाहीं. ते विचार च समजावीत आणि तो समजला नाहीं तर पुन्हां पुन्हां सांगत. विचार समजावण्याची ही शक्ति च वैज्ञानिक शक्ति आहे.

## थप्पड क्षोभ-सूचक च

परंतु आजकाल समजावल्यानंतर हि जर कुणी आमची गोष्ट मानीत नसला तर त्याला वठणीवर आणण्यासाठीं तंबी देतों, चौदावें रत्न दाखवतों किंवा असें च कांहीं तरी करतों. आतां यांतल्या मारण्या-बडवण्याच्या गोष्टी तर आतां सोडून च दिल्या पाहिजेत. एखाद्या शिक्षकानें मुलांना कांहीं उपदेश केला आणि तो त्यांनीं जुमानला नाहीं तर शिक्षक स्वतः च थोबाडींत मारून घेतो. असें करण्यांत शिक्षकाचा उद्देश हा च असतो कीं आपल्या न ऐकण्यानें गुरुजींना फार दुःख झालें आहे, हें मुलांच्या लक्षांत यावें व मुलांनीं त्यांच्या गोष्टी ऐकाव्यात. परंतु हें थोबाडींत मारून घेणें शांतिपूर्वक झालें कीं क्षोभपूर्वक त्याचा विचार

झाला पाहिजे. ग्रामोफोन एखादें गाणें आपणाला ऐकवतो, परंतु त्यांत त्याला हर्ष वा क्षोभ नसतो. पण गाणाऱ्या गायकाला तर तो असतो च. त्याच प्रमाणें मारणें वा मारून घेणें क्षोभपूर्वक च मानलें जाईल, विचार-प्रेरक नाहीं. अशाप्रकारें कुणाला मारण्यानें वा स्वत:ला मारून घेण्यानें विचाराची प्रेरणा मिळत असती तर इतक्या साऱ्या ग्रंथाची आणि शिक्षण शास्त्राची पण कांहीं गरज पडली नसती.

## इथें उपवास तरी काय रडणार ?

कुणी आपलें म्हणणें मान्य करवण्यासाठीं उपवास देखील करतात. पण हा उपवास कां केला जातो? आमच्या देहानें तर कांहीं अपराध केलेला नाहीं. अजीर्ण झालें म्हणून न जेवणें योग्य आहे. पण कोणता रोग नसतांना उपाशी कां म्हणून रहावें ? त्याचप्रमाणें शरीराकडून कांहीं काम घ्यायचें नसेल, केवळ ध्यान च करायचें असेल, तर जेवण सोडणें लक्षांत तरी येते. परंतु मानवाला बौद्धिक-प्रेरणा देण्यासाठीं उपवास करणें याला अर्थच काय? आमच्यांत प्रेम, करुणा आणि सत्यनिष्ठा असून हि जर त्याचा कुणावर परिणाम होत नसेल तर ह्या अशा उपवासांनीं तरी काय होणार? तुम्ही म्हणाल कीं तो करुणेनें प्रेरित असा उपवास आहे. तेव्हां मी म्हणेन कीं शिक्षकाचें विद्यार्थ्याला मारणें पण करुणा-प्रेरित च तर आहे. परंतु अशानें मुलांना देहपीडा देऊन वश करण्याचें शिक्षण मिळतें. परिणाम हा होतो कीं उद्यां जर एखादा अत्याचारी ह्याला त्रास देऊं लागेल, तर हा त्याच्या पण अधीन होऊं शकतो. ही फार वाईट गोष्ट आहे.

आज अमेरिकेंतून किंवा मॉस्कोंतून घरीं बसल्या हिंदुस्थानवर बॉंब फेकून त्याला नष्ट करणें शक्य आहे. ह्याची च भीति दाखवून कुणी वरून विमानांतून 'आमते विचार स्वीकारा' म्हणून पत्रकांची वृष्टि करील तर त्याच्यासमोर ह्या उपवासांचें महत्त्वच काय आहे? ह्याच्यानें तुम्ही किती परिवर्तन करूं शकाल? आम्ही उपवासांनीं जितका क्षोभ निर्माण करूं शकतों, त्याहून कितीतरी जास्त क्षोभ बॉंब निर्माण करून टाकतो. म्हणून आम्ही जेव्हां विचारानें प्रेरित होऊन कार्य करूं तेव्हां च काम होईल.

विज्ञानयुगांत क्षोभ उत्पन्न करण्याच्या प्रक्रियेला उत्तरोत्तर कमी च संधि मिळायची.

मी ह्या निर्णयावर आलों आहे, कीं आम्ही आपला मतभेदाचा अंश बाजूला सारावा आणि समान अंश असेल, त्यावर च कार्यक्रम आखावा. ह्यांत सुद्धां मतभेद असतील तर त्याबाबत विचार करण्यांत यावा. अशा रीतीनें आम्ही त्याला विचाराच्या क्षेत्रांत आणून सोडावें. बौद्धिक दृष्टीनें परिवर्तन करण्याचा प्रयत्न व्हावा. समान अंश घेऊन कार्यक्रम बनवला आणि अ-समान अंशावर विचार केला ; असें केल्यावर देखील एखाद्या प्रश्नाचा निकाल न लागला तर त्या प्रश्नाला तसेंच सोडून द्यावें.

सिद्धपुर,
२१-१२-'५८

---

## आंदोलनाचीं विविध दर्शनें : १७ :

मला विचारण्यांत आलें आहे कीं 'हें युग विज्ञानाचें आहे तेव्हां ह्या युगांत आम्हांला साऱ्या विश्वाशीं अहिंसेच्या भूमिकेवरून कशा प्रकारें एकरूप होतां येईल?'

### अहिंसेच्या भूमिकेवरून विश्वाशीं संबंध

हा प्रश्न अति महत्त्वाचा आणि व्यावहारिक आहे. ह्याचें उत्तर समजून घेण्यापूर्वी आम्हांला हें मानून चाललें पाहिजे कीं बुद्धि आणि मनाच्या मधें ऐक्य नाहीं. हिंसेच्या मदतीनें त्वरित कार्य करून घेण्याची इच्छा केवळ वासना आहे. म्हणून हिंसेकडे प्रवृत्त होण्याची हांव धरूं नये. मग दुसऱ्या मार्गांनीं अधिक काळ भले हि लागो.

हा मुद्दा लक्षांत आल्यानंतर मी मूळ प्रश्नाकडे वळतों. कांहीं उदाहरणें घेतल्यास तुमचा प्रश्न चांगल्या प्रकारें सुटूं शकेल. गोव्याचा

च प्रश्न घ्या. आज विज्ञानाचें हें युग नसतें तर हा प्रश्न कधींचा च निकालांत निघाला असता आणि त्याचा जगाला पत्ता हि लागला नसता. परंतु आजचा हा लहानसा प्रश्न आंतर्राष्ट्रीय प्रश्न होऊन बसला आहे. आतां तुमच्या गुजरातमधें एके ठिकाणीं तेल सांपडलें आहे. पण तें केवळ गुजरातचें नाहीं, तर साऱ्या भारताचें मानलें जातें. पुढें जाऊन तें च तेल साऱ्या विश्वाचें मानलें जाईल. त्या वेळीं तत्संबंधीचें निर्णय दिल्लींत न होता विश्वाच्या एखाद्या केंद्रस्थानीं होतील. कारण सर्व राष्ट्रांना त्या तेलाचा लाभ मिळायला हवा. अशा रीतीनें पुढें जाऊन प्रत्येक प्रश्न व्यापक होत जाणार. त्याचा निर्णय 'विश्व-केंद्रांत' लागणार. जे प्रश्न व्यापक नसतील, ते स्थानीय असतील. स्थानीय निर्णय विकेंद्रित राहतील. स्थानीय प्रश्नांच्या निकालासाठीं 'रेफरन्स' म्हणून विशिष्ट योग्यतेचे जे रागद्वेषरहित पुरुष असतील त्यांचा च उपयोग होईल.

## उपकरणें वाढतील, पण वासना घटतील

मला विचारलें आहे कीं विज्ञानामुळें भौतिक सुखसोयींची विपुलता होत आहे, ती ठीक आहे का? विज्ञानयुगांत उपकरणें उत्तम आणि विपुल राहतील. डोळ्यासाठीं उत्तम चष्मे हवेत, ते तेव्हां सहज मिळतील. परंतु ज्यांना चष्म्यांची गरज च नाहीं असे पण लोक तेव्हां असतील. त्याच प्रमाणें प्रत्येक रोगासाठी उत्तम औषध मिळू शकेल. एका च डॉक्टराकडून औषध घेण्याचें पारतंत्र्य त्यांना असणार नाहीं. परंतु अशीं देखील माणसें तेव्हां असतील कीं ज्यांना औषधांची काहीं गरज च पडणार नाहीं. खेड्या-पाड्यांतून मोटारी सहज मिळतील, पण जवळ कुठें व्याख्यानाला जायचें असले तर लोक पायीं च जातील. त्यांच्यांत तेवढी क्षमता असेल. एवढें च नव्हे, पुढें जाऊन माझ्यासारख्यांचें व्याख्यान ऐकण्यासाठीं आणि पाहण्या-साठीं विमानांत बसून कुठें दूरवर जाण्याची गरज च राहणार नाहीं. घरबसल्या च माझें व्याख्यान ऐकू शकतील आणि मला पाहू शकतील. अशा तऱ्हेचीं साधनें निर्माण होतील. अशा प्रकारें विज्ञानयुगांत भोगवासना कमी कमी होत जाईल आणि भोगांचीं साधनें मात्र मुबलक होत जातील.

## खरोखर च भोगवासना कमी होईल का ?

ह्यावर कुणी विचारील कीं विज्ञानयुगांत भोगवासना कमी च होईल, हें कसें शक्य आहे ? तसें ह्यांत कांहीं विशेष नाहीं. विज्ञानयुगांत लोकांच्या हें चांगल्या प्रकारें लक्षांत येईल कीं भोगांनीं इंद्रियें क्षीण होतात. त्यामुळें च भोगांना मर्यादा पडेल. लोक अतिभोगापासून परावृत्त होतील. त्यावेळीं कुठें हि रात्र-रात्रभर जागून लोक सिनेमा पाहणार नाहींत. निःस्वप्न निद्रेचें महत्त्व त्यांच्या लक्षांत येईल. आज इंग्लंड, अमेरिका आदि देशांत आठवड्याच्या सुट्टींत शेतावर जाऊन मोकळी हवा आणि मुक्त आकाशाचा आनंद लुटणारे कांहीं लोक आहेत. ह्या मुक्तानंदापासून पुढें कुणी वंचित राहणार नाहीं. विज्ञान युगांत बिडी पिऊन लोक उगीच च आपलीं फुप्फुसें बिघडवणार नाहींत. विज्ञान ज्या प्रमाणांत पूर्णतेकडे जाईल, त्याप्रमाणांत मानवाचा पण पूर्ण विकास होईल. कामक्रोधादींमुळें शारीरिक शक्तीचा किती दुरुपयोग होत असतो हें उद्यां जर कां व्यक्तिगत मालकी नष्ट झाली तर तत्काळ लक्षांत येईल. योग्य जाणीव असेल, पूर्ण ज्ञान असेल, विज्ञान असेल तर तत्काळ तुम्हांला माझ्या म्हणण्याचें आकलन होईल. अजून पूर्ण विज्ञानयुग आलेलें नाहीं. परंतु आज मी सांगत आहे ती उद्याची गोष्ट आहे.

## क्षोभ असतांना प्रश्न सुटतील कसे ?

असें देखील विचारतात कीं "तुमच्या मताप्रमाणें मनाच्यावर उठून, विचाराच्या पातळीवर स्थिर व्हायला हवें. परंतु आक्रमण, दुष्काळ, अतिवृष्टि आदि प्रसंगीं बुद्धीच्या पातळीवरून निर्णय कसे घेता येतील ?" याबाबतींत आमचें हें निश्चित मत आहे कीं जोंवर चित्तांत क्षोभ असेल, तोंवर प्रश्न सुटूं च शकत नाहींत. आज तर लढायांतून सुद्धां क्षोभाला वाव राहिलेला नाहीं. पूर्वीं युद्धांत मनःक्षोभाला वाव होता. हातांत तलवार घेऊन दुसऱ्याला मारण्यासाठीं बाहेर पडल्यावर क्षोभ निर्माण होऊं शकत असे. परंतु आजच्या लढाया गणिताप्रमाणें चालतात. दहा पाउलें पुढें सरा सांगितलें तर पुढें सरकावें लागेल आणि दहा पाउलें मागें हटा, हूकूम झाला तर मागें हटावें लागेल. याचा अर्थ आज युद्धांत घाबरून चालणार नाहीं.

काटेकोर वैज्ञानिक आणि गणिती दृष्टीनें लढावें लागेल. त्यांत मनःक्षोभाला वाव नाहीं. उलट मनःक्षोभामुळें काहीं काळ व्यर्थ च जातो. म्हणून त्यानें काम लौकर होतें असें मानणें चुकीचें आहे.

सिद्धपुर,
२९-१२-'५८

---

## विश्वाची अद्भुततम जादू : विश्वास : १८ :

ह्यापुढें कोणत्या हि प्रकारें संकुचित बनणें वा संकुचितता टिकवून ठेवणें आपल्यासाठीं हितकर होणार नाहीं. आज विज्ञानाची शक्ति मदतीला आली आहे आणि आत्मज्ञानाची शक्ति तर आपल्या देशांत पहिल्यापासून च होती. आत्मज्ञान आम्हांला व्यापकता तर शिकवीत च होते. आतां विज्ञान व्यापकतेची भौतिक आवश्यकता सांगत आहे.

### विश्वास-शक्तीचें महत्त्व

तिसरी सुद्धां एक शक्ति आहे आणि मला या तिन्ही शक्तींचें दर्शन आहे. त्या तिसऱ्या शक्तीला मी 'विश्वास-शक्ति' म्हणतों. विज्ञानयुगांत राजकारणांत, सामाजिक योजनांत आणि समाज-शास्त्रांत त्याची फार गरज आहे. आमच्यांत जितकी विश्वास-शक्ति असेल, तितके च आम्ही ह्या युगाला अनुरूप बनूं. परंतु आजकाल फार च अविश्वास आहे. राजकीय व सांप्रदायिक क्षेत्रांत तर तो विशेष च दिसतो. हा जुन्या काळापासून चालत आला असला तरी आतां टिकणार नाहीं. आम्ही टिकवण्याचें ठरविलें तरी तो टिकणार नाहीं. राजकारणांत अविश्वास एक शक्ति मानली जाते. त्याला 'सावधानतेचें' लक्षण मानलें जातें. परंतु ज्या क्षणीं मनांत यत्किंचित् हि अविश्वास निर्माण होतो, तो क्षण आमच्यासाठीं असावधानतेचा आहे असें मी मानतों. पूर्ण विश्वासाशिवाय राजनीति सुधारणार नाहीं. राष्ट्राराष्ट्रांत भांडणें वाढतील, जातीय दंगे होतील, विज्ञानयुगांत त्याचा परिणाम फार भयंकर होईल.

यासाठीं वेदान्त आणि विज्ञान यांच्या जोडीला मी विश्वास पण घातला आहे. हल्लीं मी याच तीन तत्त्वांची उपासना करीत असतों. मी संस्कृतांत एक श्लोक बनविला आहे. तो अलीकडे माझ्या जपाचा मंत्र झाला आहे. तो श्लोक असा--

वेदांतो विज्ञानं विश्वासश्चेति शक्तयस्तिस्त्रः ।
येषां स्थैर्ये नित्यं शांतिसमृद्धी भविष्यतो जगती ।।

म्हणजे वेदांत, विज्ञान आणि विश्वास या तीन शक्ति आहेत. या तिन्हींच्या स्थैर्यानें शांति आणि समृद्धि होईल. आज जगाला शांति आणि समृद्धीची गरज आहे. ती वेदान्त, विज्ञान आणि विश्वासानें च लाभूं शकेल.

## वेदान्त आणि विज्ञान यांचा अर्थ

'वेदान्त' म्हणजे वेदाचा अंत, वेदाची समाप्ति. वेद म्हणजे सर्व प्रकारचे काल्पनिक धर्म. जगांत जितके धर्म आहेत, त्या सर्वांचा अंत च वेदांत आहे. म्हणून त्यांत इस्लामान्त, जैनान्त, बौद्धान्त, सिखान्त ख्रिस्तान्त या सर्वांचा अंत येऊन च जातो. सत्याचा शोध, सत्याची ओळख आणि सत्याला मानणें च वेदान्त आहे. 'विज्ञान' म्हणजे सृष्टि-तत्त्वाचा शोध. जर आमचें शारीरिक-जीवन विज्ञानाला अनुकूल बनेल तर संपूर्ण स्वास्थ्याची प्राप्ति होईल. भावी काळाचें जें चित्र माझ्या मनांत आहे, त्यांत रोग च असणार नाहींत. उपाय माहीत असला तरी त्याचा उपयोग करण्याची संधि च येणार नाहीं. डोळयांसाठीं उत्तमांत उत्तम चष्मे उपलब्ध राहतील, पण डोळयांना त्याची कोणत्या च प्रकारें गरज पडणार नाहीं. प्रत्येक गांवांत एक डॉक्टर असावा, असा एक आदर्श हल्लीं आहे. पण भावीं जगांत डॉक्टराचें नांव च राहणार नाहीं, सर्व च तंदुरुस्त राहतील. रोगांच्या कारणांचें निर्मूलन होत नसल्यानें आज उपचार करण्याची पाळी येते. जोंपर्यंत रोग-निर्मूलन होणार नाहीं, तोंपर्यंत सृष्टि-विज्ञानतत्त्वाचें चिंतन करून तदनुसार आम्हांला आपलें जीवन घडवता येणार नाहीं. ह्यासाठीं विज्ञान आणि परस्पर विश्वास आवश्यक आहे.

सर्वोदयनगर (अजमेर)
२८-२-'५९

---

## विश्वासानें च व्यक्ति आणि समाज टिकेल : १९ :

अंतःकरणाची गोष्ट अंतःकरणाला कळते. माझ्या मनांत काय आहे, या गोष्टीचा स्पर्श तुमच्या हृदयाला होतो. म्हणून च लोक माझ्याकडे येतात आणि मला म्हणतात कीं मीं भांडणें मिटवण्याचें काम करावें. माझ्या जवळ अशी कांहीं जादू का आहे, कीं तिनें मीं भांडणें मिटवावींत? हो एक जादू आहे खरी, आणि ती म्हणजे माझा माणुसकीवर विश्वास आहे. मीं जाहीर करून टाकलें आहे कीं माणसाला सहाय्यक म्हणून ज्या कांहीं शक्ति आहेत, त्यांत सर्वांत मोठी शक्ति आहे--विश्वास. सर्वत्र शांति नांदावी, सुख रहावें, समृद्धि व्हावी, कुठें कुणाला कष्ट होऊं नयेत, कधीं कोणी अडचणींत सांपडूं नये अशी जर तुमची इच्छा असेल तर वेदान्त, विज्ञान आणि विश्वास ह्या तीन्हींचा स्वीकार करण्याची गरज आहे.

### दुसऱ्यावर विश्वास : महान् शस्त्र

आज भावाभावांत अविश्वास आहे, मित्रामित्रांत अविश्वास आहे. भिन्न भिन्न पक्षांत, दलांत आणि गटांत अविश्वास आहे. परंतु अविश्वास आजच्या ह्या युगाची वस्तु नाहीं राहिली, हें आम्हांला सांगायचें आहे. आज मानवाच्या हातांत अशीं भयानक शस्त्रास्त्रें आलीं आहेत कीं जर कां एकदुसऱ्यावर अविश्वास करीत राहूं, तर मानव-समुदाय नष्ट होईल. हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांच्यांत कसा अविश्वास चालत असतो! अविश्वासानें कार्यसिद्धि होत नाहीं, उलट विघ्न येतें. आमची भिस्त केवळ दंडुक्यावर च असती तर अविश्वासाचा परिणाम म्हणून कांहीं डोकीं फुटण्यावर भागलें असतें. परंतु आज आमच्या हातांत हैड्रोजन बॉंब आहे, त्यामुळें आतां अविश्वासानें सर्वनाश झाल्याशिवाय राहणार नाहीं.

या करता आम्ही जसा आपल्या मित्रावर विश्वास ठेवतों तसा च प्रतिपक्षावर पण विश्वास ठेवायला शिकावें. विश्वास ठेवल्यानें आम्ही कांहीं गमावणार नाहीं. जो विश्वासघात करील तो च गमावील. बाबा सर्वांच्यावर विश्वास ठेवतो, ही च त्याच्याजवळ जादू आहे. आज सभा सुरू होण्याच्या

वेळीं थोडा गोंधळ चालला होता, तेव्हां मी सांगितलें कीं आतां मी हळूं-हळूं बोलेन. परंतु मीं जशी बोलायला सुरुवात केली, तशी गडबड थांबली! हळूं बोलून भागलें नसते तर मी मौन ठेवलें असतें. हिंसेंत शस्त्र जसें तीव्रतेंतून तीव्रतम होत जातें, तसें च अहिंसेंत सौम्यतेंतून सौम्यतम होत असतें. सर्वोदयाच्या पद्धतींत दुसऱ्यावर विश्वास ठेवणें च फार मोठें शस्त्र आहे.

## विश्वासावर विश्वास ठेवा

विश्वास ह्या जगांतील सर्वांत अद्‌भुत जादू आहे. विश्वासावर च हें सारें जग चाललें आहे. विश्वास-शक्ति जर कां नाहींशी होईल, तर मानवजात परस्पराशीं भांडून-तंटून नष्ट होऊन जाईल. चोराला पण आपल्या सहकारी चोरावर विश्वास ठेवावा लागतो. आम्ही ह्या विश्वासावर विश्वास ठेवून जर त्याची शक्ति ओळखूं आणि तदनुसार वागूं तर जगांतील भांडणें मिटायला वेळ नाहीं लागणार. आजच्या जगांतील भांडणांचें सर्वांत मोठें कारण हा अविश्वास आहे. आम्हांला हा च अविश्वास घालवायचा आहे.

माझ्याकडे निरनिराळया विचारांचे लोक येतात. ते जें कांहीं सांगतात, त्यावर मी विश्वास ठेवतों. हे सारे मला का फसवणार आहेत? नाहीं, ते मला फसवूं शकत नाहींत. जो समोरच्या व्यक्तीवर विश्वास ठेवतो, तो त्याच्या अंतःकरणांत प्रवेश मिळवितो. आणि मग समोरच्याला जें खरेंखरें आहे तें सांगणें भाग पडतें. मी जेव्हां दुसऱ्यावर विश्वास ठेवतों तेव्हां त्याला पण माझ्यावर विश्वास ठेवल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

विश्वास ह्या युगाची शक्ति आहे. लोक माझ्या शब्दावर विश्वास ठेवतात. मी खोटें बोलत नाहीं ह्याचा त्यांच्याजवळ तसा पुरावा काय ? परंतु मी खोटें बोलत नाहीं असा लोकांना माझ्यासंबंधीं विश्वास आहे आणि मला पण त्यांच्यासंबंधीं तसा विश्वास आहे. विश्वास च माझी जादू आहे. त्याची शक्ति महान् आहे.

बलाचौरा (पंजाब)
७-५-'५९

## वैज्ञानिक भौतिकवाद आणि धार्मिक श्रद्धा : २० :

इथें मला विचारण्यांत आलें कीं 'आज वैज्ञानिक भौतिकवाद आणि यंत्रवादा यांच्या अंदाधुंद प्रचारामुळें मानवाची धार्मिक श्रद्धा नाहींशी होऊन राहिली आहे. जीवनासबधींच्या कल्पना डगमगायला लागल्या आहेत. त्यांना पुन्हां स्थिर करण्याचा उपाय काय ?'

विचारलेल्या प्रश्नांत वैज्ञानिक भौतिकवादासंबंधों जें मत व्यक्त केलें गेलें आहे, तें पुर्णपणें बरोबर नाहीं. 'वैज्ञानिक भौतिकवाद धर्मासंबंधीं श्रद्धाळू नाहीं' असा निर्णय देणें योग्य होणार नाहीं. आम्हांला वैज्ञानिक भौतिकवादाचा अर्थ च पूर्णपणें समजलेला नाहीं. भौतिकवाद एक ज्ञान आहे, आणि वैज्ञानिक भौतिकवाद त्याहून कांहीं निराळी वस्तु आहे. भौतिक जीवनाचें स्वरूप हें आहे कीं माणसानें खाणें-पिणें, भौतिक उन्नति करणें इत्यादींबाबतींत च विचार करीत रहावें, केवळ आपली च चिंता करीत असावें. समाजाला खाणेंपिणें मिळावें, समाजाची भौतिक समृद्धि व्हावी ह्याबद्दल तो विचार करीत नाहीं. परंतु वैज्ञानिक भौतिकवाद म्हणतो कीं आमचें मन आणि जग, हीं जीं दोन अंगें परस्परांशीं संबंध ठेवणारीं आहेत, ह्यांच्यांत मुख्य कोण आणि गौण कोण हें समजून घ्यावें.

### सृष्टि आणि मनाचा आधार

विज्ञान म्हणेल कीं मन गौण आहे आणि विश्व प्रधान आहे. मन जगाचें प्रतिबिंब आहे, त्याच्यावर जगाचा परिणाम होतो. मनामुळें जग नाहीं, जगामुळें मन बनलेलें आहे. मन मुळांत भौतिक आहे, म्हणजे समोर जी भूतसृष्टि उभी आहे, तिचा परिणाम आहे.

सारी सृष्टि माझ्या मनाची कल्पना आहे असा पण एक विचार आहे. मी मरतों तेव्हां सारी सृष्टि समाप्त होऊन जाते. मी डोळे बंद करून आंधळा होतों तेव्हां ही विविध रूपांनीं नटलेली सृष्टि पण नाहींशी होऊन जाते. मी जर बहिरा होईन तर माझ्यासाठीं ही सारी नाद-सृष्टि राहिली नाहीं. म्हणून जग मानसिक सृष्टीची प्रतिमा असें मानणारा

एक पक्ष आहे. दुसरा पक्ष म्हणतो कीं आमचें मन सृष्टीचें बनलेलें आहे. आम्ही जर सृष्टींत परिवर्तन घडवूं शकतों तर मनांत सुद्धां परिवर्तन घडवूं शकूं. मानसिक परिवर्तन मुळांत कांहीं स्वतंत्र वस्तु नाहीं. त्यावर जगाचा परिणाम होत असतो.

जगाचें स्वरूप काय आहे, ह्याचा निर्णय आजपर्यंत लागलेला नाहीं. वैज्ञानिक भौतिकवाद जडवाद आहे असें जें मानलें जातें, तें बरोबर नाहीं. विज्ञानाचा पण अजूनपर्यंत निर्णय झालेला नाहीं कीं सारी सृष्टि जडमय आहे कीं चैतन्यमय. लेनिन म्हणाला होता कीं जडवाद आणि ब्रह्मवाद यांतील खरें कोणतें याचा निर्णय आम्ही विज्ञानावर सोडूं इच्छितों. परंतु विज्ञान अजून निर्णय करूं शकलेलें नाहीं. हें सिद्ध झालें कीं सृष्टि जडमय आहे अथवा चैतन्यमय, तरीसुद्धां त्याच्या प्रभावांत आमचें मन आहे असें वैज्ञानिकवाद म्हणतो. लेनिन लिहीत होता तेव्हां विज्ञान जडवादाकडे कललेलें होतें. परंतु आतां तें ब्रह्मवादाकडे अधिक झुकलें आहे. मुलांना तरुणांना अल्पसें ज्ञान असतें, पण त्याला ते परिपक्व मानून आपलीं मतें बनवितात आणि सांगत सुटतात कीं तुमच्याशीं आमचा मूलभूत आणि प्रामाणिक मतभेद आहे. अशी च स्थिति शंभर वर्षांपूर्वी विज्ञानाची पण होती. विज्ञान अनादिकाळापासून चालत आलें आहे. परंतु शंभर वर्षांपूर्वी जेव्हां त्याची प्रगति होऊं लागली, तेव्हां थोडचाशा ज्ञानानें सृष्टि जड आहे, असें मानण्याकडे विज्ञानाचा पूर्ण कल होता. परंतु जेव्हां ज्ञानाचा विस्तार होऊं लागला, तेव्हां शंका येऊं लागली कीं कदाचित् सृष्टि चेतनदेखील असले. अशा रीतीनें 'कदाचित्वाली' गोष्ट आली. पुढेंपुढें वैज्ञानिक म्हणूं लागले कीं 'कदाचित् हा जडवाद च ब्रह्मवाद निघायचा !' अजून हि कदाचित्वाली गोष्ट आहे च. पक्का निर्णय लागलेला नाहीं. सुरुवातीला तर पक्का जडवाद होता. परंतु नंतर कांहीं संशयवाद आला. आजसुद्धां संशयवाद च आहे, पण त्याचा कल ब्रह्मवादाकडे आहे. विज्ञानाची ही खुबी आहे कीं तें नम्र असतें. जिथें नम्रता नसेल, तिथें मन मोकळें राहूं शकत नाहीं आणि जिथें मन मोकळें राहूं शकत नाहीं तिथें अवैज्ञानिक द्रष्टिकोण येतो. ही गोष्ट आपल्याला चांगल्याप्रकारें समजून घ्यायला हवी.

## सृष्टीचें स्वरूप आणि विज्ञान

सृष्टीचें स्वरूप कोणतें, हा प्रश्न विज्ञानावर सोंपवला गेला आहे. जर सृष्टीचें स्वरूप ब्रह्ममय निघालें, तर एका क्षणांत वैज्ञानिक भौतिकवादाचें शांकर-अद्वैताच्या रूपांत परिवर्तन होऊन जाईल. अद्वैत मानतें कीं मन सृष्टीचें प्रतिबिंब आहे. आपल्याकडे द्वैतवादी अथवा अद्वैतवादी कुणी हि असें मानलेलें नाहीं कीं मनानें जग बनवलें आहे. जग तर पूर्वीपासून च होतें, मन नंतर आलें. म्हणून मनानें जग बनविलें असें जर आम्ही आस्तिक लोक मानीत आलों असतों तर ईश्वराला सृष्टि निर्मिण्याचा त्रास दिला कशाला असता! आहे च आपलें मन, करील तें सृष्टि निर्माण ! परंतु आपण मानतों कीं ईश्वर सृष्टि-कर्ता आहे. तेव्हां हा एक च प्रश्न उरतो कीं ईश्वर मानायचा कीं नाहीं ?

ह्यावरून हें सिद्ध होतें कीं जर सृष्टींत ब्रह्मतत्त्व भरलेलें असेल, तर तें ब्रह्मतत्त्व माझ्या मनांत पण भरलेलें आहे. हें सिद्ध झाल्यावर परिणामस्वरूप जो सिद्धांत समोर येईल तो अद्वैतवाद च राहील. वैज्ञानिक भौतिकवाद अद्वैतवादाच्या फार च जवळ येऊन पोंचला आहे. केरळच्या एका कम्युनिस्ट मंत्र्यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें होतें कीं "मी जरी ईश्वराला मानीत नसलों तरी ज्या प्रकारचा ईश्वर शंकराचार्य मानीत होते, तसल्या प्रकारचा ईश्वर मानण्यांत मला कांहीं अडचण नाहीं."

शंकराचार्यांनीं अद्वैताचा जो विचार आमच्यासमोर ठेवला, तो एक वैज्ञानिक विचार आहे. सृष्टि आणि मन या मधें कुणाचा कुणावर हि परिणाम होत राहो, परंतु जशी सृष्टि आहे, तसें च मन आहे. दोन्हींचें रूप समान आहे, ही गोष्ट गृहीत आहे. ओळखायच्या दोन प्रक्रिया असतात. पिंडाचें परीक्षण करणें आणि सृष्टीचें परीक्षण करणें. वैज्ञानिक लोक सृष्टीचें परीक्षण करीत असतात. आतां जर ते सृष्टीला ब्रह्मरूप ठरवतील, तर त्यांना मनाला पण ब्रह्मरूप समजावें च लागेल. दुसरी प्रक्रिया ही कीं मन सृष्टीचें प्रतिबिंब आहे. तेव्हां प्रथम प्रतिबिंब पाहून, त्याचें विश्लेषण करून सृष्टीचें परीक्षण करावें. अंतर्मनांत अनुभव घेतल्यानंतर

शंकराचार्यां सारख्या अद्वैतवा द्यांनीं हा निर्णय दिला कीं सृष्टि ब्रह्मरूप आहे. ह्या उलट विज्ञान अणूकडून ब्रह्मांडाकडे जाण्याऐवजीं ब्रह्मांडाकडून अणूकडे वळत आहे. यामुळें च ब्रह्मवादाकडे पोंचण्यास विज्ञानाला उशीर होऊन राहिला आहे.

आज वैज्ञानिक भौतिकवाद अद्वैतवाद आणि अध्यात्मवाद यांच्या फार च जवळ आला आहे. वर्तुळाच्या दोन टोकांतील अंतर एका बाजूनें पाहिल्यास जास्तींत जास्त असतें आणि दुसऱ्या बाजूनें तें कमींत कमी असतें. त्याच प्रमाणें वैज्ञानिक भौतिकवादाचा ज्या तऱ्हेनें विकास होऊन राहिला आहे, तो पाहतां लक्षांत येतें कीं तो ब्रह्मवादाच्या फार च निकट येत आहे. मला ते दोन्ही इतके जवळजवळ दिसतात कीं जणूं शुक्ल चतुर्दशी आणि पौर्णिमेचा चंद्र.

## वैज्ञानिक भौतिकवाद आणि श्रद्धा

श्रद्धेचा अर्थ काय? वैज्ञानिक भौतिकवाद धार्मिक श्रद्धा दृढ करतो कीं तोडतो? कांहीं जण म्हणत असतात कीं अमुक माणूस श्रद्धावान् आहे आणि अमका बुद्धिवान्. म्हणजे एक श्रद्धावादी झाला आणि दुसरा बुद्धिवादी. अशा तऱ्हेची भेद-रेखा ओढणें फार च चुकीचें आहे. खरें म्हणजे श्रद्धा आणि बुद्धि अगदीं पूर्णपणें एके ठिकाणीं राहूं शकतात. बुद्धि आणि श्रद्धा यांच्यामधें कांहीं विरोध नाहीं. एखादा बुद्धिहीन माणूस श्रद्धावान् असूं शकतो आणि अत्यंत बुद्धिमान् व्यक्ति सुद्धा श्रद्धाहीन. बुद्धि आणि श्रद्धेच्या विरोधाची कल्पना अगदीं चुकीची आहे. कारण, दोघांचे विषय भिन्न-भिन्न आहेत. जसे, कान आणि डोळयाचे विषय. सुरेल संगीत ऐकूं येत असेल, तर कान त्या बाबतींत आपला निर्णय लगेच देईल. परंतु डोळा चूप राहील. कारण संगीतासंबंधानें अनुकूल वा प्रतिकूल मत प्रकट करणें डोळयाचा विषय नाहीं. पण कान आणि डोळा यांच्यामधें विरोध आहे, असें कांहीं मानलें जाणार नाहीं. ह्याच प्रमाणें श्रद्धा आणि बुद्धीचें क्षेत्र देखील वेगवेगळें आहे.

## बुद्धि आणि श्रद्धा

श्रद्धेंतून कर्मशक्ति निर्माण होत असते आणि बुद्धींतून ज्ञानशक्ति. मोटारींत दोन यंत्रें असतात. एक दिशासूचक आणि दुसरें गतिवर्धक. ह्या दोन्हींत कांहीं विरोध नाहीं. उलट दोन्हीमुळें च मोटार भरधांव धावते. दिशासूचक यंत्राच्या अभावीं मोटार कुठें हि आदळूं शकते. आणि गतिवर्धक यंत्र नसेल तर मोटार चालणार च नाहीं. त्याच प्रमाणें श्रद्धेशिवाय कर्मशक्ति निर्माण होऊं शकत नाहीं. पण बुद्धीशिवाय कोणत्या गोष्टीवर अंमल करायचा आहे, हें माहीत च होत नाहीं. बुद्धि दिशा दाखवते आणि श्रद्धेनें त्यावर अंमल होतो. अंमल करण्याची अधिकारिणी श्रद्धा आहे आणि जिथें विचार साकार होतात, तिथली प्रमुख आहे बुद्धि. दोन्हींच्या मदतीनें जीवनाची पूर्णता होते.

कित्येकांची ही एक चुकीची समजूत होऊन बसली आहे कीं ज्या गोष्टींत बुद्धि चालू शकते, तिथें बुद्धि न चालवणें, याचें च नांव श्रद्धा. समोर धूर दिसत असेल तर तिथें श्रद्धा काय करणार? तिथें तर बुद्धीचा सबंध आहे. अग्नीशिवाय धूर होऊं शकत नाहीं, तेव्हां तिथें अग्नी अवश्य असणार, असा निर्णय बुद्धि देणार. तिथें श्रद्धेची काय गरज? बुद्धि इतकी स्वाभाविक आहे कीं रस्त्यावरून मोटार आली, तर ज्याला मोटारी पाहण्याची संवय आहे असें, गाढवपणा कमी असलेलें, गाढव पण रस्ता सोडून चार पावलें बाजूला सरतें. ज्या गाढवांनीं कधीं मोटार पाहिली च नाहीं तीं मोटार दिसता च धावूं लागतात. परंतु ज्या गाढवाला मोटारीचें पूर्वदर्शन आहे, त्याला माहीत असतें कीं मोटार सरळ रस्त्यावरून च पळत असते. त्यानें हा निर्णय श्रद्धेनें नाहीं, बुद्धीनें केला आहे. आम्ही हात उचलला तरी कुत्रीं पळत नाहींत, कारण त्यांना हें माहीत असतें कीं यांचा हात आमच्यापर्यंत कांहीं पोचूं शकत नाहीं. पण जर का आपण दगड उचलला कीं तीं पळून जातात. कारण त्यांना माहीत आहे कीं यांच्या हातांतील दगड आपल्यापर्यंत येऊं शकतो. ही सारी बौद्धिक प्रक्रिया कुत्र्याला पण महीत असते. परमेश्वरानें सर्वांना थोडीथोडी बुद्धि वांटून दिलेली आहे. सारी बुद्धि आपल्याजवळ सांठवून ठेवलेली नाहीं. म्हणून

प्रत्येकाजवळ बुद्धि आहे. तद्वत च प्रत्येकाजवळ श्रद्धा पण आहे. मूल जन्माला आल्यानंतर त्याचा मातेच्या स्तनाशीं संबंध येतो. त्यावेळीं ही खाण्याची वस्तु आहे कीं नाहीं याचा तें कांहीं विचार करीत नाहीं. ते तत्काळ दूध प्यायला सुरुवात करतें. ही क्रिया श्रद्धेशिवाय होऊं शकत नाहीं. मुलाजवळ अल्प च कां होईना विकसित बुद्धि असते. सुरुवातीला मूल आईवर पूर्ण भरवंसा किंवा श्रद्धा न ठेवील तर तें जगेल कसें? मातेवर त्याचा पूर्ण भरवंसा असतो, म्हणून च जेव्हां आई आकाशाकडे बोट दाखवून-म्हणते, 'अरे, तो पहा चंद्र!' लगेच मूल त्याला चंद्र मानून घेतें. तात्पर्य, क्रियेच्या आरंभासाठीं, कर्माला गति देण्यासाठीं, श्रद्धा गरजेची आहे आणि त्याला दिशा दाखवण्यासाठीं बुद्धीची आवश्यकता आहे.

## धर्मांत बुद्धीचा प्रयोग

बुद्धीच्या उपयोगानें जर धर्म तुटत असेल तर त्याला तुटूं च द्यावें. बुद्धीच्या कात्रीनें ज्या धर्माचे तुकडे होतात, तो नालायक आहे. बुद्धीची कसोटी सहन करूं शकणारा च धर्म खरा आहे. बुद्धीचें आणि धर्माचें क्षेत्र वेगवेगळें आहे. बुद्धीला स्वतःला कळतें कीं आपली मर्यादा कुठपर्यंत आहे. परंतु विचार करण्याच्या पैलूवर जर धर्मवाले म्हणतील कीं बुद्धि चालवण्यानें धर्म खंडित होतो, तर समजायला हवें कीं तो धर्म खंडित होण्याच्या च योग्यतेचा आहे. लहानपणीं आम्हांला सांगितलें गेलें कीं शेंडी मोकळी सोडल्यानें ब्रह्महत्त्येचें पाप लागतें. पहिल्यांदा आम्हीं ही गोष्ट ऐकून घेतली. कारण, त्यावेळीं ब्रह्महत्त्या म्हणजे काय हें आम्हांला माहीत नव्हतें. पुढें एके दिवशीं ह्या गोष्टीचें मर्म लक्षांत आल्यावर आम्हीं विचारलें कीं शेंडीला गांठ न देण्यानें ब्रह्महत्त्येचें पाप लागत असेल तर साक्षात् ब्रह्महत्त्या केल्यास कोणतें पाप लागेल? झालें, ह्याचें कांहीं उत्तर नव्हतें. गेली श्रद्धा तुटून ! अशा प्रकाच्या अमंगळ गोष्टींशीं बुद्धीचा कांहीं संबंध नाहीं.

## श्रद्धा आंधळी नसावी

दिवा विझून गेला तर कुणीतरी नातलग मरतो, असले वेडगळ संस्कार करण्याचा प्रघात आहे. लहानपणीं ही गोष्ट मला पटत नव्हती.

म्हणून एके दिवशीं मी मुद्दाम एक पणती खालीं फेकून फोडली, आणि आईला म्हटलें कीं, "आतां दहापंधरा दिवसांत कुणी ना कुणी नातलग गेल्याची बातमी येईल, पहा." माझी आई चतुर होती. ती म्हणाली "अशा तऱ्हेनें पणती फोडल्यानें नाहीं मरत कुणी. दिवा अदचितपणें पडला तर च अशुभ घडतें." असें म्हणून चातुर्यानें तिनें आपली बाजू सांवरली. पण त्या श्रद्धेला ती बाजूला सारूं शकली नाहीं.

माझे शिख बंधु नाखुश होणार नसतील तर मी एक गोष्ट सांगूं इच्छितों. नुकती च माझ्याकडे गुरुग्रंथसाहेबाची नवीन आवृत्ति आली आहे. हा ग्रंथ दोन भागांत आहे. दोन भाग करण्याचीं कारणें सांगतांना हें सांगितलें आहे कीं, गुरुग्रंथसाहेबाचें पठण आदि करण्यासाठीं स्नान करून आदरपूर्वक बसायला पाहिजे. परंतु हा ग्रंथ पुस्तकाकारांत छापला जात असल्यानें आदराची भावना कमी होऊन जाणार. दुसऱ्यांच्या हातीं पडल्यावर त्याची एका सामान्य पुस्तकाइतकी योग्यता होणार. ह्या दोषांतून मुक्त होण्यासाठीं आणि गुरु-ग्रंथसाहेबाबद्दलचा आपला आदरभाव सुदृढ करण्यासाठीं हा ग्रंथ दोन भागांत विभक्त केलेला आहे. त्यामुळें लोक आतां त्याचा पाहिजे तसा उपयोग करूं शकतात.

ह्या अशा पद्धतींनीं गुरु-ग्रंथसाहेबाबद्दल एक प्रकारची भावना अभिव्यक्त होते हें मला मान्य आहे. परंतु हें असें कशासाठीं ? अशा प्रकारची श्रद्धा बुद्धीसमोर टिकत नाहीं. जर तुम्हांला गुरुग्रंथसाहेबासंबंधीं आदर ठेवायचा असेल तर दोन्ही भागांना एकसारखें च मानायला हवें. आणि जर त्याचा आदर करायचा नसेल आणि त्याला केवळ एक ज्ञानाचें पुस्तक समजून वाचायचें असेल तर तो एका भागांत पण छापूं शकता. असे दोन खंड करून छापण्यानें काय साधणार आहे ? केवळ श्रद्धा टिकवून ठेवण्यासाठीं कांहीं मार्ग काढीत राहणें योग्य नाहीं.

एकदा न्यायमूर्ति रानड्यांच्याकडे एक पाद्री आले. तिथें जीं पुस्तकें होतीं, त्यांत सर्वांच्या वर बायबल ठेवलेलें त्यांना दिसलें. तें पाहून त्यांना फार आनंद झाला आणि रानड्यांना म्हणाले "मोठी आनंदाची गोष्ट आहे कीं तुम्हीं सगळ्या पुस्तकांच्यावर बायबल ठेवलें." रानडे त्यांच्या

म्हणण्याचा भाव समजून गेले, आणि उत्तर देत म्हणाले, "हं, वर तर बायबल आहे, त्याच्याखालीं दुसरे ग्रंथ आहेत, परंतु सगळ्यांचें अधिष्ठान आहे गीता."

### खंडित होणारा धर्म 'धर्म' नव्हे

सर्व च धर्मांतून धर्माच्या नांवावर अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा दाखल झालेल्या आहेत. त्या जर बुद्धिप्रयोगानें खंडित होत असतील तर त्यांना खंडित होऊं दिल्या पाहिजेत. ह्याला धर्माचें खडन समजण्याची गरज नाहीं. समजा, कुणी त्याला धर्माचें खंडन मानीत असेल तर आम्ही हें पण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वास्तविक धर्म कधीं खंडित होत नसतो. जो खंडित होतो, तो धर्म च नव्हे. म्हणून त्या बाबतींत दुःख करण्याचें कांहीं कारण नाहीं.

'वैज्ञानिक भौतिकवाद ब्रह्माकडे झुकेल तर धर्मासंबंधींची श्रद्धा कमी होईल' अशी शंका वारंवार घेतली जाते. कारण जे वेदांती ब्रह्मवादी होते, ते कोणत्या च प्रकारच्या भ्रमाला थारा देत नसत. त्यामुळें त्यांच्या-वर असले आक्षेप घेतले जात होते. श्रीशंकराचार्यांच्या वर सुद्धां दोन आक्षेप घेतले गेले. पहिला आक्षेप 'शंकरो वर्णसंकरः'--शंकर वर्णसंकर आहे. आणि दुसरा 'प्रच्छन्न बौद्धः'--जी गोष्ट बुद्धानें उघड उघड सांगितली, ती च गोष्ट शंकरानें पांघरूण घालून सांगितली ; म्हणून तो प्रच्छन्न बौद्ध आहे.

सध्यां जे धर्म रूढ आहेत, त्यांत वास्तविकता काय आहे, हें च पाहणें ब्रह्मवाद आहे. जे तांत्रिक धर्म असतात, ते ब्रह्मवादापुढें उभे राहूं शकत नाहींत. तांत्रिक धर्म मानसिक अवस्थांच्यासाठीं गरजेचे असूं शकतील; परंतु ब्रह्मवादासाठीं अगदीं निरर्थक आहेत. निर्गुणवादापुढें सगुणवाद उभा राहूं शकत नाहीं. वरच्या ज्ञानाचा खालच्या ज्ञानावर प्रहार होत च असतो.

### ज्ञान-दानाचा खरा मार्ग

ब्रह्मविद्येसाठीं अधिकार हवा. ज्ञानप्राप्तींत देखील अधिकारवादाची गोष्ट येत असते. मग त्यांत क्रमाची गरज निर्माण होते. कोणतें ज्ञान केव्हां

शिकवावें ह्याचा एक क्रम असतो. एखादा मुलगा माझ्याजवळ आला आणि मी त्याला सुरुवातीला च शिकवूं लागलों कीं, 'तूं शरीराची पर्वा करूं नकोस, कारण तूं कांहीं शरीर नाहीं, शरीराहून भिन्न आहेस,' तर मी चूक करीन. त्या मुलाला मी असें सांगेन कीं – 'मुला, तुला तुझें शरीर सुदृढ बनवायला हवें.' ही गोष्ट त्याला ग्रहण झाल्यानंतर मग मी त्याला सांगेन कीं, 'शरीर च कांहीं सर्वस्व नाहीं. वेळेवर तें फेकून हि द्यावें लागतें.' ह्याच प्रमाणें वैज्ञानिक भौतिकवादाचें अथवा ब्रह्मवादाचें एखाद्या आवश्यक वस्तूवर आक्रमण होतें तेव्हां कांहीं काळपर्यंत त्या ज्ञानाला बाजूला ठेवायला हवें. ज्ञानप्राप्तींत अधीर होण्याची वृत्ति नको. तो क्रमिक विकासाचा कार्यक्रम आहे. शाळेचें शिक्षण झाल्यावर कॉलेजांत प्रवेश मिळतो. तद्वत च आत्मज्ञानासंबंधीं आहे. सृष्टीच्या मुळाशीं जें तर्कशास्त्र आहे, तिथून आरंभ करता कामा नये. तें तर शेवटीं येईल. समाजांत प्रथम आचारधर्म स्थिर झाल्यावर, मग वेदान्ताचा किंवा वैज्ञानिक भौतिकवादाचा प्रवेश होणें योग्य होईल.

### धर्म-रक्षणाचे तीन उपाय

आतां प्रश्न उभा होतो कीं धर्माचें रक्षण होईल कसें? त्यासाठीं तीन गोष्टी कराव्या लागतील. (१) धर्मांत जीं अनावश्यक तत्त्वें दाखल झालेलीं आहेत, तीं काढून टाकलीं पाहिजेत, आणि स्पष्टपणें सांगितलें पाहिजे कीं हीं आवश्यक नाहींत. (२) भिन्न-भिन्न धर्मवाले सूक्ष्म विषयांत एक दुसऱ्यांचा जो विरोध करतात आणि त्या विरोधाला संघर्षाचें रूप देतात; त्याऐवजीं सर्वसामान्य नैतिक मूल्यांना प्रतिष्ठित करून, तदनुसार जीवन घालवण्याचा प्रयत्न केला जावा. सूक्ष्म गोष्टी नंतर घेतल्या जाव्यात. (३) धर्मविचार क्रमानुसार लोकांच्या समोर ठेवला जावा. असें करण्यानें च लोकांत धर्म आणि श्रद्धा रुजेल, आणि विज्ञान पण प्रगति करूं शकेल.

पठानकोट'
२१-५-'५९

आज आपण पुरंदरदासांचें एक भजन ऐकलें. त्यांत ते म्हणतात—'धर्माचा जय आहे.' हिंदुस्थानचे लोक धर्माचें नांव सारखे घेत असतात, धर्मावर फार श्रद्धा पण ठेवतात. असें असून हि जय मात्र कुठें दिसत नाहीं. मध्यंतरीं थोडा धर्म प्रगट झाला म्हणून स्वराज्य मिळालें आणि जय झाला. धर्माचा जितका उदय होईल तितका च जय होईल. आज भारतांत दुःख, गरीबी, अडचणी सर्वत्र आहेत. हें कांहीं जयाचें लक्षण नाहीं म्हणता येणार. अशी स्थिति असण्याचें कारण ज्याला आपण खरा धर्म म्हणतो तो अजून आम्हांला समजलेला च नाहीं.

## धर्माचा जुना आधार : श्रद्धा

आज आमच्यांत धर्माबद्दल श्रद्धा तर आहे, पण ती आहे कशी? तर एखाद्या देवतेची पूजा केली, आरती केली, गंध-फूल चढवलें—अशा प्रकारची कांहीं न कांहीं ती श्रद्धा आहे. म्हणून च गरीब माणूस देखील अल्पस्वल्प कां होईना दिलासा अनुभवतो. जर एवढी सुद्धां श्रद्धा नसती तर देश अत्यंत दुःखी आढळला असता. आज देश दारिद्र्यांत खितपत असून देखील त्या श्रद्धेमुळें च लोकांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत आहे. आपल्या इकडे दुःखी पण हसत असतात. परमेश्वरावर मूलभूत श्रद्धा नसती तर, न जाणों, आमची काय गत झाली असती!

या सगळ्यावरून स्पष्ट आहे कीं हा तर केवळ पाया च असून धर्माची इमारत उभारणें अजून बाकी आहे. पाया घातला आणि घर च बांधलें नाहीं, तर राहण्यासाठीं का तो पाया उपयोगी पडेल? त्या पायावर घर बनेल तेव्हां च त्यांत राहता येईल. अशा च प्रकारची आमची ईश्वरावर श्रद्धा आहे. आम्ही त्याची पूजा-अर्चा करीत असतों, रामनाम घेत असतों—हा सारा झाला धर्माचा पाया. एवढ्यानें धर्माची इमारत उभी होत नाहीं. जेव्हां धर्माची इमारत उभी होईल तेव्हां च आपण सुखानें, प्रेमानें राहूं शकूं.

## आजवरचें विफल प्रयत्न

धर्म आहे तरी काय ? आम्हांला मानवधर्माची इमारत बांधायची आहे. हिंदु, खिश्चन, मुसलमान सर्वांसाठीं मानव-धर्म एक च आहे. अशा तऱ्हेच्या मानव-धर्माची इमारत उभी करण्याचें यत्न पूर्वीं झालेले नाहींत असें नाहीं. प्रयत्न अनेक झाले, पण इमारत पूर्ण होऊं शकली नाहीं. इमारत पुरी न झाल्यामुळे तीवर सारखे प्रहार होऊं लागता च त्या इमारतीच्या विटा पडूं लागल्या, माती वाहून गेली आणि ती उध्वस्त झाली. लोक ती सोडून निघून गेले.

इथें म्हैसुरांत बसवण्णा, वीरशैवांचे गुरु होते. ईश्वरश्रद्धेच्या आधारावर धर्माची इमारत बनवायला त्यांनीं सुरुवात केली. "स्त्री-पुरुषांना समान अधिकार असावा, जातिभेद, उच्च-नीचता समाजांत नसावी, सर्वांनीं शरीरश्रम करावा" असा त्यांनीं उपदेश दिला. पण आज तो व्यवहारांत आलेला नाहीं. केवळ बसवण्णांनीं च नाहीं, परंतु आणखी कितीतरी जणांनीं धर्माची इमारत बांधण्याचे यत्न केले. पण ती इमारत कांहीं टिकली नाहीं. असें असलें तरी ईश्वरकृपेनें श्रद्धेचा पाया टिकून आहे. म्हणून पुन्हां आम्ही त्या पायावर इमारत बांधण्याचें काम सुरू करीत आहोंत.

## धर्म-मंदिराचा नवा पाया--विचार

लोक म्हणतात, "ज्यांनीं ज्यांनीं हें काम उचललें ते सारे हारले. त्यांनीं बांधलेल्या इमारती ढासळल्या. तुमची पण इमारत ढासळेल." हो, आमची इमारत सुद्धां ढासळूं शकते. पण आशा करूं या कीं ती कोलमडणार नाहीं. इमारत उभी करण्याचा आमचा यत्न असून हि कदाचित् तो अर्धवट राहण्याची शक्यता आहे. परंतु जर कां ती उभी झाली तर नाहीं ढासळणार. पूर्वीं हिंदुस्थानांत सर्व लोक खादी वापरीत होते. त्यावेळीं मिला नव्हत्या. नागडे राहतां येत नाहीं म्हणून मिळेल तसली खादी ते वापरीत होते. त्यानंतर मिला आल्या, आणि खादी गेली. आतां परत खादी वापरूं लागाल तर काय होईल ? समोर कापडाच्या गिरण्या उभ्या आहेत, अशा स्थितींत जर विचारपूर्वक खादी वापराल तर काय ती खादी जाईल ? नाहीं,

खादी कधीं जाणार नाहीं. कारण पूर्वीची खादी लाचारीची होती, ही विचाराची आहे. ही कापडाच्या गिरण्यांशीं दोन हात करील. तद्वत च पूर्वीचा काळ विज्ञानाचा नव्हता, त्यामुळें धर्माची इमारत ज्यांनीं ज्यांनीं उभी केली होती ती सारी श्रद्धेच्या आधारावर. दुसरीकडून श्रद्धेवर प्रहार होता च इमारत ढासळली. परंतु आतां धर्माची इमारत भोळेपणा किंवा श्रद्धेच्या आधारावर नाहीं, विचाराच्या आधारावर उभी करायची आहे.

पुरंदरदासांचें एक भजन आहे. त्यांत ते म्हणतात—"पहा, तुम्ही मंडळी आईवडिलांची आज्ञा न मानाल तर तुमची चामडी सोलली जाईल." पण, केव्हां? तर "मेल्यानंतर." ह्या आधारावर का धर्म टिकून राहील? लोक म्हणतील कीं आम्हांला स्वर्ग-नरकाची पर्वा नाहीं. तेव्हां अशा स्वर्ग-नरकाच्या भीतीवर धर्माची इमारत कशी उभी राहणार? आणि उभी राहिली, तरी ती का पक्की राहील? ती पावसांत आणि वादळांत कशी तग धरणार?

## धर्म विज्ञानाच्या आधारावर स्थिर करा

आज विज्ञानाचा वर्षाव चालूं आहे. विज्ञान प्रयोग करतें आणि समोर परीक्षा घेतें. त्यानें प्रयोग करून स्वर्ग आणि नरकाची कल्पना धुडकावून लावली. आतां आपल्याला धर्म विज्ञानाच्या आधारावर स्थिर करायला हवा. आई वडिलांची आज्ञा न पाळल्यास, काय होईल? आम्ही मुलाला समजावून सांगूं "मुलांनो, हें पहा! तुम्ही लहान आहांत. अजून तुमच्यांत स्वतंत्र बुद्धि आलेली नाहीं. तेव्हां आईबापांचें न ऐकल्यास त्यांच्या अनुभवाचा फायदा तुम्हांला मिळणार नाहीं, मूर्ख राहून जाल आणि तुमची उन्नति होणार नाहीं. ह्यासाठीं आईबापांची आज्ञा पाळावी." अशा रीतीनें समजावून दिलें म्हणजे आईबापांची आज्ञा न पाळल्यास काय नुकसान होतें, तें त्यांच्या लक्षांत येईल. अशा च प्रकारें आम्ही मुलांची आणखी समजूत घालूं कीं "तुमच्यावर आईवडिलांनीं भरभरून प्रेम केलें आहे. तुम्ही त्यांच्यावर जर प्रेम करणार नाहीं, तर मग कोण करील? आणि तुमचीं मुलें तुमच्यावर मग प्रेम करतील का? तेव्हां आईवडिलांच्या वर प्रेम करण्यांत, त्यांच्याआज्ञेंत राहण्यांत, तुमचें भलें आहे."

विज्ञानयुगांतील मुलें आम्हांला विचारतील—“आई-वडिलांची, थोरांची सेवा केली पाहिजे हें आम्हांला मान्य आहे; परंतु विचार करण्याची शक्ति आल्यानंतर वडील मंडळी एखादें अयोग्य काम करायला सांगतील तर तें कां आम्ही करायचें ?” आम्ही मुलांना सांगूं-“स्वतंत्र बुद्धि आल्यानंतर आईवडिलांची आज्ञा मानण्याची जबाबदारी तुमच्यावर नाहीं; पण त्यांची सेवा करण्याची जबाबदारी राहील च.” असें सांगूं तेव्हां च ‘आईवडिलांची आज्ञा पाळणें’ हा धर्म पक्का होईल. तुलसीदासजीनीं पण म्हटलें आहे—

**को जाने, को जैहै जमपुर, को सुरपुर परधाम को।**
**तुलसिहि बहुत भलो लागत जग, जीवन राम गुलामको ॥**

--स्वर्गांत कुणाला प्रवेश मिळणार आणि यमपुरींत कोण जाणार, हें आहे कुणाला ठाऊक ? म्हणून ह्याच आयुष्यांत रामाचा दास होऊन राहणें तुलसीदासाला प्रिय आहे.

## वास्तविकतेशीं सांगड घाला

आमच्या कृत्याचें फळ आम्हांला परलोकांत मिळेल, असल्या कल्पनेवर विज्ञानयुगांत धर्म टिकूं शकत नाहीं. आम्हांला त्याचें प्रत्यक्ष फळ दाखवावें लागेल. ‘गूळ खाल तर तो मेल्यानंतर गोड लागेल’ असें म्हणून चालणार नाहीं. ‘गूळ खा, कीं तत्काळ तो तुम्हांला गोड लागेल.’ ह्याप्रमाणें च धर्माचा परिणाम इहलोकांत स्पष्ट दाखवाल तर च धर्म टिकेल. वैज्ञानिक-बुद्धीशीं त्याचा मेळ बसवावा लागेल. “सर्वांशीं प्रेम कराल तर सर्वांचें प्रेम व सहकार्य तुम्हांला मिळेल आणि वैर कराल तर शत्रुत्व वाढेल. प्रेमामुळें सर्वच आनंदानें राहतील, दारिद्र्य दूर होईल, जीवन सुखी होईल. प्रेम न करता हिंसा कराल नर अणुबॉंब पडतील आणि सत्यानाश होईल.” “तुम्ही ग्रामदान कराल तर स्वर्गांत कुबेराच्या महालांत तुम्हांला जागा मिळेल” असें आम्ही नाहीं सांगत. उलट हें च सांगत असतों कीं ‘ग्रामदान कराल तर ह्याच खेड्यांत आणि ह्याच जन्मांत तुम्ही लोक आनंदाचा अनुभव घ्याल.”

भैसंद्रा (म्हैसूर)
६-११-’५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 36663 वि: निबंध
क्रमांक 2508 नों दि 25/8/...

## मानवधर्माची स्थापना होईल कशी? : २२ :

आपल्या देशांत आणि साऱ्या जगांत सुद्धां धर्माचा पाया तर घातला गेला आहे, आणि तो पाया आहे परमेश्वरावर श्रद्धा. ती श्रद्धा निरनिराळ्या समाजांत कोणत्या ना कोणत्या रूपानें अस्तित्वांत आहे. असें असलें तरी अजून त्यावर इमारत बांधली गेलेली नाहीं. आम्हांला त्यावर व्यक्ति आणि समाज दोघांना आश्रय देणारी धर्माची इमारत उभी करायची आहे.

### धर्म अजून आलेला नाहीं

प्रश्न उठतो कीं इतके सारे धर्म दिसत असून हि अजून का धर्म-स्थापना बाकी आहे? लक्षांत घ्या कीं सतरा धर्म होऊं शकत नाहींत. मानवासाठीं एक च धर्म होऊं शकतो आणि तो आहे मानव-धर्म. तो अजून झालेला नाहीं. त्याची स्थापना करण्याचा यत्न केला गेला, तो थोडा बनला सुद्धां, पण एकदम कोसळून पडला. त्यांत बरें एवढें च कीं पाया अजून पक्का आहे--हृदयांत श्रद्धा आहे.

### हा बिचारा कायिक-धर्म

एक उदाहरण घ्या. बसवण्णास्वामींनीं कायिक-धर्म (शरीरश्रमधर्म) सांगितला--"शरीरश्रम प्रत्येक माणसानें करायला हवा, मग तो लहान असो वा मोठा." आज तो धर्म रूढ झालेला नाहीं. कां नाहीं झाला? आज सुद्धां कोटयावधि लोक श्रम करीत च आहेत आणि त्या काळीं सुद्धां करीत होते. असें जर आहे तर हा कायिक-धर्म स्थापण्याची गरज च काय होती? पण, गोष्ट तशी नाहीं. लोक जे श्रम करीत होते वा करीत आहेत, तो नाइलाजानें करतात. त्यांत ते शरीर-श्रमाची प्रतिष्ठा अनुभवीत नाहींत. आणि जे शरीरश्रम करीत नाहींत ते तर ह्याला मानीत च नाहींत. आज अंगमेहनत करणाऱ्याला सुद्धां शरीर परिश्रम नको आहे. शेतकरी रोज श्रम करतो, पण आपल्या मुलाला तसें श्रम पडूं नयेत, त्याला शेती करावी लागूं नये, अशा तऱ्हेचें शिक्षण तो देऊं इच्छितो. स्वतःसाठीं दुसरा इलाज च नाहीं म्हणून बिचारा शेतांत राबत असतो. अशा तऱ्हेचा

कायिक श्रम रोज चालत असलेला दिसला तरी तो लाचारीचा आहे. दुसरी एखादी युक्ति हातीं लागली तर तो श्रम करायला कोणी राजी होणार नाहीं.

सगळयांची इच्छा आहे कीं शरीर-परिश्रम धर्म-विचार व्हावा. पण तो होईल कसा ? आम्ही कायिक-धर्माचें पालन करावें, मग त्यानें इहलोकांत लाभ होवो अथवा न होवो त्याची आम्हांला पर्वा नाहीं; परंतु परलोकांत त्यामुळें चांगलें फळ मिळेल असें सांगत गेल्यानें का हा धर्म टिकेल? अशानें हा कधीं चालणार नाहीं; मग शरीरपरिश्रम धर्म बनेल कधीं ? दुसऱ्या कामांना मिळते तेवढी मजूरी जेव्हां शरीर-परिश्रमाच्या कामाला मिळूं लागेल तेव्हां च हें होईल. त्यासाठीं ह्या गोष्टीमागें समाजाची शक्ति लावली पाहिजे, त्याला अनुकूल असा समाज बनवला पाहिजे. परिश्रमाचें शुभ-फळ इहलोकांत मिळेल अशी योजना करायला हवी, तेव्हां च हा 'कायिक-धर्म' रूढ होऊं शकेल.

आज एका प्रोफेसराला ५०० रुपये पगार मिळतो. बारा महिन्यांत सहा महिने असते सुट्टी आणि सहा महिने काम ! शिवाय रोज तीन तासाहून जास्त वेळ काम पण नाहीं. पण त्याच्या कामाची किंमत ५०० रुपये आहे, म्हणजे वर्षाला सहा हजार रुपये. सहा महिन्यांत रोज तीन तासाप्रमाणें ६०० तास काम आणि ६००० रु. त्याची किंमत! याचा अर्थ प्रोफेसरला एका तासाला दहा रुपये मिळायचे. या उलट शरीर-परिश्रम करणाऱ्या एखाद्या मजुराला फार तर एका तासाचे दोन आणे ! कॉलेजच्या प्रोफेसराची २५-३० वर्षें नोकरी झालीं कीं त्याला पेन्शन मिळेल, परंतु शरीर परिश्रम करणाऱ्या बसवेश्वराच्या शिष्याला कांहीं हि मिळणार नाहीं. अशानें धर्म चालेल कसा ? म्हणून तर आम्ही म्हणतों, धर्म अजून स्थापन झालेला नाहीं. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, यहूदी, शिख, जैन, बुद्ध---ह्या साऱ्या श्रद्धा उपलब्ध असल्या तरी मानव-धर्म अजून बनलेला नाहीं.

## धर्माचीं तीन अनिवार्य अंगभूत कारणें

दुसरें उदाहरण घ्या. 'चोरी करणें वाईट आहे' हा एक धर्म-विचार आहे पण जर संग्रह करणें पाप नसलें तर चोरी करणें पाप कसें होईल ?

लोक अशा तऱ्हेचा एकांगी धर्म रूढ करूं इच्छितात म्हणून तो मूळ धरीत नाहीं. आज संग्रह करणाऱ्यांची समाजांत प्रतिष्ठा आहे च; मग भलें हि तो मेल्यानंतर नरकांत जावो. परंतु हा बिचारा गरीब कायिक ! त्याला या जन्मांत प्रतिष्ठा नाहीं, मग मेल्यानंतर भलें हि परलोकांत त्याला इंद्रासन लाभो ! परलोकाच्या कल्पनेवर धर्म टिकूं शकत नाहीं. त्याला इहलोकाचा च आधार हवा. धर्म कधीं एकांगी नसतो, तो पूर्ण असतो. चोरी करणें पाप आहे तर संग्रह करणें पण पाप च आहे. दोन्ही विचारांनीं धर्म अधिष्ठित होईल.

व्यक्तीसाठीं असलेल्या धर्माला पण साऱ्या समाजांत प्रतिष्ठा हवी, आणि समाजाची तदनुसार रचना करायला हवी. धर्म कुणा एकाला लागू होत नाहीं, तो सर्वांना लागू होतो. तो एका पक्षाला लागू आहे आणि दुसऱ्याला नाहीं, असें नसतें. पत्नीनें कपाळावर कुंकू लावावें आणि गळ्यांत मंगल-सूत्र धारण करून आम्ही पतिव्रता आहोंत असें सांगावें. ही पत्नीची जबाब-दारी मानली जाते. तशी पुरुषावर पत्नीव्रताची कांहींच जबाबदारी नाहीं का ? पुरुषाच्या मस्तकावर असें एखादें चिह्न कां नसावें ? पुरुषांनीं सुद्धां आपल्या गळ्यांत पत्नीव्रतसूचक चिह्न कां घालूं नये ? एका च पक्षावर ही जबाबदारी कां म्हणून ? अशा रीतीनें धर्म टिकणार नाहीं.

अशा प्रकारें धर्मासाठीं तीन गोष्टी सांगितल्या--(१) परलोकाच्या आधारावर धर्म टिकूं शकत नाहीं. (२) धर्म परिपूर्ण हवा, तो एकांगी नसावा. (३) धर्म व्यक्तीसाठीं च पुरेसा नाहीं. तदनुसार समाज पण बनवावा लागेल, तेव्हांच साऱ्या समाजांत त्याची प्रतिष्ठा होईल. ह्या तीन गोष्टी होतील तेव्हां च धर्माची इमारत उभी होईल. कित्येक वेळां महा-पुरुषांनीं त्यासाठीं यत्न केले,परंतु आतांपर्यंत या तीन गोष्टी झालेल्या नव्हत्या. आम्हांला त्या करायच्या आहेत. विज्ञानयुगांत आम्ही त्या करूं शकतों. या वेळीं जर का धर्म टिकला नाहीं तर आम्ही पण टिकणार नाहीं, हें निश्चित समजा.

विज्ञान हातीं लागल्यामुळें आज मानवाची बुद्धि विशाल झालेली आहे, पण हृदय अजून हि संकुचित च आहे. शेतकरी विचार करतो—हें माझें

घर, हें माझें शेत! आपला शेजारी जरा बेपर्वा दिसतो तेव्हां या वर्षी आपली हद्द त्याच्या शेतापर्यंत द्यावी लांबवून. त्यामुळें माझें शेत एक हात वाढेल. शेवटीं हें आहे काय ? एकीकडे चंद्रावर जाण्याच्या गोष्टी चालल्या आहेत तर दुसरीकडे दुसऱ्याची हातभर जमीन कशी हडपतां येईल याचें चिंतन ! अशानें का मनुष्य जिवंत राहूं शकेल ? अशानें लढाई होईल. म्हणून आम्ही म्हणतों–भारतांतील खेड्याखेड्यांत ऐक्य राखा, समाज-धर्माची स्थापना करा आणि मानव-धर्माची प्रतिष्ठा करा. 'आपण सारे एका परमेश्वराचीं लेकरें आहोंत' हा एक फार मोठा आधार आम्हांला आहे. आतां आपण मानवतेच्या आधारावर मानवधर्माची स्थापना करूं या.

## विज्ञानाची मदत, तशी धमकी सुद्धां

लोक शंकेनें विचारतात कीं जुन्या लोकांना जें साधलें नाहीं, तें कां तुम्हांला साधणार आहे ? मी सांगतों, हो, अवश्य साधेल. जुन्या काळीं लोकांच्या मदतीला विज्ञान नव्हतें. पण आज तें आमच्या मदतीसाठीं तत्पर आहे. विज्ञान आम्हांला केवळ मदत च नाहीं, धमकी देखील देत आहे : "तुम्ही जर भांडण-तंटे कराल तर मानवजातीचा विनाश होईल आणि जर गुण्यागोविंदानें मिळूनमिसळून रहाल तर या च पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल."

जुने लोक मृत्यूनंतरच्या स्वर्गनरकाच्या गोष्टी करीत असतात. 'चांगलें काम कराल, मिळून मिसळून रहाल तर मरणानंतर स्वर्ग मिळेल. स्वार्थी रहाल, तर नरकांत जाल', असें ते म्हणत. परंतु आज विज्ञान म्हणतें कीं 'जर प्रेमानें रहाल, पुण्य-कार्यें कराल, मिळूनमिसळून वागाल तर इथें च–या पृथ्वीवर–स्वर्ग मिळेल. स्वार्थ च पहाल, भांडणें कराल तर इथें च नरक लाभेल, इथें च झोडपून काढले जाल.' अशा तऱ्हेनें विज्ञान प्रत्यक्ष फळ दाखवीत आहे.

दहा वर्षांपूर्वी हिरोशिमावर बॉंब टाकला गेला. त्यांत हजारो लोक मारले गेले. कोट्यावधि जखमी झाले. कुणाचा पाय तुटला, तर कुणाचा हात. सगळे दवाखान्यांत भरती झाले. हा नरक नाहीं तर आहे काय ? मृत्यूनंतर नव्हे तर इथें, या च जन्मांत !

यापुढें जी धर्माची उभारणी होईल त्यांत पापपुण्याचें फळ स्पष्ट समोर राहील. अशा तऱ्हेची धर्माची इमारत सुरवातीपासून आम्हांला बनवावी लागेल. आत्मज्ञानाची मदत आहे, संतांच्या तपश्चर्येची सहायता आहे आणि सर्वांत मोठी गोष्ट विज्ञान अनुकूल आहे. आजवर जो धर्म-विचार अधिष्ठित झाला नाहीं, तो आतां होऊं शकेल. त्यासाठीं थोडासा त्याग करावा लागेल, फार नाहीं.

तुरुवॅकेरे
४-११-'५७.

---

## विज्ञानाचा एकमात्र अधिकारी भारत च : २३ :

आमचा देश फार जुना आहे आणि जगांत त्याची आपली एक विशेषता आहे. जगाला माहीत आहे कीं भारतानें कधीं हि दुसऱ्या देशावर आक्रमण केलेलें नाहीं. ज्यावेळीं भारतांत सत्ताधारी राजे आणि मोठमोठे सम्राट् होते, भारत विद्या आणि कला यांनीं संपन्न होऊन ऐश्वर्याच्या शिखरावर पोंचला होता, त्यावेळींसुद्धां त्याच्याकडून दुसऱ्या देशावर आक्रमण झाल्याचें एक पण उदाहरण नाहीं. भारत कांहीं लहानसहान नाहीं, अति विस्तीर्ण, लांबरुंद प्रदेश आहे हा ! असें असून देखील एवढ्या मोठ्या देशाच्या इतिहासांत विदेशी लोकांच्यावर आक्रमण केल्याचा एक पण प्रसंग नाहीं. इथून विद्येचा आणि धर्माचा संदेश घेऊन जे भारतीय चीन, जपान, लंका, तिबेट, ब्रह्मदेश आणि मध्य-आशियांत गेले होते, ते कांहीं आपल्याबरोबर शस्त्र घेऊन गेले नव्हते. किंवा न कोणत्या प्रकारची सत्ता पण. ते केवळ ज्ञान-प्रचारासाठीं गेले आणि थोडेसे व्यापारी व्यापारा-साठीं सुद्धां गेले. परंतु कधीं हि कोठून हि अशी तक्रार नाहीं आली कीं भारतानें दुसऱ्यावर विचाराचें कां होईना, आक्रमण केलें. भारत दुसऱ्यावर आपली सत्ता तर चालवूं इच्छित च नाहीं, उलट विचारांचें पण आक्रमण

त्यानें कधीं केलें नाहीं. केवळ विचार देऊन च तो संतुष्ट राहिला. भारताची ही एक मोठी खुबी आहे. भारताच्या इतिहासांतील ही च खुबी आमच्यासाठीं गौरवदायी आहे. आतां कित्येक वर्षांनंतर--ठीक सांगायचें म्हणजे सुमारें दोन हजार वर्षांनंतर--भारताला ही संधि पुन्हां मिळत आहे कीं अखिल भारतांत आम्ही आपल्या संस्कृतीला आणखी उज्ज्वल स्वरूपांत मांडावें आणि दाखवून द्यावें कीं आजच्या विज्ञानयुगांत, विज्ञानाला अनुरूप असा जर कुठला विचार असेल तर तो भारताचा च आहे.

१४१९८

## भारत नेहमीं मुक्तचिंतनाचा पक्षपाती

हिंदुस्थानांत आम्ही कोणा एका व्यक्तीच्या नांवानें धर्म रूढ केलेला नाहीं, ही ह्या देशाला अभिमानाची गोष्ट आहे. जर आम्ही कोणा व्यक्तीचें नांव घेऊन, त्याच्या कार्याला पुढें नेण्याची प्रतिज्ञा करूं, तर त्याच्या नांवाचा गौरव होईल. असें असलें तरी आम्ही कोणा हि महापुरुषाच्या नांवाशीं आपले विचार जखडून टाकलेले नाहींत. उदाहरणार्थ, येशूनें ख्रिश्चन-धर्माला 'ख्रिस्ता'शीं बांधून टाकलें. आम्ही येशूचें नांव मोठ्या गौरवानें घेत असतों. कारण, महापुरुषांत आम्ही फरक करीत नाहीं. तरी पण ते किती हि मोठे असोत, आम्ही हें स्वीकारायला तयार नाहीं कीं कोणा एका महापुरुषाच्या सहाय्यानें च आम्ही परमेश्वराजवळ पोंचूं शकतों. आमच्या-मधें अशा कोणत्या हि एजन्सीची गरज नाहीं. त्यामुळें आम्ही भारतीयांनीं नेहमीं मुक्त चिंतन केलेलें आहे. भारतीय दर्शनानें विज्ञानाशीं कधीं वाद घातलेला नाहीं. शंकराचार्यांनीं तर इथपर्यंत म्हटलें आहे कीं प्रत्यक्ष श्रुति देखील 'अग्नी थंड आहे' असें सांगूं लागेल तर आम्ही हें मानण्याला तयार नाहीं. अर्थात् विज्ञानानें प्रत्यक्ष सिद्ध होणारी जी कोणती वस्तु असेल, त्याविरुद्ध वेद पण बोलत नाहींत आणि बोलूं इच्छीत नाहींत.

## धर्मविचार विज्ञानाशीं अ-विरुद्ध

इतिहासाच्या अभ्यासकांना माहीत आहे कीं युरोपांत धर्म आणि विज्ञान यांच्या मधें उघड-उघड लढाई झाली. विज्ञान म्हणालें, पृथ्वी सूर्याभोंवती

फिरत असते. तेव्हां तिथल्या धार्मिक लोकांनीं 'ही गोष्ट आमच्या धर्म-शास्त्राविरुद्ध जाते' ह्या मुद्यावर विरोध केला. विज्ञान जेथें अधिकांत अधिक विकसित झालें, तिथें च त्याला घोर विरोध झाला ! विज्ञानाला धार्मिकांच्या विरुद्ध उभें रहावें लागलें आणि धर्मवाल्यांनीं देखील विज्ञानवाल्यांना पुष्कळ सतावलें. इथपर्यंत कीं कित्येकांना तुरुंगांत टाकलें आणि मारलें सुद्धां. ख्रिस्ती-संस्था आणि पोप यांच्याकडून त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागला. 'पृथ्वी फिरत नाहीं' गॅलिलिओनें म्हणावें म्हणून त्याला तुरुंगांत डांबण्यांत आलें. परंतु त्याला दर्शन होतें आणि त्याच्या प्रयोगांनीं त्याला दाखवून दिलें होतें कीं पृथ्वी तर फिरत च असते. शेवटीं जेव्हां त्याला फार छळण्यांत आलें, तेव्हां त्याचें धैर्य थोडें खचूं लागलें. परंतु त्याची विवेकबुद्धि जागृत होती. तो म्हणाला, "नाहीं. मला वाटतें कीं पृथ्वीनें फिरूं नये. परंतु ती फिरते च आहे, त्याला मी काय करूं ? म्हणून पृथ्वी फिरत नाहीं असें मी म्हणूं शकणार नाहीं."—'It moves and moves and moves, not withstanding myself it moves.'

परंतु हिंदुस्थानांत धर्म-विचाराचें विज्ञानाशीं असें भांडण झालें नाहीं. ज्ञान-शिरोमणि शंकराचार्यांनीं जाहीर करून टाकलें कीं 'ज्ञानं न पुरुष-तंत्रम्, किंतु वस्तुतंत्रम्' म्हणजे ज्ञान माणसाच्या मर्जीवर नाहीं, वस्तूच्या स्वरूपावर अवलंबून आहे. तेव्हां वस्तु-स्वरूपासमोर कोणाची आज्ञा चालत नाहीं. वस्तु-स्वरूपासमोर साऱ्या आज्ञा कुंठित होऊन जातात. वस्तूचें स्वरूप वस्तूच निश्चित करणार, मानव-बुद्धि नाहीं. अशा तऱ्हेनें मनुष्य असें म्हणू शकत नाहीं कीं 'वर्तुळ वर्तुळ नाहीं, त्रिकोण आहे. आणि त्रिकोण वर्तुळ आहे.' त्रिकोणाचें स्वरूप त्रिकोणावर अवलंबून आहे तर वर्तुळाचें स्वरूप वर्तुळावर. 'पृथ्वी'चें स्वरूप पृथ्वीवर आणि सूर्याचें स्वरूप सूर्यावर अवलंबून आहे. माझी मर्जी माझ्या वाक्यावर वा माझ्या अर्थावर अवलंबून नाहीं. शंकराचार्यांनीं असें म्हणून जणूं विज्ञानाला 'मॅग्नाचार्टा' च देऊन टाकला—'विज्ञाना, मुक्तपणें पुढें ये. आमच्या धर्म-विचारांशीं तुझा कुठें च विरोध नाहीं.' ह्यावरून हिंदुस्थानांत धर्म-विचारांशीं विज्ञानाचा कधींसुद्धां विरोध मानला गेलेला नाहीं, हें स्पष्ट

होतें. आतां भारताला संधि लाभली आहे. त्यानें दाखवून द्यावें कीं भारताचा धर्मविचार वैज्ञानिक आहे आणि आम्ही विज्ञानाचें स्वागत करतों. विज्ञान खूप पसरावें अशी आमची इच्छा आहे. त्यामुळें भारताचा विचार परिपुष्ट होणार आहे. आमच्या आत्मज्ञानाला वा वेदांत-दर्शनाला --जें ह्या भूमींत प्रगट झालें--विज्ञानानें पुष्टि मिळेल. तें कुंठित होणार नाहीं. विज्ञानानें आमचा धर्म खच्ची होणारा नाहीं.

## आमचा ईश्वर कर्म-सापेक्ष

युरोपांत हा धर्म-विचार पसरला कीं 'परमेश्वर एक सृष्टिकर्ता आहे आणि जगाच्या कुठल्या एका कोपऱ्यांत बसून, तिथून तो साऱ्या जगावर राज्य करतो.' परंतु आमच्या दार्शनिकांचें मत आहे कीं आमचा परमेश्वर असा सुलतानासारखा नाहीं. आमचा ईश्वर तर कर्म-सापेक्ष आहे. तो पावसाप्रमाणें सर्वत्र वर्षेल, परंतु शेती आम्ही च करूं. तो आमच्या कर्तृत्वाच्या आड येणार नाहीं. तो तर कर्माचें फळ देऊन मुक्त राहील, कुणावर कांहीं तो लादणार नाहीं. शास्त्रकारांनीं सांगून टाकलें कीं आम्ही कुणाला हि जगाचा पति, परमेश्वर वा लॉर्ड मानीत नाहीं. असें पति मानणें अधर्म आहे. आमचा ईश्वर कुठें घरटचांत नाहीं, घटा-घटांत विराजमान आहे. तो अंतर्यामी आहे, आमच्या हृदयांत राहतो, आमच्या अंत:प्रेरणेमागें लपून आहे. अशाप्रकारें आमच्यासमोर एक मोकळें मैदान आहे. ईश्वरावर जर कुणाचा अधिकार असेल आणि विज्ञानाचें अत्यंत निर्भयतेनें कुणी स्वागत करूं शकत असेल तर तें हिंदुस्थान च करूं शकतो.

## सह-अस्तित्वाचा आदर्श

भारताचा आक्रमणावर नाहीं, प्रेमावर विश्वास आहे. भारतांत शक, हूण, आर्य, यहूदी, पारशी, ख्रिश्चन, चिनी, जपानी सर्व आले. आम्हीं सर्वांना स्वीकारलें, सर्वांना वसविलें, सर्वांवर प्रेम केलें, सर्वांना 'ऍडजस्ट' केलें. भारतांत आम्ही 'सह-अस्तित्वा' ची कल्पना आणली. हल्लीं हिंदुस्थानचें 'पंचशील' नांव साऱ्या जगांत घेतलें जात आहे. पंचशीलचा अर्थ आहे, जीवनांत विविधतेला सहन करणें. ही च भारतीय संस्कृति आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांचें आपलें

आपलें अलग जीवन आहे. परंतु भारतीय संस्कृति सांगते कीं वैश्य वा शूद्राला मुक्त होण्यासाठीं ब्राह्मण बनण्याची गरज नाहीं. निष्काम भावनेनें जे आपआपल्या कर्मांत रत राहतील, त्यांना त्याच कर्म-योगानें परमेश्वरप्राप्ति होऊं शकते. 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' आपल्या आपल्या कर्मांत तत्पर राहून निष्काम भावनेनें भगवत्-पूजा समजून व्यापार करणारे वैश्य सुद्धां मुक्त होऊं शकतात. आमचा धर्म सांगतो कीं व्यापाऱ्यानें स्वतःसाठीं नाहीं, दुसऱ्यासाठीं पैसा संभाळावा आणि स्वतः ट्रस्टी म्हणून रहावें. ह्या प्रकारें ट्रस्टी होऊन त्याचा उपयोग करीत असतील तर, व्यापार आणि धन-संग्रह करून सुद्धां, ते परमेश्वराजवळ जाऊं शकतात, मोक्ष मिळवूं शकतात. ही फार मोठी गोष्ट आहे. हें च सह-अस्तित्व (Co-existence) आहे. याचा अर्थ इथें जगभरांतल्या भिन्न-भिन्न जाति राहूं शकतात, आपल्या आपल्या पद्धतीनें जीवन जगूं शकतात, आपल्या आपल्या देवतांची उपासना करूं शकतात. एक दुसऱ्याशीं टक्कर होण्याचें कारण च नाहीं. अशा रीतीनें सर्व जण प्रेम आणि निष्काम भावनेनें समाजाची सेवा करूं लागल्यास, सुखानें नांदू शकतील. जीवनाची एक पद्धति दुसऱ्यावर लादण्याचें कांहीं कारण नाहीं.

## विचार थोपण्याचा प्रश्न च नाहीं

एका मित्रानें विचारलें, "तुमचें हें ग्रामदान दिसायला तरी फार आकर्षक दिसतें. परंतु बहुधा तें लादलें जात असावें." भावार्थ, असा कीं 'जमीन समाजाची' म्हटल्यावर प्रत्येक मनुष्याला आपल्या पद्धतीनें राहण्याची सवलत राहील कीं नाहीं ?

अशा प्रश्नांनीं मला नेहमीं च आनंद होतो. सद्‌विचारांत देखील जर अल्पसा असद् अंश राहिला तर तो शुद्ध करायला पाहिजे. किती हि मोठा सद्‌विचार असला तरी आम्ही त्याला जशाचा तसा मान्य करायला तयार नाहीं. विचारांचें सर्व बाजूंनीं सूक्ष्म परीक्षण व्हावें असें आम्हांला वाटतें. पुष्कळसे लोक ग्रामदानाचें नांव ऐकून खुश होऊन जातात आणि म्हणतात कीं, बाबा तर आतां जमीनीची मालकी नष्ट करण्याची गोष्ट करतो. या पुढें जमीन सर्वांची होईल. सर्व जमीन एकत्र करून सहकारी

शेतीचे मोठमोठे प्रयोग केले जातील. मग विचारतात, 'तुम्ही खरोखर असें करणार आहांत का ?' मी सांगतों : हो, असें पण होऊं शकतें. ग्रामदानांत आम्ही 'पण–वादी' आहोत, 'च–वादी' नाहीं. याचा अर्थ असें पण होईल आणि तसें पण होईल. गांववाले जसा विचार करतील तसें होईल. ग्रामदान ग्रामस्वराज्याची घोषणा आहे. गांववाले आपापल्या गांवीं खेळीमेळीनें जी व्यवस्था करतील, ती च व्यवस्था चालेल. त्यांच्यावर बाहेरून कोणती व्यवस्था लादली जाणार नाहीं. जर ते वेगवेगळीं शेती करूं इच्छितील तर तें तसें करूं शकतात. आणि चारसहा जण एकत्र येऊं इच्छतील अथवा साऱ्या गांवाला एकत्र करूं चाहतील तर तसें पण करूं शकतील. सर्वांची वाणी एकमतानें काम करील. पण भिन्नता आल्यास दोन प्रकारचे प्रयोग चालतील. परंतु मालकी गांवाची राहील आणि परिणाम स्वरूप गांवांगांवांत स्वराज्य येईल.

## एक होण्यांत च विज्ञानाची उपयोगिता

खेड्यांत जेव्हां आम्ही ग्राम-स्वराज्याचा संकल्प करतों, जमीन सर्वांची ठरवतों, तेव्हां प्रत्येकाला थोडीथोडी जमीन देतों. ज्यांना जास्त जमीन देऊं शकत नाहीं त्यांना ग्रामीण उद्योग देतों आणि खेड्याच्या मुख्य गरजा खेड्यांत च भागवण्याची योजना करतों. अशानें कुठें आम्ही आपल्या खेड्यांत सर्व धान्य उपजवूं शकूं आणि गरजेपुरतें धान्य स्वतःसाठीं ठेवून बाकीचें शहरांना देऊं शकूं. आम्ही शहरांना उपाशी मारूं इच्छीत नाहीं, कारण हिंदुस्थानांत धान्य मुबलक होऊं शकतें. पिकें भरघोंस निघूं शकतात. एकेकटा विज्ञानाचा उपयोग करूं शकणार नाहीं. म्हणून मी मघाशीं म्हटलें कीं– 'विज्ञाना ! भारतांत ये. तुझें स्वागत आहे. तुझ्यामुळें आमच्या कोणत्याहि धर्म-विचारांत आणि तत्त्वज्ञानांत अत्यय येणार नाहीं. आम्ही वैज्ञानिक बनूं इच्छितों आणि त्या विज्ञानाचा उपयोग भारताच्या शेतींत करावा म्हणतों.' जर सर्व गांववाले खेळीमेळीनें काम करतील, तर विज्ञानाचा उपयोग चांगल्याप्रकारें घेतां येईल. तेव्हां मग हें धान्याचें भाव पण आमच्या हातांत राहतील. हल्लीं ग्रामवासी आपलें धान्य विक्रीची वस्तु समजून बाजारांत घेऊन जातात आणि त्यांची किंमत घसरते. ते

धान्याला आपल्या घरची वस्तु कां नाहीं मानीत ? ग्रामवासियांना आपल्या घरचें धान्य विकून, वेळेवर बाहेरून विकत घेण्याची पाळी कां यावी ? या साऱ्या गोष्टी सिद्ध करण्यासाठीं च 'ग्रामदान' आहे. ग्रामदानांत कुणाला लाचार करण्याची गोष्ट कदापि नाहीं. ग्रामदानांत लाचार बनवण्याची जर कल्पना असती तर भारतीय संस्कृतीशीं परिचित असलेला मी, हें कधीं च कबूल केलें नसतें.

## भारताला त्यागाचा विचार अति-प्रिय

भारतवासीयांना त्यांच्या शक्तीनुसार थोडाबहुत त्याग करायला सांगितलें तर त्यांना तो विचार फार आवडतो. बाबाच्या व्याख्यानांसाठीं सहस्रावधि लोक जमतात, ह्याचें कारण दुसरेंतिसरें कांहीं नसून, त्याचा त्यागाचा आणि प्रेमाचा संदेश ऐकणें हें च आहे. आणि तो संदेश आहे भारतीय संस्कृतीचा. त्यामुळें तो ऐकायला जनता उत्सुक असते, आणि धावून जाते. आजच्या काळांत त्याग थोडा कठिण जातो. कारण देशांत अत्यंत दारिद्र्य आहे. तरीपण लोक त्याग करीत च आहेत. गेलीं आठ वर्षें आम्ही ही गंमत पाहत आहोंत. भारतांत सहा लाख दानपत्रांच्या द्वारां ४२ लाख एकर जमीन मिळाली. ज्याच्या समोर हात पसरला, त्यानें दिलें च. असा एक हि माणूस आढळला नाहीं कीं ज्याच्यासमोर हात पसरल्यावर त्यानें नकार दिला. असला हा प्रेमाचा संदेश भारताचा स्वतःचा संदेश आहे. युरोपवाले जर हा मान्य करतील, तर विज्ञानावर त्यांचा देखील भारताइतका च पूर्ण हक्क राहील.

दुःखाची गोष्ट कीं आज भारताजवळ अधिक विज्ञान नाहीं. तें आम्हांला पाश्चात्यांजवळून शिकायचें आहे. तें शिकण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. अहिंसेच्या पद्धतीनें विज्ञानाचा उपयोग करून आम्ही दाखवून देऊं कीं 'भारताचे प्रश्न प्रेमानें सोडविले जाऊं शकतात. भारतांतील खेडेन्‌खेडें स्वतंत्र झालेलें आहे आणि सर्वजण प्रेमानें व्यवहार करीत आहेत. आम्ही विज्ञानाचा पूर्ण उपयोग करून पिकें वाढविली आहेत. आम्ही प्रेमानें एकत्र राहतो. भारतांत आपसांतील असें कोणतें हि भांडण नाहीं च.'

भारतानें ह्या दिशेनें आपल्याला मार्ग-दर्शन करावें अशी आज युरोप-अमेरिकेच्या लोकांची इच्छा आहे.

भीलवाडा (राजस्थान)
१२-२-'५९

---

## साधनेचा क्रम : २४ :

मला विचारलें आहे कीं, तुमच्या सूर्योपासनेला आधार कशाचा आहे? ह्या उपासनेचा संबंध वैदिक-कल्पनेशीं आहे कीं वैज्ञानिक-संशोधनाशीं ?

### मी आत्मसूर्याचा उपासक

व्यक्तिशः माझ्यासाठीं हा प्रश्न असेल तर मी वैदिक साहित्याचें अध्ययन पुष्कळ केलेलें आहे आणि विज्ञानासंबंधीं पण मला विशेष आपुलकी आहे. परंतु मी सूर्याची कांहीं उपासना करीत नाहीं. समोर घडयाळ ठेवून उपासना होऊं शकत नाहीं त्याप्रमाणें उगवणाऱ्या सूर्याला डोळयासमोर ठेवून उपासना करायचें म्हटलें तर ती सुद्धां उपासना होऊं शकणार नाहीं. वास्तविक मी जी उपासना करतों ती आत्मसूर्याची उपासना आहे. तत्संबंधीं वेदांत एक लहानसा मंत्र आहे:–**सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च.** म्हणजे सूर्य स्थावर-जंगमात्मक जगताचा आत्मा आहे. आत्म्याचें नांव सूर्य आहे. म्हणून सूर्यावर देखील आत्म्याची भावना केली जाऊं शकते. कुराणांत एका वाक्यामधें विशेष प्रकारची श्रद्धा व्यक्त केलेली आहे, आणि ती च माझी श्रद्धा आहे. त्यांत म्हटलें आहे कीं "जर तुझी ईश्वराची उपासना करण्याची इच्छा असेल तर त्यानें ज्यांना निर्माण केलें आहे, त्यांची उपासना करूं नकोस. सूर्य वा चंद्र, हे सर्व ईश्वरानें निर्मिले आहेत. त्यासाठीं त्यांची उपासना न करता त्यांना निर्माण करणाऱ्याची उपासना कर." याचा अर्थ कर्त्याची उपासना करावी, कर्माची नाहीं. मी देखील असें च मानतों.

## सूर्य-दर्शनाचें महत्त्व

सूर्योदयाच्या वेळीं निःसंशय शरीर, इंद्रियें, मन आणि बुद्धि यांत प्राणसंचार होतो. याचा ज्याला अनुभव असेल तो तर हें स्वीकार करील च. परंतु ज्याला अनुभव नसेल, तो सुद्धां कल्पनेनें समजूं शकेल. यासाठीं मला तर सूर्योदयाचा वेळ फार च महत्त्वपूर्ण वाटतो.

आम्ही जेलमधें होतों तेव्हां आमचा पुष्कळ वेळ चर्चेंत जात असे. तिथें अनेकांना आशा-निराशा अथवा अनेक तऱ्हेच्या दुःखांचा अनुभव येई. मला तसें कधीं हि झालें नाहीं. एक दिवस जेलर येऊन मला म्हणाला, "तुमचें जीवन फार च सुखमय दिसतें. कोणत्या च प्रकारचें दुःख तुम्हांला दिसत नाहीं!" मीं म्हटलें "दुःख दिसत तर नाहीं, पण आहे मात्र. आठवडाभर विचार करून तुम्ही माझें दुःख असूं तरी कोणतें शकतें, तें शोधून काढा." सात दिवसांनीं जेलर पुन्हां आला आणि म्हणाला, "मला तर कोणत्या च प्रकारें तुम्ही दुःखी आढळत नाहीं!" मीं सांगितलें "सकाळ-संध्याकाळ सूर्यदर्शन होत नाहीं, हें च माझें दुःख आहे. आणि हें दुःख नाहींसें करण्याचें साधन जेलमधें नाहीं."

## सूर्य ईश्वराचें प्रतीक

सूर्य-दर्शन फार च उत्साहप्रद आहे. आम्ही त्या निमित्तानें ईश्वराची उपासना करूं, तर चांगलें आहे. मुसलमानांत रिवाज आहे, काब्याकडे तोंड करून उपासना करावी. काबा हिंदुस्थानच्या पश्चिमेला आहे. त्यामुळें हें लोक जेव्हां उपासनेसाठीं बसतात तेव्हां सूर्याकडे पाठ करून बसतात. आणि आमच्याकडे ( जुनी मंडळी ) सूर्याकडे तोंड करून प्रार्थना करीत असत. मी कुणा संप्रदायाच्या विचारांचा निषेध नाहीं करीत. परंतु माझें हृदय त्याला अनुकूल होऊं शकत नाहीं. मला सूर्यासमान दुसरें स्फूर्तिदायक मंदिर, आश्रम अथवा काबा, कांहीं च दिसत नाहीं. असें हें विशाल आणि स्फूर्तीचें स्थान आहे. तेव्हां याला ईश्वराचें प्रतिक समजून परमात्म्याची उपासना केल्यास, बरें राहील.

## केवळ सूर्याचा च नव्हे, तारकांचा पण हृदयाशीं संबंध

दुसरा प्रश्न हा विचारला आहे कीं चिंतनाशीं सूर्योपासनेचा संबंध काय ? ह्या बाबतींत माझी ही धारणा आहे कीं सूर्यांत आणि आमच्यांत एक संबंध आहे. उपनिषदांत पण एक वाक्य येतें कीं सूर्याचीं किरणें नाड्यांच्या मार्गांनीं हृदयांत पोंचतात. सूर्य आणि हृदय यांच्यामधें एक राजमार्ग आहे आणि त्या मार्गावरून इकडून तिकडे येणेंजाणें होतें. जशीं सूर्यकिरणें हृदयापर्यंत पोंचतात त्याचप्रमाणें हृदय पण सूर्यापर्यंत जाऊं शकतें. ह्याचा अनुभव मला तर येत च असतो. केवळ सूर्याच्या बाबतींत असा अनुभव येतो असें नाहीं, तर तारकांच्या संबंधांत पण ही च गोष्ट आहे. आजपर्यंत मी रात्रीं आग्रहानें मोकळ्या आकाशाखालीं झोंपत आलों आहे. पावसाळ्यांत कांहीं वेळा खोलींत पण झोंपतों, परंतु कमी अधिक पांघरूण घेऊन बाहेर च झोंपण्याचा प्रयत्न असतो. कित्येकदां असें हि घडलें आहे कीं रात्रीं अंगावर थोडाफार पाऊस पडला पण लक्षांत आलें नाहीं. सकाळीं उठल्यानंतर पांघरूण भिजलेलें पाहिल्यावर रात्रीं पाऊस झाल्याचें लक्षांत येई. अशा रीतीनें रात्रीं आकाश-दर्शन करीत करीत निद्राधीन झाल्यावर असा पण अनुभव येतो कीं तारका आणि आपण यांच्यामधें देखील मार्ग तयार झालेला आहे.

## सत्याचें स्थान कुठें ?

तिसरा प्रश्न आहे : करुणा आणि प्रेम यांचें स्थान जसें हृदयांत आहे, तसें सत्याचें स्थान कुठें आहे ? यासंबंधीं हें मानलें पाहिजे कीं प्रेमाचें आणि करुणेचें आंतरिक स्थान हृदय आहे, पण त्यांचें बाह्य स्थान आहे ही सृष्टि. सृष्टीचें च प्रतिबिंब हृदयांत पडतें. त्याच प्रमाणें सत्य-सुद्धां सृष्टींत पसरलेलें आहे आणि त्याचें प्रतिबिंब हृदयांत उमटत असतें, जसें करुणेचें आणि सत्याचें उमटतें. प्रेम आणि करुणा यांच्या प्रमाणें सत्यासाठीं हि आंत आणि बाहेर एक च स्थान आहे. बाहेर सारें विश्व आणि आंतील हृदय—सत्याचें, प्रेमाचें आणि करुणेचें स्थान आहे.

**सत्य-मीमांसा**

'सत्येन लभ्यस्तपसा' ह्या मंत्राविषयीं मीं कांहीं सांगावें अशी मला विनंति करण्यांत आली आहे. पूर्ण मंत्र असा आहे :

**सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा**
**सम्यक् ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।**
**अंत:शरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो**
**यं पश्यंति यतयः क्षीणदोषाः ।**
**सत्यमेव जयते नानृतम् ,**
**सत्येन पन्था विततो देवयानः ।**
**ये नाक्रमंति ऋषयो ह्याप्तकामाः,**
**यत् तत् सत्यस्य परमं निधानम् ।।**

हा तसा फार च गंभीर मंत्र आहे. हा उपनिषदांतील मंत्र असला तरी तो सूर्योपासनेच्या प्रसंगीं सांगितलेला नाहीं. पण मी मात्र त्याचा उपयोग सूर्यचिंतनांत करीत असतों. **ह्येष आत्मा** हृदयांत जो आत्मा आहे, तो पण सूर्य आहे आणि हा सूर्य देखील आत्मा आहे. बाहेर ज्याप्रमाणें सूर्य-ज्योति आहे, त्याप्रमाणें च अंतरांत सत्य-ज्योति आहे. आपले पूर्वज ह्या दोन्ही ज्योतींची उपासना करीत असत. एकीकडे सूर्यप्रतीक, तर दुसरीकडे आत्म-प्रतीक ! ह्या मंत्राचा असा अर्थ करून सूर्योपासना केल्यास सत्य-प्राप्ति होऊं शकते.

आत्मप्राप्तीसाठीं जीं चार साधनें सांगितलेलीं आहेत, त्यांत 'सत्य' सर्वप्रथम आहे. आणि तें फार च महत्त्वाचें आहे. एकीकडे जगांतलें सर्व नीतिशास्त्र ठेवलें आणि दुसरीकडे सत्य, तर सत्याचें च पारडें जड भरेल. सत्य सर्वांत श्रेष्ठ नीतिधर्म आहे. बाकीचे सारे नीतिधर्म त्याच्यासमोर गौण आहेत. म्हणून च त्याला पहिलें स्थान दिलें गेलें आहे. विशेषतः आत्मप्राप्तीसाठीं तरी सत्य फार च महत्त्वाचें आहे. ह्या सत्याचा अर्थ

मनसा, वाचा, कर्मणा त्रिविध सत्य घ्यायचा आहे. केवळ वाणीचें च सत्य नाहीं. मानवजीवन सत्यावर अधिष्ठित झाल्यास निश्चितपणें आत्म-दर्शन घडेल.

दुसरें साधन 'तप' सांगितलें गेलें आहे. सत्याचें नीट आकलन होण्यासाठीं जे श्रम घ्यावे लागतात, त्याला च तप म्हणतात. मुख्यतः इंद्रियांना जर काबूंत ठेवलें जाईल तर त्यांच्या मार्फत सत्यापर्यंत जातां येते आणि तें फार सुलभ होतें. परंतु जर कां इंद्रियावर ताबा मिळवला नाहीं तर आम्ही त्यांच्या आधीन होऊन जाऊं आणि मग आमची स्थिति, घोड्यावर बसलेल्या पण लगाम हातीं न ठेवलेल्या घोडेस्वारासारखी होऊन जाईल. तपस्येंत मुख्य इन्द्रियावर ताबा मिळवणें च असतें. तदनंतर सत्य-लब्धीसाठीं जो प्रयोग करवा लागतो, त्याची पण तपांत मोजणी होते. मानवाला पुष्कळशा कल्पना सुचत असतात, आंतून स्फुरित होत असतात; परंतु त्या योग्य आहेत वा अयोग्य हें ठरवण्यासाठीं प्रयोग करावे लागतात आणि त्या प्रयोगासाठीं त्रास देखील सहन करावा लागतो. तें च तप आहे. अशाप्रकारें सत्याचा प्रयोग करणें आणि त्यासाठीं कष्ट सहन करणें च तप आहे.

तिसरें साधन आहे 'सम्यक्ज्ञान'. वस्तूच्या स्वरूपाचें आकलन होण्या-साठीं अचूक बुद्धीची अपेक्षा असते. 'अचूक बुद्धी'चा अर्थ आहे, अनासक्त बुद्धि, पूर्वग्रह नसलेली बुद्धि. असल्या ह्या पूर्वग्रहरहित बुद्धीच्या सहाय्यानें च आत्म्याचें दर्शन घडत असतें.

चौथें साधन 'ब्रह्मचर्य' सांगितलेलें आहे. इथें ब्रह्मचर्य आणि तप यांची अलग अलग मोजणी आहे. तेव्हां ब्रह्मचर्य म्हणजे मुख्यतः अध्ययन, चिंतन, मनन आदि मानलें पाहिजे. नाहींतर भिन्न साधन केलेला तपाचा निर्देश अर्थहीन होईल, कारण ब्रह्मचर्यांत तप येऊन च जातें. अशा तऱ्हेनें विचार केल्यास स्पष्ट लक्षांत येतें कीं सत्य एक नैतिक मूलतत्त्व आहे. त्याच्या जोडीला हीं तीन साधनें असतील तर च आत्म्याचें दर्शन होऊं शकेल.

अंतःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रः ज्याप्रमाणें बाहेर सूर्यनारायण उगवत असतो, त्याप्रमाणें च अंतरांत पण सूर्यनारायण उगवतो. बाहेरचा

सूर्य बाहेरच्या ढगांनीं जेव्हां झांकला जातो तेव्हां त्याचें दर्शन होत नाहीं. अगदीं तसेंच हृदयावर आवरण आल्यामुळें अंतरज्योतीचें पण दर्शन घडत नाहीं. अंतरसूर्य अत्यंत ज्योतिर्मय आहे, म्हणजे सूर्य जसा स्वयंप्रकाशी आहे, तशीच ह्यांत पण स्वयंप्रकाशता आहे.

**यतय: क्षीण दोषा:** यति म्हणजे प्रयत्नशील संन्यासी. याचा सरळ अर्थ तर 'यत्न करणारे' होतो. साधक जेव्हां क्षीणदोष होतात, तेव्हां च आत्म्याचें दर्शन घडत असतें. जोंवर दोष आहेत, तोंवर च आवरण असतें. यासाठीं आत्मदर्शनाकरतां दोष निरसन एक उत्तम उपाय आहे. अशीं हीं चार साधनें सांगितलीं गेली आहेत. यांचा उपयोग करून जर दोष क्षीण होतील तर अंतर-स्थित सूर्याचें दर्शन होऊं शकेल.

**सत्यमेव जयते नानृतम्** हीं दोन अलग अलग वाक्यें असल्यासारखीं वाटतात. परंतु दोन्ही मिळून एकच वाक्य आहे. एका बाजूनें म्हटलें आहे कीं, सत्याचा विजय होतो आणि दुसऱ्या बाजूनें म्हटलें आहे, अनृत म्हणजे असत्याचा कधीं हि विजय होत नाहीं. वर जीं साधनें सांगितलेलीं आहेत, त्यांत सत्य च मुख्य मानलेलें आहे. यांत सुद्धां त्याच सत्यावर जोर दिलेला आहे. देव-दर्शनाचा मार्ग सत्यानें आच्छादलेला आहे. 'देवयान:'चा अर्थ देवाकडे जाण्याचा मार्ग अर्थात् परमात्म्यापर्यंत पोंचण्याचा मार्ग सत्यानें च घडलेला आहे.

**येनाक्रमंति ऋषयो ह्याप्तकामा:** जे ऋषि पूर्णपणें निष्काम आहेत आणि ज्यांच्या साऱ्या कामना पूर्ण झालेल्या आहेत, ते त्या आत्म्याचें दर्शन करीत आहेत. त्यांचें प्राप्तव्य स्थान सत्य आहे, तिथें पोचण्याचा मार्ग सत्य आहे आणि त्या दर्शनानें जें प्राप्त होईल तें पण सत्य आहे. अशाप्रकारें चालण्याचें साधन, चालण्याची वाट आणि गांठावयाचें अंतिम स्थान तीन्ही सत्य आहेत. सत्याचीं हीं तीन भिन्न-भिन्न अंगें आहेत. एकंदरीत सर्व मिळून ह्या मंत्राचा हा च अर्थ आहे.

## दोषांच्या द्वारें गुणापर्यंत जावें

प्रश्न विचारला गेला आहे कीं, तुम्ही म्हणता दोष गुणांची छाया आहे, हें कसें तें समजावून सांगा. ह्याबाबतींत मी असें मानतों कीं

गुणदोषांचें पृथक्करण करणें नेहमीं कठिण असतें. एखाद्यांत एखादा विशेष गुण असेल आणि तो त्याचा विकास करील, तर तो एकांगी गुण-विकास होईल आणि त्यामुळें स्वाभाविक च दोष प्रकट होतील. कल्पना करा, एक विरक्त पुरुष आग्रही आहे तर दुसरा विवेकी. विवेकी थोडा ढिला असेल कारण विवेकांत थोडासा ढिलेपणा पण खपून जातो. अशा तऱ्हेनें ढिलेपणाचा दोष विवेकी पुरुषांत येऊन च जातो. आपण रेघोटया मारून चित्र काढतों. पण चित्र काढण्यापूर्वी कागद पांढरा च असतो. तेव्हां रेघोटयांना म्हणतां येईल गुण आणि कागद पूर्व-भूमिका. ज्याप्रमाणें पांढऱ्या कागदाच्या पूर्वभूमिकेशिवाय रेघांचें चित्र साकार होत नाहीं, त्या च प्रमाणें दोषाशिवाय गुणांचें प्रकाशन होऊं शकत नाहीं. मानवांत केवळ शुद्ध गुण च असतील, तर ते अप्रगट च राहणार. भगवान् सुद्धां शुद्ध गुणमय आहे म्हणून तो प्रगट होत नाहीं--तो अप्रगट च आहे. गुणांच्या प्रगटीकरणा-साठीं छायारूपी शरीराची गरज असते. त्यासाठीं दोष अवश्यक आहेत. म्हणून दोषांचे उपकार च मानले पाहिजेत.

माणसांत गुणांबरोबर दोष पण असतात च. आत्म्याच्या प्रकाशा-साठीं शरीर आवश्यक आहे. त्या च प्रमाणें गुणांच्या प्रकाशासाठीं दोष आवश्यक च आहेत. स्वतंत्र बाण्याचा मुलगा कुणाची आज्ञा मानायला तयार नसतो आणि आज्ञाधारक स्वतंत्र बुद्धीनें विचार करूं शकत नाहीं. तो श्रद्धावान् असतो, पण बुद्धि चालवीत नाहीं. अशाप्रकारें गुणांबरोबर दोष आणि दोषांत गुण मिसळलेले च आहेत. त्यांतील छाया कोणती आणि रूप कोणतें ह्याचा विवेक केला पाहिजे. आत्म्याचें रूप आहे गुणमय आणि दोष आहे छायारूप. दोषांचें अस्तित्व गुणांची शोभा वा सौंदर्य प्रगटीकरणा-साठीं च आहे.

अशा तऱ्हेनें आपण चिंतन करीत गेल्यास सृष्टीच्या संबंधीं अत्यंत आदरभाव उत्पन्न होतो. एखाद्यांत कोणता का दोष असेना त्याच्या त्या दोषाच्या द्वारें त्याच्या गुणापर्यंत पोंचता येतें. अशा रीतीनें दोष-दर्शनाचा गुण-दर्शनासाठीं साधन म्हणून उपयोग केल्यास, दोष नाहींसे होतील आणि गुणांत प्रवेश करण्याचें साधन हातीं येईल. ही एक विचित्र गोष्ट

मी सांगत आहें. समजा, कुणी फार प्रेमळ आहे, तर त्या प्रेमाबरोबर च काम पण उत्पन्न होण्याची संभावना असते. त्याचप्रमाणें विरक्तीबरोबर क्रोध, ज्ञानाबरोबर आग्रह आणि भक्तीबरोबर मृदुता देखील असण्याची शक्यता असते. ह्यावरून स्पष्ट होतें कीं गुणांच्यासाठीं दोष आवश्यक आहेत.

परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं दोषी व्यक्तीनें गुणांच्या साठीं म्हणून आपल्या दोषांचा संग्रह करून असावें. त्यानें तसें कधीं करूं नये. जर तो तसें करीत असेल तर तो दोषवान् च होईल. परंतु जेव्हां आम्ही दुसऱ्यांचा विचार करतों तेव्हां त्यांच्या दोषांकडे अशाप्रकारें पाहून उदार रहावें. कर्तृत्ववान् व्यक्तींत थोडाफार अहंकार हा असणार च. तेव्हां त्याकडे थोडाफार कानाडोळा करायला पाहिजे. बापू नेहमीं म्हणत असत कीं 'दुभत्या गाईची लाथ पण खावी लागते.' त्या कर्तृत्ववान् पुरुषांत अभिमान असेल तर असा विचार करावा कीं 'जर याच्यांत इतका अभिमान न राहता, तर इतकें कर्तृत्व च राहिलें नसतें. तेव्हां हा जो अहंकार आहे, तो योग्य च आहे. याच्यानें कांहीं नुकसान होणार नाहीं. त्याचा हा अहंकार घालवण्याचा योग्य प्रयत्न अवश्य करायला हवा, पण जर तो टिकला च, तर त्याला क्षमा केली पाहिजे.

## साम्यं समाधानम्

'साम्ययोगांत जीवन-धारणेसाठीं समता कशाप्रकारें आणावी,' या गोष्टीचा विचार करतांना हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं समतेच्या बाबतींत विवेक करणें अति आवश्यक आणि महत्त्वपूर्ण आहे. बापू देखील समतेचा आग्रह ठेवीत. त्यांनीं व्हाइसरॉयला पण लिहून टाकलें होतें कीं 'वीस हजार रुपये पगार घेणें तुम्हांला शोभते का? तुमच्या आणि साधारण जनतेच्या पगारांत असलेली ही पराकाष्ठेची विषमता कोणत्या हि प्रकारें सहन करणें शक्य दिसत नाहीं.'

हल्लीं निरनिराळ्या देशांच्या मध्यें स्थूल तुलना करीत असतात. सांगत असतात कीं अमुक अमुक देशांत जास्तीत जास्त उत्पन्न आणि कमीत कमी उत्पन्न यांत पन्नास किंवा चाळीस पटीचें अंतर आहे. इतकें

अधिक अंतर असता कामां नये, दहाचें अंतर चालून जाईल. अशाप्रकारें स्थूल रीतीनें हिशोब करण्याची एक संवय च लागली आहे. खरें म्हणजे ही चांगली गोष्ट नाहीं. मला कुणी विचारलें कीं तुम्हांला दहा टक्यांचें अंतर मान्य नाहीं का? तर मी हें च म्हणेन कीं मला जें हवें आहे तें मिळावें. कुणापेक्षां दहा अधिक कां म्हणून? ही दहापटीची कल्पना पण चुकीची आहे. पृथ्वीवर अशी समृद्धता व्हायला हवी कीं ज्याला जेवढें हवें असेल, तितकें मिळावें. आणि दुसऱ्याजवळ जरी कांहीं असलें तरी त्याची आपल्याला गरज पडूं नये. शिवाय त्या माणसानें पण स्वतःजवळील त्या अधिक वस्तु ट्रस्टी (विश्वस्त) या नात्यानें आपल्या जवळ ठेवाव्यात, मालक म्हणून नाहीं.

आम्ही जर संपूर्ण समतेचा आग्रह ठेवूं तर त्यांतून लाभापेक्षां हानि च होण्याची अधिक शक्यता राहील. सृष्टींतील वैविध्य नष्ट करून जर एकतेचा अनुभव येत असेल, तर तो अद्वैताचा अनुभव म्हणता येणार नाहीं. आमच्या कार्यकर्त्यांत जयप्रकाशजींच्या सारखे किती तरी जण आहेत कीं ज्यांचें जीवन-मान इतरांपेक्षां थोडें वरचें आहे. लोकांना हें बरें वाटत नाहीं. त्या मंडळींचा आपल्या स्वतःचा कांहीं खर्च कमी करण्याचा प्रयत्न देखील असतो, पण ते त्यांना जमत नाहीं. तेव्हां दुसऱ्यांच्या हें लक्षांत यायला हवें कीं आमच्यांतील अमक्या अमक्याला पूर्वीपासून च अमुक अमुक संवय आहे. त्याची शारीरिक स्थिति पाहतां अधिक समता आणण्याचा प्रयत्न ते करतील तर तें योग्य होणार नाहीं. आम्ही आपल्या घरीं सुद्धां असें करीत नाहीं. घरांत परस्परांचें परस्परां-वर प्रेम असतें, परंतु सर्वांसाठीं सर्व कांहीं समान असतें असें नाहीं. घरीं आम्ही सर्व कांहीं समाधानपूर्वक च करीत असतों. ह्यासाठीं मीं एक सूत्र च बनवलें आहे 'साम्यं समाधानम्.' ज्यांत सर्वांचें समाधान आहे, तें च साम्य. घरीं लहान मुलांना अधिकार नसतो, कर्तव्य च असतें. आईवडील च प्रमुख असतात. पण पुढें जेव्हां ते म्हातारे होतात आणि मुलें कर्तीं होतात तेव्हां पूर्वीचीं मुलें च प्रमुख बनतात आणि त्यांच्याच बुद्धीनें घरांतील सर्व व्यवहार चालतात. अशा रीतीनें कधीं पिता प्रमुख,

तर कधीं पुत्र प्रमुख बनतो. दोघांत प्रेम तर असतें च, यासाठीं सृष्टींत प्रेमामुळें जें कांहीं करावें लागेल, त्यानें साम्ययोगांत कोणत्या हि प्रकारची बाधा येत नाहीं. परंतु जर कां आम्ही गणिती साम्ययोग आणण्याचा यत्न करूं तर जगांतील आनंद च नाहींसा करून टाकूं.

नवावास (बनासकांठा)
४-१-'५९.

---

## ब्रह्मविद्येच्या विकासानें च आम्ही टिकूं : २५ :

ह्यावेळीं मी आंतून फार बेचैन आहे. घर सोडण्याच्या वेळीं जशी बेचैनी होती, तशी च ह्यावेळीं पण आहे. त्यावेळीं मला ब्रह्मविद्येचा ध्यास होता. तिच्या प्राप्तीसाठीं घर त्यागलें पाहिजे, शाळा सोडली पाहिजे असें आंतून सारखें वाटत होतें. आणि शेवटीं १९१६ त सर्व कांहीं सोडून मी बाहेर पडलों च. आतां ती चिंता मला नाहीं. तिचें समाधान जितकें होऊं शकलें असतें, तितकें झालें आहे. पण आतां मी जो बेचैन आहे त्याचें कारण ब्रह्मविद्येच्या अभावीं आपला सारा सर्वोदय-विचार कोलमडणार, ह्या जाणिवेनें हल्लीं मी बेचैन आहें. आम्हांला सर्व तऱ्हेनें सरकारी मदत मिळेल, परंतु ती जितकी अधिक मिळेल तितका च 'सर्वोदय-विचार' पंगु होत जाणार. ह्याचा अर्थ असा नाहीं कीं नयी तालीम आणि दुसऱ्या कामाकरता सरकारची मदत मिळूं नये. मदत अवश्य मिळावी, इतकें च काय पूर्ण सरकार च सर्वोदयाचें बनावें. परंतु सरकारी मदत आत्मसात करण्यासाठीं आपली बाजू पण तशी मजबूत हवी. नाहींतर आम्हांला ज्या प्रमाणांत मदत मिळत जाईल, त्याप्रमाणांत आम्ही शिथिल होत जाऊं. रचनात्मक कार्यासंबंधींच्या जितक्या कांहीं गोष्टी हल्लीं ऐकण्यांत येतात, त्यांना कांहीं बैठक असल्याचें मला दिसत नाहीं.

## वाणींत आणि कृतींत ऐक्य हवें

येशू ख्रिस्त म्हणाला होता कीं 'लव्ह दाय नेबर एज दाय सेल्फ'-- आपल्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणें प्रेम करा. बोलतांना अगदीं सहज च असले उद्‌गार आपण काढतों; परंतु त्यावर जेव्हां विचार करूं लागतों तेव्हां लक्षांत येतें कीं जोंवर आम्ही आपल्या मूळस्वरूपाचा छडा लावणार नाहीं तोंवर आमच्यांत हें उतरणार नाहीं. तसें तर अनेक कारणांनीं शेजाऱ्यावर प्रेम करणें नेहमीं फायद्याचें असतें. म्हणून आम्ही तें करूं च. परंतु येशूनें हें जें सांगितलें तो फार गहन विषय आहे. त्या दृष्टीनें आम्ही स्वतःला चांचपडूं तर लक्षांत येईल कीं आम्ही वरवर ज्या समानतेच्या कांहीं गोष्टी करीत असतों, त्या अगदीं च तकलुपी आहेत. आंतून जोंवर 'आम्ही एक च आहोंत- भिन्नभिन्न आकार दिसत असले तरी वस्तु एक च आहे' अशी अनुभूति येत नाहीं तोंवर ह्या वरच्या एकतेनें कांहीं साधणार नाहीं. आम्ही प्रार्थना करतों, त्यांत सुद्धां कांहीं फायदा आहे. प्रार्थनेमुळें आमच्यांत कांहीं सुधारणा पण होत असतात. असें असलें तरी त्यांत भक्तीनें हृदय द्रवित होत असल्याची गोष्ट आढळत नाहीं. आम्ही आजाऱ्याची सेवा करतों-जगांत अन्यत्र होत असलेल्या सेवेपेक्षां पुष्कळ चांगली सेवा आम्ही करतों. पण त्यांत सुद्धां आमचें एक ठरलेलें क्षेत्र असतें. त्या मर्यादेंत आम्ही काम करतों. आमच्या संस्था सुद्धां इतक्या शुष्क असतात कीं त्यांत हि आत्मतत्त्वाचा अंश आढळत नाहीं. नयी तालीम, खादी-ग्रामोद्योग इत्यादींत सारें वरवरचें 'टेकनिक्' च दिसून येतें. नयी तालीमशीं कायकाय जोडलें पाहिजे या संबंधीं अनुभव सांगितले जातात; परंतु ज्ञाना-कर्माला अगदीं एकरूप करण्याची जी मुख्य गोष्ट, ती होत च नाहीं.

## दृष्टींत मौलिकतेचा अभाव

या साऱ्याचा भावार्थ हा च कीं बापूंनीं आमच्या समोर अशा कांहीं गोष्टी ठेवल्या कीं ज्या आध्यात्मिक क्षेत्रांत च मांडल्या जाऊं शकल्या असत्या, अन्यत्र नाहीं. अहिंसा, सत्य, अस्तेय इत्यादि पांच यमाबरोबर आणखी कांहीं वस्तु जोडून त्यांनीं एकादश व्रतें आम्हांला दिलीं. ही

कल्पना नवी नाहीं, आहे जुनी च; परंतु समाजसेवेच्या कार्यांत व्रतांची गरज आहे, ही गोष्ट बापूंनीं च प्रथम मांडली. पूर्वी ह्या गोष्टी आध्यात्मिक उन्नतीसाठीं आवश्यक मानल्या जात असत. योगी साधक आध्यात्मिक विकासासाठीं यमनियमांचें पालन करीत असत. पतंजलीनें ह्याच गोष्टी सांगितल्या आहेत. बुद्ध, महावीर, पार्श्वनाथ आदींनीं पण ह्यावर लिहिलें आहे. भक्तांनीं साऱ्या जगभर ह्याचा विकास केला. परंतु ह्या साऱ्या गोष्टी समाज-सेवेसाठीं गरजेच्या आहेत, त्यांच्याशिवाय समाज-सेवा होऊं शकत नाहीं, हा सिद्धांत प्रथम मला बापूंच्या आश्रमांत च आढळला. माझ्यासाठीं नवीन अशी ह्यांत कोणती च गोष्ट नव्हती. लहानपणापासून च मी व्रत-पालनाचा प्रयत्न करीत असें. परंतु तिथें जो उद्देश होता, तो विशेष होता. बापूंनीं आमच्या समोर विश्वहिताशीं अविरोधी अशा भारतमातेच्या सेवेचा उद्देश ठेवला आणि त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं आम्ही एकादश-व्रतांचें पालन करतों असें सांगितलें. ही वस्तु आम्हांला अन्यत्र कुठें आढळली नाहीं. बापूंनीं त्याच्या जोडीला आश्रमचा कार्यक्रम आणि कर्माच्या विविध शाखा आम्हांला दाखवल्या. अशा तऱ्हेनें देशसेवेच्या एका मूळ उद्देशासाठीं--जो विश्वहिताशीं अविरोधी आणि विश्वहिताशीं निगडित आहे--साधकांच्या जीवननिष्ठेचें प्रतीक म्हणून 'आर्टिकल ऑफ फेथ'--एकादश व्रतें--आणि त्यासाठीं दिनचर्या, त्यांच्या पूर्तीसाठीं शेती, गोशाळा, खादी आदींचा पूर्ण कार्यक्रम बापूंनीं आमच्या समोर ठेवला. ह्या बाह्य प्रवृत्तींतील जितक्या आम्हांला झेपतील, तितक्या प्रवृत्ति आम्ही करीत असतों. विश्व-हिताशीं आमचा विरोध होऊं नये अशी आमची इच्छा असते. पण ह्या साऱ्या पसाऱ्यांत मूळ वस्तु लोपून जाते. ह्याचा अर्थ असा नाहीं कीं आम्ही सत्य, अहिंसा इत्यादि मानीत च नाहीं. मुख्य, ती मूळ वस्तु आमच्यांत विकसीत होत आहे कीं नाहीं, इकडे आमचें लक्ष नसतें.

## साधनेचा आधार

आम्ही पाहतों कीं बापूंच्या आणि इतरांच्या पण जीवनांत कांहीं आध्यात्मिक प्रश्न होते. त्या प्रश्नांचें समाधान झाल्याशिवाय ते पुढें सरकले नाहींत. येशू ख्रिस्ताचें जीवन केवळ ३३ वर्षांचें ! आणि त्यांतील तीन च

वर्षें ते फक्त पॅलेस्टाईनमधें, म्हणजे हिंदुस्थानच्या दोन तीन जिल्हे एवढ्या प्रदेशांत हिंडले. पण आज त्यांच्या विचारांचा प्रभाव साऱ्या जगावर आहे. ख्रिस्ती लोकांच्या संस्थांना तशी किंमत नाहीं; पण येशू ख्रिस्ताचा जो प्रभाव आहे तो मी सांगून राहिलों आहे. सुरुवातीचीं तीस वर्षें येशू ख्रिस्तांनीं काय केलें हें माहीत नाहीं. सांगितलें जातें कीं ते सुतारीचें काम करीत असत. पण त्या काळांत त्यांनीं उपवास केले आणि सैतानाशीं त्यांची गांठ पडली, ह्याहून अधिक कोणती साधना केली ह्याची आम्हांला कांहींच माहीती नाहीं. आतांतर इथपर्यंत सांगितलें जातें कीं ते तिबेटपर्यंत आले होते. सार हें कीं कांहीं मूलभूत आध्यात्मिक प्रश्न होते, त्यांचें समाधान झाल्यावर च ते बाहेर पडले. 'लव्ह दाय नेबर ॲज दायसेल्फ' ह्या वाक्यांत त्यांनीं शत्रूवर प्रेम करण्यासंबंधीं जें ठासून सांगितलें आहे, तें अनुभवाशिवाय शक्य नाहीं. अशा च प्रकारें बुद्ध भगवानांनीं 'यज्ञांत हिंसा नको' हा प्रश्न हातीं घेतला आणि उत्तर-प्रदेशाच्या १२-१४ जिल्ह्यांतून हिंडले—हें तर आम्हा सर्वांना माहीत च आहे. परंतु जेव्हां त्यांनीं तपस्या केली तेव्हां काय काय केलें हें कुणाला माहीत नाहीं. ते किती मंडळांत गेले, किती पंथ हिंडले, ध्यानाचे किती प्रकार त्यांनीं अजमावून पाहिले आणि ह्या सर्वांचा परिणाम म्हणून त्यांच्या चित्ताला कशी शांति मिळाली आणि जगांत 'मैत्री' आणि 'करुणा' हे च दोन शब्द आहेत ह्याचा निर्णय कसा झाला—ह्या सर्वांची आम्हांला माहिती नाहीं.

### ईश्वर-दर्शन सुद्धां शक्य

आप बापूंची आत्मकथा वाचतों, तेव्हां त्यांत याचें अंधुकसें दर्शन होतें. रायचंदभाईंच्या बरोबर त्यांचा जो संवाद झाला, तो पण आपल्याला माहीत आहे. परंतु त्यांच्या मनांत आध्यात्मिक शंका होत्या आणि त्यांचें निरसन झाल्याशिवाय ते कामाला लागले नव्हते. 'मिस्टिक एक्सपिरि-यन्सेस' (आत्मिक अनुभवा) शिवाय बापू सेवेला लागले नव्हते. ते म्हणत असत कीं सत्य ईश्वर आहे. त्यामुळें लोकांना वाटे कीं ही वैज्ञानिक गोष्ट आहे. पण ती केवळ वैज्ञानिक गोष्ट नाहीं. मी त्यांच्याशीं ह्या विषयावर

बोललों होतों. खान अब्दुलगफारखानांच्या मदतीला जाण्याची गोष्ट चालली होती. तेव्हां त्यांना वाटत होतें कीं आतां बहुधा परत येणें होणार नाहीं. म्हणून ते मला म्हणाले, "तुझ्याशीं गोष्टी करायच्या आहेत." मी प्राय: त्यांच्याकडे जात नसे. त्यामुळें त्यांना वाटलें कीं हा कांहीं बोलावल्याशिवाय येणार नाहीं. पंधरा दिवस गोष्टी होत राहिल्या. सुरुवातीचे दोन तीन दिवस ते प्रश्न विचारीत गेले आणि मी उत्तर देत गेलों. पुढें एक दिवस मीं ईश्वरानुभवाचा विषय काढला : "सत्य ईश्वर आहे, असें जें तुम्ही म्हणता तें ठीक आहे. पण उपवासाच्या काळांत तुम्ही म्हणाला होता कीं 'आंतून आवाज ऐकूं आला', ही काय वस्तु आहे ? ह्यांत काय जादू आहे ?" ते म्हणाले "हो ती वस्तु आहे खरी ! ती कांहीं साधारण वस्तु नाहीं. मला स्पष्ट आवाज ऐकूं आला. कोणी माणसानें बोलावें तसेंच ऐकूं आलें. मी विचारीत गेलों. 'मीं काय करावें ?' ते म्हणाले– 'उपवास केला पाहिजे.' मीं विचारलें 'किती दिवसांचा उपवास करावा ?' तेव्हां ते म्हणाले, 'एकवीस दिवसांचा.' " म्हणजे ह्यांत कुणी विचारणारा होता आणि दुसरा उत्तर देणारा होता. अगदीं कृष्णार्जुनासारखा संवाद होता. बापू तर सत्यवादी होते. त्यामुळें ह्यांत कांहीं चुकीची शक्यता नाहीं. ते म्हाणाले, "मला प्रत्यक्ष ईश्वरानें गोष्ट सांगितली." तेव्हां मीं विचारलें, "ईश्वराचें कां रूप असूं शकते ?" त्यानीं उत्तर दिलें, "रूप तर असूं शकत नाहीं. पण मी आवाज निश्चित ऐकला खरा." ह्यावर मी म्हणालों, "रूप अनित्य आहे, तर आवाज देखील अनित्य आहे. आवाज जर ऐकूं आला असेल तर रूप कसें दिसलें नाहीं ?" त्यानंतर मीं त्यांना कांहीं माहिती दिली. जगभरांतील आत्मिक अनुभव आणि स्वत:चे पण अनुभव समोर मांडून म्हटलें, "ईश्वर दर्शन कां होऊं शकणार नाहीं ? तुमच्या मनांत प्रश्नोत्तरें चाललीं, त्याचा ईश्वराशीं संबंध आहे ना ?" ते म्हणाले, "हो, त्याच्याशीं संबंध आहे. मीं आवाज ऐकला. पण मला दर्शन झालें नाहीं. मी रूप पाहिलें नाहीं. त्याचा शब्द ऐकूं आला, परंतु त्याच्या रूपाचा अनुभव मला आला नाहीं. साक्षात् दर्शन मला झालें नाहीं. पण तसें दर्शन घडूं शकतें."

## कर्म-निरपेक्ष होऊन कर्म करावें

हें सारें मीं एवढ्यासाठीं सांगितलें कीं आम्ही जीवनाच्या गाभ्यांत उतरत नाहीं, वरच्या स्तरावर च सारा व्यवहार चालवितों. मला ह्याकडे च तुमचें लक्ष वेधायचें आहे. मी पुन्हांपुन्हां सांगत असतों कीं गांधीजींनीं राजनीति नाहीं चालविली. त्यांनीं जें कांहीं काम केलें ती लोकनीति होती; कारण ते जनतेला उभे करण्याचा यत्न करीत असत. स्वराज्यप्राप्तीपूर्वी झालेलें काम लोकनीतीचें होतें, राजनीतीचें नव्हे. त्यांचे कांहीं सहकारी राजनीतींत आहेत. परंतु ते खास च जुनी राजनीति नाहीं चालवीत. त्यांच्यांत आणि दुसऱ्या राजनीतिज्ञांच्यांत कांहीं फरक आहे, पण तो तसा फार मोठा फरक नाहीं. त्यांचे कांहीं सहकारी राजकारणांत गेले आणि दुसरे कांहीं ग्रामोद्योगांत, खादीकार्यांत गेले हें सारें इतकें स्थूल आहे कीं ज्यांना आम्ही आमच्या बरोबर घेतों, त्यांचा पण नाइलाजानें, कर्म-प्रधान बनून, संग्रह करतों; आणि मग धडपड करीत राहतों कीं त्यांना आपल्या सिद्धांताचा स्पर्श व्हावा. परंतु ज्यांना विचार पसंत आहे, अशांनीं कर्मनिरपेक्ष होऊन एकत्र यावें आणि कर्माची गरज निर्माण झाल्यावर कर्म सुरू करावें, असा प्रयत्न करीत नाहीं. आध्यात्मिक निष्ठेनें ५-६ जणांनीं एकत्र यावें आणि मागाहून कर्म सुरू करावें असें करण्याऐवजीं आम्ही प्रथम कर्माला हात घालतों आणि मग माणसांचा शोध सुरू करतों. थोडक्यांत सारें काम कर्म-प्रधान असतें. ह्या साऱ्या प्रकारामुळें मी बेचैन आहें. ईश्वराच्या अस्तित्वाचें भान नसतें तर मी यांत पडलों असतों असें खात्रीनें मी म्हणूं शकत नाहीं. मला हें सांगावें च लागतें कीं ईश्वराचें दर्शन होतें, साक्षात्कार होतो, स्पर्श होतो; अन्यथा विकारांचा नाश अशक्य आहे. त्याच्या दर्शनाशिवाय काम चालत राहील अशी शक्यता दिसत नाहीं. तसें तर मी नास्तिकांना पण आत्मसात करून घेतों. सार्वजनिक स्थूल कार्याचा संबंध आहे तिथपर्यंत नास्तिक पण निभून जातो. परमेश्वराचें नास्तिक सुद्धां एक रूप आहे, असें म्हणून मी नास्तिकांना पण आपलेसें करतों. अशानें अलिप्त राहतों, माझी प्रगति होते.

## अणु-युगांत सत्याग्रहाचें रूप

सत्याग्रह ही कांहीं शक्ति आहे कीं नाहीं, हा माझ्यासमोर प्रश्न आहे. आपल्या साऱ्या कामांचा सारभूत शब्द जर कांहीं असेल, तर तो 'सत्याग्रह' आहे. तसा हा शब्द मला तितकासा पसंत नाहीं. कारण त्यांत जो 'आग्रह' शब्द आहे, तो ठीक नाहीं. तरी पण हा शब्द रूढ झाला आहे म्हणून वापरतों. आज माझ्यासमोर प्रश्न आहे कीं अण्वस्त्रांच्या या युगांत सत्याग्रहाचें रूप काय राहील ? अणु-अस्त्रवाल्यांच्या हातीं आज एक व्यापक हत्यार आहे. त्याच्या उपयोगानें ते घरबसल्या जगाचें वातावरण कलुषित करूं शकतात, जगाचा नाश करूं शकतात. परंतु आमच्यापाशीं अशी कोणती शक्ति नाहीं कीं जिच्या उपयोगानें आम्ही जगाचें वातावरण निर्मळ करूं शकूं. अशी शक्ति आम्हांला हवी आहे. समोरचा माझ्या डोळ्याकडे पाही, माझी वाणी ऐके तेव्हां माझ्या दृष्टीचा आणि शब्दांचा त्याच्यावर परिणाम होई, असें आजपर्यंत चाललें होतें. पण आज तर दर्शनाची आणि शब्दांची गोष्ट च राहिली नाहीं. घरबसल्या देखील बाँब फेकला जाऊं शकतो. त्याच्यापुढें सत्याग्रह चालणार नाहीं. अशा स्थितींत सत्याग्रहाचें रूप राहील कोणतें, ह्यावर आम्हांला विचार करावा लागेल. गांधीजी गेल्यानंतर हिंदुस्थानांत सत्याग्रहाचे जे प्रकार चालले, त्यांत एक 'उपवास' देखील आहे. पूर्वीं कुठें उपवास सुरू झाला तर अनुकूल प्रतिक्रिया होत असे. पण आतां उपवासासंबंधीं ऐकताच कांहीं चुकीचें होऊन राहिलें आहे, अशी प्रतिक्रिया होते. अशा तऱ्हेनें आम्ही सत्याग्रहाचें अशुद्धिकरण करून टाकलें आहे. सत्याग्रह, मग तो भला हि सौम्यतर असो, एक वजन टाकण्याचा च प्रकार झाला आहे. परंतु विज्ञाना-समोर तुमचा हा प्रकार टिकेल कसा ?

## तालीम तंत्र नाहीं, मंत्र होऊं दे

असें हें सगळें चिंतन केल्यावर वाटूं लागतें कीं उद्योगाच्या द्वारें तालीम (शिक्षण) देण्याचा विचार अगदीं च स्थूल आहे. मी सुरुवातीला च म्हणालों होतों कीं नयी तालीमचें ध्येय आहे--गुण-विकास. केवळ उद्योगाच्या द्वारें शिकवणें नाहीं. पुस्तकांच्या सहाय्यानें शिकवणें एकांगी

आहे. परंतु आपला मूळ उद्देश आहे--गुण विकास. मग ह्या गुण-विकासासाठीं उपजीविकेच्या दृष्टीनें उद्योगाचें शिक्षण, मानसिक विकासासाठीं चिंतन, ध्यान, भक्ति, उपासना इत्यादि सर्व येतें. मूळ उद्देश जर आत्म-विकास, गुण-विकास, नसेल तर नयी तालीम, फ्रोबेल, मॉंटेसरी इत्यादीं-प्रमाणें एक 'टेकनिक्' बनून जाईल. मला विचारतात कीं मॉंटेसरीची पद्धत आणि तुमची पद्धत यांत फरक काय ? मॉंटेसरींत एखाद्या खेळाप्रमाणें चालत असतें. ती निरुपयोगी आहे असें मला म्हणायचें नाहीं. तींत पण पुष्कळ संशोधन झालेलें आहे. परंतु गांधोजींनीं आम्हांला सांगितलें होतें कीं आईच्या पोटांत मूल असतें तेव्हांपासून स्मशानांत जाईपर्यंतचें पूर्ण जीवन नयी तालीम आहे. ह्यामुळें आम्ही जर नयी तालीमचें सरकारी तंत्राप्रमाणें एक तंत्र बनवूं तर शुष्क होऊन जाऊं. मग तंत्र च तंत्र राहील, त्यांतून मंत्र निघून जाईल.

## मला स्वतःबद्दल असमाधान

हें सारें पाहून माझा जीव घाबरून जातो. हल्लीं कधीं कधीं मी कठोर पण बोलून जातों; तसें मी बहुधा बोलत नसे. ह्याचें कारण हें च कीं मला स्वतःचें असमाधान आहे. माझी यात्रा ब्रह्मविद्येची यात्रा व्हावी, पण ती होत नाहीं. इकडे खेड्याखेड्यांत लोकांनीं फार मोठ्या संख्येनें शांतिसेनेंत नांवें दिलीं, दान पण दिलें. लोक आम्हांला म्हणाले-"तुमची ही जी यात्रा चालली आहे, अशा प्रकारची यात्रा काश्मिरमधें पहिल्या-प्रथम शंकराचार्यांनीं च केली होती." जेव्हां लोक असें म्हणाले, तेव्हां माझ्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली. तसे तर इथें आणखी कितीतरी यात्री आले असतील. परंतु एक सामाजिक मिशन आणि आध्यात्मिक क्रांतीचा संदेश घेऊन सर्वसाधारण जनतेपर्यंत पोंचणारी अशी यात्रा, प्रथम शंकराचार्यांची च झाली. ह्या गोष्टीचें स्मरण करून लोक शंकराचार्यांशीं माझी तुलना करतात, तेव्हां माझ्यावर फार मोठी जबाबदारी येते. त्यांची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते आणि वाटूं लागतें कीं लोक माझ्या-संबंधीं काय काय विचार करीत असतील !

### तीन आवश्यक सूचना

आमचीं सारीं कामें एक मूलभूत फरक अपेक्षीत आहेत. (१) मिळालेल्या ग्रामदानीं गांवांपैकीं कांहीं निवडून, त्या ठिकाणीं आम्हांला पूर्ण प्रयोग करायला हवा. अशा प्रयोगांत नयी तालीमचें स्वरूप काय राहील, ह्यावर विचार करण्याचें आपण योजलें पाहिजे. (२) शांतिसेना उभी करणें. शांतिसेनेचें सर्व काम नयी तालीमचें आहे, हें लक्षांत घेऊन आम्ही तें उचललें तर एक मोठा समुदाय आम्हांला अनुकूल होईल. (३) आमचीं जेवढीं कामें चाललीं आहेत, त्यांत वरील विचारांचा प्रवेश कसा करता येईल, ह्याचा आम्हांला विचार करावा लागेल.

या तीन मुख्य गोष्टी आहेत. त्याच्या जोडीला राष्ट्रव्यापी दृष्टीनें शिक्षणाला कसें रूप द्यावें लागेल ह्यावर पण विचार करावा लागेल आणि ह्याकरिता सारें राष्ट्र अनुकूल करावें लागेल. मीं जी ब्रह्मविद्येची गोष्ट सांगितली, तिचा कांहीं कार्यक्रम बनवता येत नाहीं. तरी देखील विचार केल्यास आम्हांला कांहीं ना कांहीं मार्ग अवश्य सांपडेल. कारण, हें तर गृहीत आहे कीं शेवटीं ब्रह्मविद्येच्या विकासानें च आम्ही टिकूं शकूं.

जम्मू (काश्मिर)
८-६-'५९.

---

## राजकारण + विज्ञान = सर्वनाश<br>अध्यात्म + विज्ञान = सर्वोदय

: २६ :

हें युग विज्ञानाचें आहे. ह्या युगांत आतां राजकारणांत कांहीं त्राण राहिलेला नाहीं. मानवाच्या हातीं नवीन नवीन उपकरणें पडलेलीं आहेत. अशा वेळीं जर फूट आणि भेद वाढवणारी राजनीति विकसेल तर मानवाचा नाश होऊन जाईल. पार्टीवाल्यांच्या, पक्षवाल्यांच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहीं हें त्यांचें अज्ञान आहे. जर का आमच्यांतील भेद वाढीला

लागले तर स्थिति अशी आहे कीं, आजची नवीन नवीन शोधलीं जाणारीं हत्यारें अशीं भयानक आहेत कीं, त्यांच्यामुळें साऱ्या जगाचा एक दिवस नाश होण्याची पाळी पण येऊं शकते. म्हणून शाहण्या लोकानीं राजकारण बाजूला सारून अध्यात्मानें आपले प्रश्न सोडवण्याची आवश्यकता आहे. खेळीमेळीची, एक करणारी राजनीति हवी. आजवर जो राजनीति होती ती जोडणारी नाहीं, तोडणारी च राहिली. म्हणून मी 'राजकारण, राजनीति' शब्द च वगळीत असतों.

## शेवटीं अध्यात्म च मार्ग

जोंवर तुम्ही अध्यात्माचा मार्ग सोडून राजकारणाचा मार्ग पत्कराल, तोंवर तुमचे प्रश्न सुटणार नाहींत. अल्जेरिया, कोरिया, तिबेट, ताइवान (फार्मोसा), इंडोनेशिया, काश्मोर--असे कितीतरी प्रश्न आहेत ! जुने प्रश्न तसे च कायम आहेत आणि नवीन तर उद्‌भवत च आहेत. तेव्हां राजकारणांनीं तुमचे प्रश्न सुटणार नाहींत. माझें हें म्हणणें पार्टीवाल्यांपैकीं कांहींच्या लक्षांत येतें. ते अध्यात्माचें नांव हि घेतात. अध्यात्माचें नांव सर्वांना प्रिय आहे तसें त्यांना पण प्रिय होतें. म्हणून ते त्याचा स्वीकार करीत. परंतु कबूल करून हि ते पुन्हां पुन्हां आपल्या-जुन्या वळणावर च जात.

## मी पक्षीय राजकारणाच्या विरुद्ध

आज सगळीकडे पक्षाच्या गोष्टी चालल्या आहेत. नवीन नवीन पार्ट्या बनत आहेत, जुन्या पक्षांना मजबूत करणें चाललें आहे. परंतु राजकीय पक्षांनीं हें काम होणारें नाहीं. त्यासाठीं असा एक स्वतंत्र समाज हवा जो पक्षपातरहित होऊन जनसेवा करील. तुम्हांला माहीत च आहे कीं यावेळीं मीं आपला आवाज ह्या पक्षीय राजकारणाच्या विरुद्ध काढला आहे. त्याच्यासाठीं खेड्याखेड्यांतून एकोप्याची शक्ति उभी करावी लागेल. सत्ता विकेंद्रित करावी लागेल. आपली सारी शक्ति अध्यात्माच्या दिशेनें लावावी लागेल आणि चित्तक्षोभ निर्माण न करता–चर्चा करून–प्रश्न सोडवावे लागतील. मी ही एक नवीन वस्तु सांगत आहें.

जयप्रकाशनारायण, केरळचे केलप्पनजी, बिहार काँग्रेसचे एक प्रमुख नेते वैद्यनाथबाबू आदि आपले आपले पक्ष सोडून ह्या कामीं लागले आहेत. अशीं कांहीं नांवें माझ्याजवळ असलीं तरी कांहीं नांवें अशीं पण आहेत कीं ज्यांना मी समजावूं शकलों नाहीं. परंतु मला आश्चर्य वाटतें तें ह्याचें कीं एवढे तरी लोक माझें म्हणणें कसें समजूं शकले ! माझें म्हणणें कुणाच्या लक्षांत येत नाहीं, त्याचें मला आश्चर्य वाटत नाहीं. आश्चर्य वाटतें तें ह्याचें कीं थोड्यांच्या कां होईना पण ही गोष्ट लक्षांत येते. कांहीं जण असें आहेत कीं ज्यांना माझें म्हणणें जवळजवळ लक्षांत येते. परंतु त्यांचे स्वतःचे आपले विचार असतात. समजावणें माझें काम. त्यातून निष्पत्ति काय झाली याची चिंता मी करीत नाहीं. फळ सोडणें, त्याचा त्याग करणें मी गीतेपासून शिकलों आहें. परिणाम परमेश्वरावर सोडून मी मोकळा होतों. मी त्याची चिंता करीत नाहीं. किती जणांना माझें म्हणणें पटतें कितींना नाहीं, हें पाहत बसणें माझें काम नाहीं. समजावणें आणि लोकांची सेवा करणें माझें कर्तव्य आहे आणि तें च मी करीत असतों.

## जनशक्ति निर्माण करा

पार्टीवाले लोक सुद्धां चांगल्या आणि खऱ्या भावनेनें सेवा करूं इच्छितात, पण ते करूं शकत नाहींत. एक पक्ष सेवा करायला लागतो तर दुसरा पक्ष त्यांच्याकडे साशंकपणें पाहूं लागतो. दुसरा पक्ष सेवा करतो तेव्हां पहिला संदेहाच्या दृष्टीनें पाहतो. अशा प्रकारें साशंक राहण्याचा परिणाम हा होतो कीं ज्यांची सेवा व्हायला हवी, त्यांची होत नाहीं. सरकार थोडी सेवा करते, परंतु तेवढ्यानें जनशक्ति निर्माण होत नाहीं. जनतेची शक्ति प्रगट होत नाहीं, ही फार मोठी उणीव आहे. पश्चिमेकडून जें राजकारण आलें, त्यानें आम्हांला तोडलें. पूर्वींपासून च इथें भेद, गट होते. पश्चिमेच्या राजनीतीनें ते आणखी वाढले. धर्मांचे भेद, भाषा-भेद, जाति-भेद--अशा तऱ्हेचे किती तरी भेद इथें अगोदर होते च. ते ह्या राजकारणानें आणखी वाढले. निरनिराळे पक्ष बनले. भेदांत वृद्धि झाली. प्रत्येक पक्षांत महत्त्वाकांक्षी लोक असतात. ते देखील आपापले गट बनवतात. एकेका मन्त्र्याचा आपला आपला गट असतो. अनेक पक्ष,

त्यांत एकेका पक्षांत भिन्न-भिन्न गट, त्या गटांत पुन्हां उप-गट ! परिणाम हा होतो कीं देशांत शक्ति निर्माण होत नाहीं.

### लष्कराचा राजकारणावर पगडा नको

पाकिस्तानांत अयूब आला आणि तत्काळ सर्व राजकीय पक्ष संपुष्टांत आले ! पक्षांच्या कचेऱ्यांना कुलुपें लागलीं ! याचा अर्थ सामर्थ्या-पुढें राजकारणाचें कांहीं चालत नाहीं. 'मॉडर्न मशिनाइज्ड आर्मी' ज्यांच्या हातीं असेल त्यांच्या च हातांत सारें राजकारण जाणार. त्यांच्यापुढें इतर टिकणार पण नाहींत. यापुढें ज्यांच्या हातीं सैन्यशक्ति राहील, त्यांच्याच हातांत हे राजकारणपटु पण राहतील. या उलट जे लोक अध्यात्माचा मार्ग अवलंबितील ते यांची तलवार हिसकावून घेतील. तलवार हिसकावून घेण्यासाठीं यांना आपल्या हातांत तलवार घ्यावी लागणार नाहीं. आज ज्यांच्या हातांत तलवार आहे, त्यांच्या अंतःकरणांत आणि बुद्धींत हे अध्यात्माची वाटचाल करणारे लोक स्थान मिळवतील. परिणाम हा होईल कीं हातांत तलवार घेतलेले स्वतः होऊन ती तलवार कारखान्यांत नांगर बनवण्यासाठीं पाठवून देतील.

### भावी युग माझें

आतां च मी लष्करासमोर बोलून आलों. मला त्यांच्या समोर बोलण्याची संधि मिळाली हें माझें भाग्य आहे. मी राजकारणापासून अलिप्त राहतों, हे आहे याला कारण. कुणी राजकारणी लष्करासमोर बोलायला जाऊं शकत नाहीं. तिथें पण मीं आपले अध्यात्माचे विचार मांडले. अध्यात्माची गोष्ट त्यांना पण पटते. मी निराश नाहीं. कारण, मला माहीत आहे कीं येणारा काळ माझा आहे, तुमचा नाहीं, नेत्यांचा नाहीं.

आज या राजकारणपटूंचा मोठा जोर दिसतो. पण तुम्हीं पहाल, एक काळ असा येईल कीं ज्या हातांनीं ॲटमबाँब बनविले ते हात च त्या बाँबना भिरकावून देतील आणि लोकांच्या सेवेला लागतील. जे लोक राजकारणापासून अलिप्त राहून अध्यात्माचा आसरा घेतील, त्यांच्या आश्रयास येतील, ते च लोक या विज्ञानयुगांत टिकतील. विज्ञानयुगांत अध्यात्म मार्ग दाखवील आणि विज्ञान गति देईल. मोटारींत एक यंत्र

मार्गदर्शन करणारें आणि दुसरें वेग वाढविणारें असतें. विज्ञान तुमच्या जीवनाचा वेग वाढवील आणि अध्यात्म जीवनाला दिशा दाखवील. अशा रीतीनें दोघांच्या मदतीनें तुमचें जीवन चालेल. परंतु जर कां राजकारण मधें घुसेल आणि जीवनांत ढवळाढकळ करील, तर तुमची मोटार खड्ड्यांत जाईल.

**राजकारण+विज्ञान=सर्वनाश !**

**अध्यात्म+विज्ञान=सर्वोदय !**

अध्यात्म आणि विज्ञान एकत्र येईल तर पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल, हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा. विज्ञानाचा लाभ घ्यायचा असेल, त्याच्याकडून काम घ्यायचें असेल तर त्याला अध्यात्माची जोड द्यावी लागेल. परंतु जर त्याचा लाभ घ्यायचा नसेल, त्याच्या द्वारें स्वतःचा सत्यानाश करून घ्यायचा असेल, तर मधें राजकारणाला तोंड खुपसूं द्या.

मानव अशा प्रकारें उगीच नष्ट होऊं इच्छीत नाहीं. पण होत काय असतें? निरनिराळ्या पार्टीचे लोक एक-दुसऱ्याला भेटत देखील नाहींत ! निवडणुका येतात तेव्हां एका पार्टीचे लोक जनतेला सांगतात कीं तुम्ही आम्हांला निवडून द्याल तर आम्ही तुम्हांला स्वर्गांत नेऊं, दुसऱ्या पार्टीला निवडून द्याल तर ते पार्टीवाले तुम्हांला नरकांत टाकतील. अगदीं असें च दुसरे पार्टीवाले पण जनतेला सांगत सुटतात. याचा अर्थ परस्परांनीं परस्परांना शिवीगाळ करणें, निंदा करणें हा च त्यांचा कार्यक्रम होऊन बसतो. मग आपसांत जुंपते. माझें राज्य आलें तर ते माझ्याशीं भांडतील, त्यांचें आल्यास मी त्यांच्याशीं भांडीन. असें हें चालत राहतें आणि ह्यामधें जनता भरडली जाते आणि पाहता पाहता लष्करीसत्ता--हुकुमशाही--दाखल होते.

## हृदय आणि बुद्धि नवीन हवी

प्रत्येक प्रांतांत नवनिर्माणाचा फार मोठा प्रयत्न चाललेला तुम्ही पाहता. परंतु त्यांतून नव-समाज का निर्माण होऊन राहिला आहे ? जुन्या विचारसरणीच्या जुन्या मानवांत कांहीं फरक का होऊन राहिला आहे ? कांहीं नवीन 'मूल्यें'–व्हॅल्यूज–का स्थापन होत आहेत ? जर या

सर्व प्रश्नांचें उत्तर 'नाहीं' असेल आणि आजसुद्धां तींच जुनीं भांडणें, ते च जातिभेद, तें च मनोमालिन्य, ती च संकुचित क्षुद्रभावना असेल, तर मग घरादारांत, पेहरावांत, सडकांत फरक पडल्यानें शेवटीं होणार काय आहे ? निसर्ग, घरदार, कपडे, वेशभूषा इत्यादि सगळ्यांत बदल झाला, पण अंतःकरणांत आणि बुद्धींत कांहीं फरक न पडला तर एवढें च होईल कीं जुन्या काळीं जीं भांडणें लहान प्रमाणांत होत होतीं, तीं आतां विज्ञानामुळें मोठ्या प्रमाणांत होतील. अंतःकरणांत आणि बुद्धींत बदल न झाल्यास मानवाच्या जीवनांत क्रांति होणार नाहीं. रशियांत कम्युनिझम् आला, तर काय झालें ? झारच्या हातांत जेवढी सत्ता होती, त्याहून ख्रुश्चेवच्या हातांत काय कमी आहे ? झार गेला आणि स्टॅलिन आला. आतां स्टॅलिन गेला आणि ख्रुश्चेव आला. थोड्या वर्षांपूर्वी आपल्याकडे बुल्गानिन आणि ख्रुश्चेव आले होते. इथें त्यांचे खूप मानपान झालें. पुढें त्या दोघांत शत्रुता निर्माण झाली. आणि आतां तर बुल्गानिनचा पत्ता च नाहीं ! पूर्वी राजेरजवाड्यांच्या काळीं जें कांहीं होत असे, तें च या काळांत पण झालें. ही क्रांति नव्हे. क्रांति तेव्हां होते, जेव्हां प्रेमानें हृदय पालटतें.

## नवीन मानव निर्माण करा

आज काश्मीर-सरकार कांहीं जनसेवा करीत आहे. पण खेड्या-पाड्यांतील लोक करताहेत काय ? ते का मिळूनमिसळून कामाला लागले आहेत ? जमिनिची मालकी नाहींशीं करीत आहेत ? स्वतःच्या योजना आखीत आहेत ? हें जर होत असेल तर नवीन मानव निर्माण होईल, अन्यथा नवीन जग निर्माण झालें तरी देखील नवीन मानव निर्माण होणार नाहीं. सरकारच्या मार्फत जें काम होत असतें त्यानें जगाला आकार मिळतो, पण तेवढ्यानें च नवीन मानव घडत नाहीं. आत्मशक्तीचें भान असणारे च नवीन मानव बनवण्याचें काम करीत असतात. आर्थिक स्थिति सुधारण्याची कल्पना वरवरची आहे. आंतून परिवर्तन हवें असेल तर आत्मिक शक्ति हवी. नव्या मार्गानें जाऊन आत्मिक शक्ति वाढवण्याचा आमचा हा एक लहानसा प्रयत्न आहे.

प्रत्येक मानवांत शक्ति आहे. आम्हांला जर या शक्तींना एकत्र आणायचें असेल, तर त्यांना एकत्र करण्याची एखादी युक्ति आमच्याजवळ हवी. एकत्र करणारी, जोडणारी, युक्ति राजकारण किंवा धार्मिक संप्रदाय होऊं शकत नाहीं, तर अध्यात्म च असूं शकते. मीं धार्मिक संप्रदाय आणि अध्यात्म यांत जो फरक केला आहे, तो लक्षांत घेण्याची गरज आहे. धार्मिक संप्रदाय शेंकडों असूं शकतात, परंतु अध्यात्म एक च आहे. धार्मिकसंप्रदाय राजनीति, भाषा आदि कांहीं लोकांना एकत्र आणतात आणि कांहींना अलग करतात. परंतु अध्यात्म मानवमात्राला एक करील. यासाठीं तुम्ही या आंदोलनकडे आर्थिक परिवर्तन घडवणारें आंदोलन अशा विचारानें पाहूं नका. उलट नैतिक आणि आत्मिक प्रगतीच्या दृष्टीनें पहा. असें कराल तेव्हां च वास्तविकता तुमच्या लक्षांत येईल आणि तुमचें अंतःकरण तिकडें वळेल.

कुकरनाग (काश्मीर)
२०-८-'५९

---

## सर्वोदयाचें सांख्य म्हणजे तत्त्वज्ञान : २७ :

आम्ही 'गीता-प्रवचनां'त सांख्य आणि योग असे दोन विभाग विवरले आहेत. हे दोन विभाग मिळून परिपूर्ण जीवनशास्त्र होतें. जीवनशास्त्राचा एक अंश आहे सांख्य आणि एक आहे योग. सर्वोदयाचे देखील सांख्य आणि योग असे दोन भाग आहेत. दोन्ही मिळून परिपूर्ण सर्वोदय-विचार होतो. सर्वोदयाचें जें सांख्य, म्हणजे थियरी, आहे तें मी आज सांगेन.

### ग्रामोद्योग आणि यंत्रोद्योगाचा समन्वय

सर्वोदयाचा मूलभूत विचार हा आहे कीं परस्परांच्या हितांत विरोध असूं नये. माझ्या हितांत तुमचें हित आहे. तुमच्या हितांत माझें हित आहे. दोघांच्या हितांत देशाचें हित आहे. देशाच्या हितांत माझें आणि तुमचें हित आहे. देशहिताचा विश्वाच्या हिताशीं विरोध नाहीं. विश्वाच्या हिताचा देशाच्या हिताशीं विरोध नाहीं. अशा रीतीनें सर्वोदय अविरोधी आहे. हा आहे पाया.

सर्वोदय-विचारांत ग्रामोद्योग, आणि यंत्रोद्योग देखील परस्पर अविरोधानें एकत्र नांदू शकतात. त्यांचें क्षेत्र ठरवून द्यावें लागेल. कोणत्या क्षेत्रांत ग्रामोद्योग ठेवायचा आणि कोणत्यांत यंत्रोद्योग याचें विभाजन झाल्यास, एका च देशांत ग्रामोद्योग व यंत्रोद्योग नांदू शकतील. ग्रामोद्योग आणि यंत्रोद्योगांचा परस्परांशीं विरोध च असला पाहिजे असें नाहीं. दोघांचा समन्वय होऊं शकतो.

## तीन प्रकारचीं यंत्रें

यंत्रें तीन प्रकारची असतात. एक असतें संहारक, दुसरें असतें समय-साधक आणि तिसरें असतें उत्पादक. संहारक यंत्र म्हणजे मशीनगन्स, तोफावगैरे--ज्यांचा उपयोग मानवसंहाराकरता च होतो. अस्त्र-शस्त्रादि जीं बनविलीं जातात, त्यांना म्हणायचें संहारक यंत्र. सर्वोदयामधें संहारक यंत्रांना वाव नाहीं. आम्ही सर्वोदयाचे लोक संहारक यंत्रांचा विरोध करतों.

दुसरें समयसाधक यंत्र. हें संहार करीत नाहीं आणि उत्पादन हि करीत नाहीं. तें केवळ वेळ वांचवतें. उदा० मोटार, रेल्वे, विमान आदि. ह्या सर्वांनीं न उत्पादन होतें, न संहार; फक्त वेळ वाचतो. आज विमानाचा इतका वेग आहे कीं मुंबईहून लंडनला बारा तासांत जाता येतें. चारशें वर्षांपूर्वी दोन वर्षं लागत असत. आतां बारा तास लागतात आणि वेळ वांचतो. असलीं हीं वेळ वाचवणारीं यंत्रें, यांचा सर्वोदयांत विरोध नाहीं. सर्वोदयाला हीं पसंत आहेत, मान्य आहेत. उद्यां इथून चंद्रावर पण जाणें होईल. त्यासाठीं रॉकेट्स बनतील. रॉकेट सर्वोदयांत बसतें. संहारक यंत्र पूर्णपणें अमान्य समयसाधक यंत्र पूर्ण पणें मान्य.

## उत्पादक यंत्राचे दोन प्रकार

तिसरें उत्पादक यंत्र. याचे दोन प्रकार आहेत. एकानें मनुष्याच्या श्रमाची पूर्ति होते. अंगमेहनतीचीं जीं कामें आम्ही करूं शकत नाहीं, तीं करण्यास हें यंत्र सहाय्य करतें. ह्यांना 'पूरक यंत्र' म्हणतात. हीं मानवाच्या श्रमाची पूर्ति करतात. आम्ही हातांनीं सूत काढीत बसूं तर आमचें काम पूर्ण होणार

नाहीं. तकलीनें थोडी मदत मिळाली, चरख्यानें अधिक मदत मिळेल. अंबर चरख्यानें त्याहून हि अधिक साह्य होईल. अशा तऱ्हेनें श्रमाची पूर्ति ज्या यंत्रांनीं होते, तीं पूरक–उत्पादक यंत्रें होत. जीं यंत्रें उत्पादन करतात पुष्कळ, पण मजुरांची संख्या घटवतात, तीं आहेत 'मारक' यंत्रें. पण कोणतीं यंत्रें पूरक आणि कोणतीं मारक, याचा निर्णय देश-काल-परिस्थितीनुसार बदलत राहील. अमेरिकेंत जें यत्र पूरक असेल, तें हिंदुस्थानांत मारक ठरूं शकतें. आज जें यंत्र मारक आहे, तें उद्यां पूरक देखील होऊं शकतें. त्याचें स्वरूप कालमानानुसार, स्थलमानानुसार, आणि परिस्थितीप्रमाणें बदलेल. ट्रॅक्टर अमेरिकेंत चालू शकतो. अमेरिकेंत माणसागणिक बारा एकर जमीन आहे, तर हिंदुस्थानांत माणसागणिक एक एकर जमीन पडते. हिंदुस्थानापेक्षां बारापट अधिक जमीन अमेरिकेंत आहे. तिथें ट्रॅक्टर चालू शकतो. तिथें जमीन जास्त आणि मनुष्य-संख्या कमी आहे. म्हणून मनुष्याच्या मदतीसाठीं, त्याच्या पूर्तीसाठीं, ट्रॅक्टर चालतो. हिंदुस्थानांत माणसें अधिक आणि जमीन कमी. इथें जर ट्रॅक्टरचा उपयोग करूं तर माणसांना मजूरी मिळणार नाहीं, माणसें बेकार होतील. ह्या कारणानें ट्रॅक्टर इथें मारक ठरेल, अमेरिकेंत पूरक ठरेल. अमेरिकेंत ट्रॅक्टर तयार होतात, हिंदुस्थानांत तयार होत नाहींत. ह्यामुळें देखील तो हिंदुस्थानांत मारक ठरणार. अमेरिकेंत गाईचें दूध पितात, बैलांना खातात आणि शेती ट्रॅक्टरनें करतात. हिंदुस्थानांत आपण गाईचें दूध पिऊं, परंतु बैलांना मारणार नाहीं. बैलांना खाणें भारतीय संस्कृतीला मान्य नाहीं. अशा स्थितींत ट्रॅक्टर आम्हांला फार महाग पडणार. आम्हांला ट्रॅक्टरला सुद्धां खायला द्यावें लागेल आणि बैलांना पण. हें अन्‌इकॉनॉमिकल होणार.

त्या लोकांच्यावर बैलांच्या रक्षणाची जबाबदारी नसल्यानें ट्रॅक्टर त्यांच्यासाठीं 'इकॉनॉमिकल' ठरतो. आम्ही ट्रॅक्टरला पण रक्षण देऊं आणि बैलांना पण. अशानें ट्रॅक्टर हिंदुस्थानांत मारक ठरतील व अमेरिकेत पूरक.

पडीत जमीन उठवण्यासाठीं ट्रॅक्टरचा उपयोग केला जाऊं शकतो. त्यांत कांहीं अडचण नाहीं, विरोध नाहीं. परंतु शेतीच्या चालू कामांत ट्रॅक्टरचा उपयोग केल्यास बैलांना मारावें लागेल. असें आम्हांला नको आहे.

बैल खत देतो, ट्रॅक्टर खत देत नाहीं. तेव्हां मग सिंद्रीचें 'मॅन्यूअर' विकत घ्यावें लागेल. हिंदुस्थानचें 'अर्थशास्त्र' आज गाय-बैलावर आधारलेलें आहे.

एका देशांत पूरक ठरणारीं यंत्रें, दुसऱ्या देशांत मारक ठरूं शकतात. कोणतीं पूरक आणि कोणतीं मारक ह्याचा कांहीं नेहमींकरता नियम करतां येत नाहीं. देश, काल आणि परिस्थितीनुसार कोणतें यंत्र मारक आहे व कोणतें पूरक आहे, याचा निर्णय करावा लागेल. हे आमचे विचार आहेत. ह्यांना यंत्र आणि ग्रामोद्योगासंबंधींचा सर्वोदयाचा विचार म्हणता येईल.

थोडक्यांत हें सर्वोदयाच्या सांख्याचें विवरण आहे. यांत कुणाच्या हिताचा विरोध नाहीं. परिस्थिति पाहून त्यांना 'अॅडजेस्ट' करावें लागेल.

—समाज-विकास-विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर
दिलेलें प्रवचन.
कुद्रा (बिहार)
२८-१२-'६०

---

## गुण-दर्शन, गुण-ग्रहण आणि गुण-विकास : २८ :

सर्वोदय-विचार इतका गहन आहे कीं आम्ही त्यावर अंमल करण्याचा प्रयत्न च करूं शकतो, पूर्ण अंमल अशक्य आहे. सर्वोदयाच्या पूर्ण आचरणासाठीं परमेश्वर दर्शनाची गरज राहील. बापू म्हणत असत कीं त्यांची सारी जीवन-साधना, सत्याग्रह इत्यादि कामें परमेश्वराच्या शोधासाठीं आहेत. बहुधा ईश्वराचा शोध करणारे एकांतांत ध्यान-धारणा आदि करीत असतात. बापू एकांतांत गेले नव्हते, लोकांच्या मधें काम करीत होते. हें खरें कीं ते ध्यान, प्रार्थना यासाठीं पंधरावीस मिनिटें वेळ काढीत असत. परंतु ते म्हणत—"ध्यान तर आमच्या कामांत प्रतिक्षणीं लागलें पाहिजे आणि एकांत तर जनतेंत काम करतां करतां हरक्षणीं लाभला पाहिजे."

एकांत-सेवन करायला आम्ही जातों तेव्हां आमचें मन भटकूं लागतें. हा का एकांत झाला ? जेव्हां आम्ही मनापासून अलिप्त होतों, तो खरा एकांत. तसें जगापासून थोडें च अलग व्हायचें आहे ! यासाठीं मनाहून अलग होऊन जनसेवेंत एकांताचा अनुभव ते नेहमीं घेत असत आणि म्हणत कीं ईश्वराच्या शोधासाठीं आणि दर्शनासाठीं माझें जीवन आहे.

## गुण-ग्रहणानें ईश्वर-दर्शन

ईश्वर-दर्शन आहे तरी काय, हें समजून घ्यायला हवें. भारतांत ईश्वरासंबंधीं फार भक्तिभाव आहे, इतकें च काय चिनी लेखक लिन यु टांगनें लिहिलें आहे कीं हिंदुस्थान 'गॉड इन्टॉक्सिकेटेड लँड'––ईश्वरानें अभिभूत भूमि– आहे. गोष्ट खरी आहे. परंतु ईश्वराचा शोध होईल कोणत्या प्रकारें ? ईश्वर गुणमय आहे. सत्य, प्रेम, करुणा आदि मंगल गुण त्याच्यांत ओतप्रोत आहेत. ह्या सर्व गुणांची परिपूर्णता च ईश्वर आहे. समोर जो जो मनुष्य येईल, त्याच्यांत गुणदर्शन घेतां यायला पाहिजे. जर आम्हांला कुणांत दोषांचें दर्शन झालें, तर आम्हांला 'माये'चें दर्शन झालें, ईश्वराचें नाहीं. कुणांत गुणाचें आणि दोषाचें दर्शन झालें, तर माया आणि ईश्वर दोघांचें थोडेंथोडें दर्शन झालें. तें निर्मळ दर्शन म्हणता येणार नाहीं. निर्मळ दर्शन तेव्हांच होईल, जेव्हां प्रत्येकांत गुणाचें च दर्शन आम्ही घ्यायला शिकूं. ईश्वराचा एकएक अंश एकेका रूपांत प्रगट झालेला आहे आणि दोष म्हणून जें दिसत असतात, तें मायेचें वरचें आवरण आहे–– बींवर टरफल असतें त्याप्रमाणें त्या मायेच्या आवरणाला भेदून स्वच्छ, शुद्ध दर्शन घडायला हवें, अलग-अलग गुणांचें दर्शन व्हायला हवें. अशाप्रकारें ईश्वराचा एकेक अंश पहायला मिळाला तर, त्यानंतर ईश्वराचें संपूर्ण दर्शन होईल. म्हणून नेहमीं गुण-ग्रहण, गुणचर्चा आणि गुण-स्मरण करायला हवें. दोष-ग्रहण, दोष-चर्चा, दोष-स्मरण अजीबात नको. यासाठीं आम्हीं सांगितलें कीं, अनिंदेचें व्रत हवें.

कोणाचा दोष आम्हांला दिसला, तर तो आमचा च दोष आहे, असें वाटायला हवें. त्याची निंदा करणें दुसरा दोष होईल आणि त्याच्यामागें त्याच्या दोषाची चर्चा अथवा निंदा करणे, हा तिसरा दोष. अशाप्रकारें

एकावर एक दोषांचीं पुटें चढलीं, तर गुणदर्शन होणार च नाहीं. आणि गुणदर्शन न झालें तर ईश्वरदर्शन लोप पावेल. त्यासाठीं आम्ही स्वत:च्या पण दोषांचें दर्शन करता कामा नये, आपल्या गुणांचें च दर्शन घ्यायला हवें. अशा रीतीनें सगळीकडे गुण-स्तवन, गुण-दर्शन, गुण-वर्धन व्हायला हवें. ह्याला च परमेश्वराच्या गुणांचें स्तवन म्हणतात. आम्ही सत्य, प्रेम आणि करुणा म्हणतो. जिथें जिथें आम्हांला सत्याचें अल्प-दर्शन घडलें, तिथें आम्हांला ईश्वराचें दर्शन झालें. वाळूच्या कणांत थोडे साखरेचे कण पडलेले आहेत. मुंगी त्यांतील साखरेचे कण तेवढे वेंचते. तद्वत् यांतून सत्याचें अल्पदर्शन ग्रहण केलें, कुठें प्रेमाचें दर्शन झालें, तेवढें घेतलें. कुठें करुणेचें दर्शन घडलें, तें घेतलें. कुठें आणखी कांहीं आढळलें, तें ग्रहण केलें. अशा रीतीनें प्रत्येकांतील गुण-ग्रहण करीत करीत आमचें हृदय गुणभांडार होईल, आणि मग कुठें परमेश्वराचें परिपूर्ण दर्शन घडेल.

परमेश्वराचें परिपूर्ण दर्शन व्हावें, अशा खटपटींत मी आहें असें बापू या करितां म्हणत असत. आज स्थिति अशी आहे कीं गुणाचें दर्शन तर होत नाहीं, उलट दोषांचें च होतें. ते दोष च समोर येतात. ते असतात च असें नाहीं. जोंपर्यंत माणसाच्या अंत:करणांत प्रवेश होत नाहीं, तोंपर्यंत दोषच दिसतात. कारण त्याचा हेतु आपल्याला माहीत कुठे असतो? कायद्यांत सुद्धां संशयाचा फायदा अपराध्याला, गुन्हेगाराला, देण्यांत येतो. त्याला 'बेनिफिट ऑफ डाऊट' म्हणतात. जोंवर हेतु माहीत होत नाहीं, तोंवर त्याला अपराधी म्हणता येणार नाहीं. आम्ही एकेका मनुष्याच्या दोषांचे परीक्षक बनूं, तर आम्हांला दुसरा उद्योग च राहणार नाहीं. असलें काम आमच्यानें नाहीं होणार! तें ईश्वराचें काम आहे. आम्ही केवळ गुण-ग्रहण च करीत राहिलें पाहिजे. एक दोष दिसला, तो लक्षांत राहिला; दुसऱ्या कुणाचा दोष पाहिला, तो स्मरणांत राहिला; तिसऱ्याचा तिसरा दोष चित्तावर उमटला, अशा रीतीनें हे सर्व दोष माझ्या हृदयांत जमा झाले--खेडयांत प्रत्येक घरांतील कचरा उकिरडयावर गोळा होतो ना, तसें--तर आमचें हृदय दोषांचें संग्रह-स्थान होईल. अशारीतीनें परमेश्वरावर पूर्ण अच्छादन पडलें म्हणजे त्या मायेच्या आवरणामुळें परमेश्वर-दर्शन लोपतें.

भक्तीशिवाय परमेश्वराचा शोध त्याचें दर्शन होऊं शकत नाहीं आणि गुण-दर्शनाखेरीज भक्ति होऊं शकत नाहीं.

## गुण-ग्रहणानें गुण-विकास

समोरच्यांतील गुणांचें दर्शन व्हायला हवें. त्याचा स्वीकार करून आपल्या हृदयांत त्यांना स्थान द्यायला पाहिजे. ह्याचें नांव आहे गुणग्रहण. नंतर त्या गुणांचा विकास करायला हवा. समोरच्या व्यक्तीचा गुण आमच्या हृदयभूमींत आम्ही पेरला. शेतकरी शेतांत एक दाणा पेरतो, तेव्हां तो चौपट होतो, शतपट होतो; तशी आमची मनोबुद्धि शुद्ध असेल आणि त्यांत समोरच्याचा गुण पेरला गेला तर तो शतगुणित होईल. त्याचें नांव आहे, गुण-विकास. प्रथम गुणदर्शन, मग गुणग्रहण आणि नंतर गुणविकास—ही भक्तीची प्रक्रिया आहे. ह्याच प्रक्रियेनें सर्वत्र दडलेल्या परमेश्वराच्या अस्तित्वाचें दर्शन होईल.

आमच्या दानाचा, सेवेचा, त्यागाचा, सत्याग्रहाचा एकूण एक कार्यक्रम परमेश्वराच्या गुप्त शक्तीच्या दर्शनासाठीं आहे. सत्याग्रहांत आम्ही करतों काय? सुखदुःख सहन करतों आणि त्यांतील जो चांगला भाग तो प्रकाशांत आणतों. सत्याग्रहांत ही श्रद्धा असते कीं समोर चांगला अंश आहे. हेंच आहे गुणदर्शन!

ह्या गुण-दर्शनाच्या आधारावर च सत्याग्रह आहे. समोरच्या व्यक्तींत जो गुण आहे, तो प्रभावी व्हावा, शक्तिशाली व्हावा असा प्रयत्न करूं तर दोष-निरसन होईल. त्या गुणाला प्रभावी करण्यासाठीं जें दुःख सहन करावें लागतें, तो सत्याग्रह च करतो. सत्याग्रहीमधें हाच गुण आहे कीं तो समोरच्यांत जो गुण असेल त्यावर श्रद्धा ठेवतो. ह्याच श्रद्धेवर सत्याग्रह उभा आहे, ह्याच श्रद्धेवर दानाचा कार्यक्रम चालत आहे.

## सर्वोदय : गुण-दर्शनाचा कार्यक्रम

म्हणून च सर्वोदयाचा संपूर्ण कार्यक्रम गुणदर्शनावर आधारलेला आहे. हें गुणदर्शन असेल, तर ईश्वराचें दर्शन होईल. त्याचें अंशमात्र दर्शन कां होईना, पण तें होईल. पूर्णांशानें दर्शन एकदम तर होणार नाहीं.

आज एका अंशाचें दर्शन होईल, उद्या दुसऱ्या अंशाचें. कल्पना करा, आज दानाचा कार्यक्रम झाला. आम्हांला एका अंशाचें दर्शन झालें. लोकांच्या अंतःकरणांत जी उदारता आहे, त्याचें दर्शन झालें. शांतिसेनेचें काम चाललें, लोक प्राण द्यायला सज्ज झाले, दंगे थांबवण्यासाठीं तत्पर राहिले तर लोकांच्या हृदयांतील निर्भयतेचें दर्शन घडलें. भूदानाच्या द्वारें उदारतेचें दर्शन, शांतिसेनेच्या कार्यक्रमानें 'अभया' चें दर्शन, खादीमुळें स्वावलंबी वृत्तीचें; आत्मोद्धाराच्या वृत्तीचें--दर्शन होईल. 'स्वच्छ भारत' आंदोलन चाललें तर स्वच्छतेचें, शुचितेचें, पावित्र्याचें दर्शन घडेल. अशाप्रकारें व्यापक सामाजिक कार्यक्रम करीत करीत, एकेकांत गुणदर्शन घेत घेत आम्ही पुढें पुढें जाऊं तर आम्हांला दर्शन घडेल. हीच परमेश्वराच्या समग्र दर्शनाची प्रक्रिया आहे. हें एकदम होणार नाहीं. शरीर आहे तोंवर धडपड चालत राहील. म्हणून बापू म्हणत कीं आमचा शोध चालू आहे, अद्याप आम्हांला दर्शन झालेलें नाहीं. ह्या शोधासाठीं च आमचें जीवन आहे. आमच्या आयुष्यांत च शोध करणें संपलें तर आम्ही च ईश्वर झालो, असें होईल. ह्यासाठीं मी एक श्लोक बनवला आहे. त्यांत आमचा सर्वोदयाचा विचार मांडला आहे :

**ब्रह्म सत्यं जगत् स्फूर्तिः जीवनं सत्यशोधनम् ।**

ब्रह्म सत्य आहे आणि विश्वांत भरलेलें आहे. विश्व त्याची स्फूर्ति आहे. हें लक्षांत घेऊन त्या विश्वांत, त्या सत्याचा शोध करणें आमच्या जीवनाचा कार्यक्रम आहे.

रामगंज (बंगाल)
१२-२-'६१

## विस्कळित रत्नें

* आत्मविषयक अज्ञान हें प्राथमिक अज्ञान. आपल्या ठिकाणीं हें अज्ञा आहे याची जाणीव नसणें हें 'अज्ञानाचें अज्ञान' किंवा गणिताच्या भाषे 'अज्ञानवर्ग.' आपण या अज्ञानवर्गांत सामिल आहोंत या गोष्टी इन्कार करणें म्हणजे 'अज्ञानघन'. यालाच 'विद्वत्ता' म्हणतात.
* शरीर-नाश हा नाश च नव्हे. आत्म-नाश होत च नाहीं. नाश म्हण बुद्धि-नाश.
* असत्यांत शक्ति नाहीं. आपल्या अस्तित्वासाठीं हि त्याला सत्या आश्रय घेणें भाग आहे.
* अज्ञानांतून ज्ञान उत्पन्न होत नाहीं.
* ज्ञान हें हि ज्ञानगम्य आहे. म्हणजे अगाऊ ज्ञान असेल तर ज्ञान मिळायचें.
* आमच्यापाशीं पांच इंद्रियें असल्यामुळें 'आमच्या' जगांत पांच वि आहेत. वास्तविक, जगांत अनंत विषय आहेत, अथवा मुळींच नाही
* 'सायन्स' ची किती हि सूक्ष्म दुर्बीण घेतली तरी आत्म्याचा आव ऐकण्याच्या कामीं ती निरुपयोगी आहे.
* देवावर विश्वास म्हणजे जगावर विश्वास, म्हणजे आत्म्या विश्वास, म्हणजे सत्यावर विश्वास.
* सर्व साहित्याच्या अभ्यासानें किंवा सर्व विश्वाच्या विज्ञानानें समाधान लाभणार नाहीं तें आत्मसंशोधनानें लाभतें.
* ज्ञात्याला या जगांत जगायची हि सोय नाहीं आणि मरायची सोय नाहीं. म्हणून तो केवळ शरीरानें जगून मनानें मरतो.
* आधुनिक विज्ञान म्हणतें, सात वर्षांच्या श्वासोच्छ्वासानें क पालटते. धर्मशास्त्र म्हणतें, बारा वर्षांच्या तपश्चर्येनें चित्त ध निघतें, अध्यात्म म्हणतें, ब्रह्मज्ञानानें एका क्षणांत जीव मुक्त होतो

वा मंडळ
म प्रकाशन
ार-वर्धा
REFBK-001